


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. औरंगाबाद.

नॅक 'अ' दर्जा

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवा रंग

२०१४-१५



## - विद्यापीठ गीत -

गीत आमुचे आकाशाचे गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे जनामनाचे गीत आमुचे जागराचे

अभंगाचे ओवीचेही
मायबोलीचे माहेर
वाऱ्यातही मराठीचे
दिवे लख्ख घरोघर

संत-महंतांचे विरागी गीत आमुचे वादळाचे

तंतु तंतु संघर्षाचा
पैठणीत भिनलेला
नक्षीतच पक्षी पक्षी
विजयाचा विणलेला
सोनपहाटेचे उदयाचे गीत आमुचे उजेडाचे

प्रज्ञेचा सूर्य नवा
शब्द शब्द उजळून गेला
समतेचा संगराचा
अर्थ ढाळून गेला

विराट विशाल संस्कृतीचे गीत आमुचे जीवनाचे

- फ. मुं. शिंदे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नॅक 'अ' दर्जा

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवारंग

२०१४-१५

## विविध योजना व उपक्रम - मार्गदर्शिका




संपादक

**डॉ. चेतना सोनकांबळे**

संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - ४३१ ००२.




युवारंग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रकाशक :**



**डॉ. गणेश मंझा**
कुलसचिव

**मुख्य संपादक :**



**डॉ. चेतना सोनकांबळे**
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

## संपादक मंडळ



डॉ. मुस्तजीत खान



डॉ. दिनकर माने



डॉ. कैलास अंभुरे



डॉ. शिरीष आंबेकर

**छायाचित्र : श्री. पंकज बेडसे**

युवा रंग



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव**

कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



मा. प्रोफेसर बी. ए. चोपडे
कुलगुरू

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## संदेश

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे आजच्याघडलीला विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व व सामाजीक विकासाला चालना देणारे विद्यापीठ आहे. शिक्षणाने माणसाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि माणुस सामाजिक विकास घडवून आणतो आणि त्या वाटेवर चालतांना ज्ञानाची ही मशाल एकाच्या हातातुन दुसऱ्याच्या हातात देण्यासाठी विद्यापीठातील सर्व प्राध्यापक वृंद व माझे सहकारी प्रयत्न करतांना दिसतात. प्रत्येक वर्षी आपल्या विद्यापीठाचा युवारंग हा वार्षीक अंक निघत असतो. आज युवारंग मध्ये जेंव्हा मी बघतो की विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या व कला गुणांच्या जोरावर आपल्या विद्यापीठाचे नाव राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नेले आहे. यासाठी मला अंतकरणापासून अभिमान वाटतो की मी या विद्यापीठाचा कुलगुरु आहे.

भारतातील प्रादेशिक स्तरावर नॅक चा 'अ' दर्जा मिळविणारे आपले विद्यापीठ ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना जगण्याची दिशा आणि नवचैतन्य देण्याचे काम करत आहे. विद्यापीठातील विद्यार्थी हा कला क्रिडा साहित्य सांस्कृतीक शैक्षणीक या सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतांना दिसतो यावर्षी क्रिडा महोत्सव केंद्रीय युवक महोत्सव उत्कृर्ष युवा महोत्सव तसेच राज्यराष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले चर्चासत्र हे यशाची पावती आहेत. आपले विद्यापीठ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालते आणि डॉ बाबासाहेब आंबडेकरांचा शैक्षणीक विचार आपल्या विद्यापीठात नव्याने रुजावा यासाठी माझ्या विद्यार्थी मित्रांनी प्रत्येक स्तरांच्या जीवनात दिपस्तंभासारखा प्रकाश निर्माण करावा यासाठी युवारंग हे आपल्यासाठी यज्ञाचे प्रमाणपत्र आहे. आणि यातुन आपले विचार तथा कलागुण झळकतांना दिसतात.

सामाजीक समता प्रस्थापित करीत असतांना शिकता शिकता जगता यावे, जगता जगता शिकता यावे, शिक्षण हेच जगणे हा विचारसुध्दा आपल्यामध्ये रुजावा आणि यातुन कृतिशील ज्ञानवंत किर्तीवंत, यशवंत विद्यार्थी घडावेत यासाठी आपण सर्वजण मिळून एकत्र येवुयात एका दिव्याने दुसरा दिवा लावु दुसऱ्याने तिसरा दिवा लावु असे असंख्या दिप लावु येथील विद्यार्थ्यांचे स्वप्न भव्य दिव्य असावेत व त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न करून मद्यमानवानी निवडलेल्या मार्गावरच मार्गक्रमण करावे



प्रोफेसर बी. ए. चोपडे
कुलगुरु

युवा रंग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## संदेश

कुलसचिव या नात्याने लिहिणे युवारंगमध्ये खरोखरच ही आनंददायी बाब आहे. या कारणांचा आपण परामर्श घेतला तर विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठाची विद्यार्थ्यांविषयी च सकारात्मक भूमिका लक्षात घेतल्यास एक गोष्ट निश्चित लक्षात येते ती म्हणजे असलेली बांधिलकी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या कै.वसंतराव काळे कमवा व शिक योजनेच्या माध्यमातून अगदी तळागळातला आर्थिक मागासलेला विद्यार्थीसुद्धा यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करताना आपल्याला दिसतो आहे. प्रत्येक विद्यार्थी विद्यापीठात प्रवेश घेतान एक आशा आंकाक्षाच स्वप्न घेऊन येतो ते स्वप्न पूर्ण करण्याचे काम विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठ पूर्ण करण्यासाठी अविश्रांत कष्ट घेत आहेत

विद्यापीठ हे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकीय ज्ञान देण्याचे काम करीत नाही तर त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्यापासून तर अगदी कालपरवापर्य झालेल्या अभिजात मराठी भाषा समितीचे अध्यक्ष रंगनाथ पठारे यांच्यासारख्या नामवंत व्यक्तीच्या विचारांची मेजवानी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जाते.

विद्यापीठ ही पवित्र ज्ञानभूमी आहे त्या ज्ञानभूमीतील विद्यार्थी हा आर्थिक बाबतीत जरी गरीब असला तरी तो ज्ञानाने आणि कर्तृत्वाने खूप श्रीमंत आहे. तसेच विद्यापीठाती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना ज्ञानाचे बळ देण्याचे काम विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण विभाग अविरत करत असतो.

विद्यापीठातील विद्यार्थी संसद युवा नेतृत्व शिबीर हे आजच्या व्यवस्थेतील तरुण पिढी घडविण्याचे काम करीत आहे जेणेकरुन तरुणांचा भारतीय राजकारणात सकारात्मक प्रभा पडावा व त्याची भारतीय राजकारणात निर्णयक्षमता वाढावी हा त्यामागील उदात्त हेतू आहे. भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश आहे आणि वर्तमानात खूप मोठया प्रमाणा लोकसंख्या लाभांश (Demographic Dividend) भारताला प्राप्त होणार आहे परंतु यासाठी तरूणांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आविष्कार युवा महोत्सव, उत्क महोत्सव किंवा क्रिडा महोत्सव असेल यामार्फत विद्यार्थ्यांच्या कौशल्य गुणांचा विकास साधण्याचे काम विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण विभाग करीत आहे.

महाराष्ट्रास मोठा सांस्कृतिक व संत साहित्याचा वारसा आहे. आणि हा वारसा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून जपण्याचे काम युवा महोत्सव करीत असतो. नृत्य, साहित्य, नाट्य चित्र, वाड्मय या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी निव्वळ आनंददायी बाब म्हणून न पाहता त्याकडे एक करिअर म्हणून विद्यार्थ्यांनी पहावे हा विद्यार्थी कल्याण विभाग व विद्यापीठाचा उदात्त दृष्टीको आहे. तसेच महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा जतन केला जावा हा सुद्धा ध्यास आहे.



महाराष्ट्राला छत्रपती, फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे आणि हा वारसा जपण्याचे तसेच विज्ञानाची कास धरु बुध्दीप्रामाण्यवाद अंगिकरण्याचे काम हे विद्यापीठ करीत आहे आणि करीत राहणार आहे. शेवटी समारोप करतांना मी हा आशावाद व्यक्त करतो क येथील विद्यार्थ्यांने फिनिक्स पक्षाप्रमाणे ज्ञानाच्या क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यावी इतकाच प्रखर आशावाद...

धन्यवाद !

डॉ. गणेश मं
कुलसचिव

युवारंग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## संपादकीय

### ।। हे ज्ञानिची पवित्रता । ज्ञानीचि आथि ।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी कार्य करते. म्हणूनच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे माहेर घर म्हणून आपल्या विद्यापीठाची ओळख आहे. अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या क्षेत्रातसुध्दा आपले विद्यापीठ अग्रेसर आहे. या विद्यापीठातील विद्यार्थी देशाच्या हितासाठी प्रथम चांगला नागरिक निर्माण व्हावा, तसेच अध्ययन, अध्यापन व संशोधना बरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देऊन एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून घडावे यासाठी सुध्दा विद्यापीठ व विद्यापीठातील मा. कुलगुरु महोदय, मा. कुलसचिव तसेच शिक्षक व कर्मचारी वर्ग नेहमीच प्रयत्नशील असतात.

आपल्या विद्यापीठामध्ये दलित, बहुजन, अल्पसंख्यांक व होतकरू विद्यार्थ्यांचे हित जोपासले जाते. वाडी, तांडयावरील, तळागाळातील विद्यार्थी हा उच्च शिक्षणापासून वंचित राहु नये म्हणून विद्यापीठाने कै. वसंतराव काळे कमवा आणि शिका स्वाभिमान शिक्षण योजना ही विद्यार्थ्यांला आर्थिक बळ देणारी आणि स्वाभिमानी विद्यार्थी घडविणारी योजना अशी तिची ओळख आहे. दर वर्षी हजारो विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सज्ज होतात व स्वाभिमानाने जीवन जगतात.

आजचे युग हे विज्ञान युग असल्यामुळे आपल्या समाजात अनेक प्रकारची नवनवी स्थित्यंतरे घडत असतात. अशा या धावपळीच्या युगात विद्यार्थी टिकून राहावा यासाठी विद्यापीठाच्या वतीने तत्वचिंतन, विचारवंताच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाते. याचा लाभही आपले विद्यार्थी घेतात. व यशाच्या भराऱ्या मारायला मोकळे हातात. ''जागतिकीकरणामुळे सातासमुद्रा पलीकडचा माणूस जवळ वाटू लागला आहे. परंतु जवळचा माणूस दूर जाता कामा नये '' हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, कार्यक्रमातुन शिकविले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला नैसर्गिक वातावरणाचा वारसा आहे. इथल्या वातावरणातील विद्यार्थी मुक्तपणे श्वास आणि आस्वाद घेताना दिसून येतो. यामुळे येथील विद्यार्थी समता, स्वातंत्र्य, यांना वाव मिळवावा म्हणून केंद्रीय युवक महोत्सव आयोजित करणे, तसेच एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडावा यासाठी विद्यार्थ्यांना राज्य व देश पातळीवर विविध शिबीरांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व दिले जाते. वर्षभरात विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणे हे विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख कार्य ठरते. या सर्व योजना व उपक्रमाची अमलबजावणी शिस्तबध्द व योग्यरीतीने सुव्यवस्थित होण्यासाठी 'युवारंग'ही पुस्तिका विद्यार्थी कल्याण विभागाने प्रसिध्द केली आहे. येणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवतीला हे युवारंग आपल्या हाती देताना मनापासून आनंद होत आहे.



डॉ. चेतना सोनकांबळे
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

युवा रंग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## विद्यापीठातील अधिकारी वर्ग



**प्रोफेसर के.व्ही. काळे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ



**डॉ. गणेश मंझा**
प्र.कुलसचिव



**डॉ. सय्यद अझरुद्दीन**
वित्त व लेखाधिकारी



**प्रोफेसर वाल्मिक सरवदे**
प्र. परिक्षा नियंत्रक



**डॉ. चेतना सोनकांबळे**
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग



# युवक महोत्सव सल्लागार व संयोजन समिती (२०१४-१५)

युवारंग



डॉ. धनराज माने
मा. कुलसचिव



प्रा. दिलीप बडे



प्रा. संभाजी भोसले
स्थायी समिती (अध्यक्ष)



श्री. सानप गजानन
अधिसभा सदस्य



डॉ. सुभाष राऊत
अधिसभा सभासद



डॉ. लक्ष्मीकांत शिंदे
अधिसभा सदस्य



डॉ. दासू वैद्य
मराठी विभाग



डॉ. संजय नवले
हिंदी विभाग



श्री. पंडीत तुपे



डॉ. सय्यद अझरूद्दीन
वित्त व लेखाधिकारी



डॉ.मुस्तजीब खान
इंग्रजी विभाग



डॉ. संजय पाटील देवळाणकर



डॉ. मिलिंद माने



डॉ.अशोक बंडगर



डॉ.फुलचंद सलामपुरे



प्रा.डॉ. राजेश करपे
कार्यक्रम समन्वयक-रा.से.योजना



डॉ. चेतना प्र. सोनकांबळे
विद्यार्थी कल्याण विभाग



## विद्यार्थी संसद



श्री. नामदेव कचरे
सचिव विद्यापीठ विभाग, विद्यार्थी परिषद



श्री. लखनलाल भुरेवाल



कु. माधुरी मीरकर

## वसतीगृह नियंत्रण व व्यवस्थापन समिती सदस्य



डॉ. रत्नदीप देशमुख
अध्यक्ष



डॉ. प्रतिभा पाटील
सदस्य



डॉ. मेहेर दत्ता पाथ्रीकर
सदस्य



डॉ. प्रमिला जाधव
सदस्य



डॉ. चेतना सोनकांबळे
सदस्य-सचिव

## कै.वसंतरावजी काळे कमवा आणि शिका, स्वाभिमान शिक्षण योजना सल्लागार समिती



डॉ. स्मिता अवचार



प्रा. आनंद देशमुख



श्री. जी. एस. पालकर

## एन.एस.एस. विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रमाधिकारी



डॉ. आर.एन. करपे
कार्यक्रम समन्वयक



डॉ. पुरुषोत्तम देशमुख



डॉ.सोनाली क्षिरसागर



डॉ. ओमप्रकाश जाधव



डॉ. प्रभाकर उंदरे

# वसतिगृह अधिक्षक व अधिक्षिका


प्रा.डॉ. नारायण पंडुरे


डॉ.मदनलाल सुर्यवंशी


डॉ.भासकर साठे


श्री. बी.जे. जाधव


डॉ. प्रभाकर उंदरे


डॉ. ओमप्रकाश जाधव


प्रा.डॉ. भारती गवळी


डॉ.सोनाली क्षिरसागर


डॉ.सविता भहीरट


डॉ.गिरीबाला बोंदळे

# विद्यार्थी कल्याण विभाग कर्मचारी वृंद


श्री. प्रकाश आकडे


श्री. एच.के. साठे


श्री. आर.टी. साबळे


श्री. ए. एस. महेसुलदार


श्री. राहुल जावळे


श्री. आर.एस. पवार


श्री. सय्यद जमील


श्री. शेख खैराती शेख चाँद

# केंद्रीय युवक महोत्सव (२०१४-१५)

## उद्घाटन समारंभ

युवारंग



# केंद्रीय युवक महोत्सव (२०१४-१५)

युवारंग

















# केंद्रीय युवक महोत्सव (२०१४-१५)















# केंद्रीय युवक महोत्सव (२०१४-१५)

## बक्षिस वितरण समारंभ

युवारंग



# विद्यार्थी संसद













# कै. वसंत काळे - कमवा आणि शिका योजना













# वस्तीगृहातील उपक्रम
















युवारंग

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## Vice-Chancellors of the university

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year |
|---|---|---|
| 1 | Shri S. R. Dongerkery | 19/06/1958 To 18/06/1964 |
| 2 | Dr. N. R. Tawde | 19/06/1964 To 15/10/1971 |
| 3 | Prin. R. P. Nath | 16/10/1971 To 15/01/1975 |
| 4 | Dr. V. G. Ganla | 26/07/1973 To 30/09/1973 |
| 5 | Shri S. R. Kharat | 16/01/1975 To 13/12/1976 |
| 6 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 24/12/1975 To 24/03/1976 |
| 7 | Shri. D. N. Kappor (IAS) (Incharge) | 14/12/1976 To 06/06/1977 |
| 8 | Dr. B. R. Bhosle(IAS) (Incharge) | 07/06/1977 To 03/05/1982 |
| 9 | Dr. B. H. Rajurkar | 13/05/1978 To 06/06/1978 |
| 10 | Dr. A. M. Vare | 27/02/1981 To 13/03/1981 |
| 11 | Shri.S. G. Gokhale (IPS) | 04/05/1982 To 07/07/1982 |
| 12 | Prin. G. R. Mhaisekar | 08/07/1982 To 20/08/1983 |
| 13 | Shri. S.G. Gokhale (IPS) | 21/03/1983 To 01/05/1983 |
| 14 | Shri. Y. L. Rajwade (IAS) (Incharge) | 21/08/1983 To 04/10/1983 |
| 15 | Justice M. P. Kanade | 05/10/1983 To 15/06/1985 |
| 16 | Shri. A. N. Batabyal (IAS) (Incharge) | 18/06/1985 To 28/06/1985 |
| 17 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 29/06/1985 To 31/10/1985 |
| 18 | Dr. B. H. Rajurkar | 01/11/1985 To 06/03/1988 |
| 19 | Shri. A. L. Bongirwar (IAS) (Incharge) | 07/03/1988 To 21/08/1988 |
| 20 | Shri. Govind Swarup (IAS) (Incharge) | 22/08/1988 To 05/09/1988 |

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year |
|---|---|---|
| 21 | Prin. S. A. Bhosale | 06/09/1988 To 16/09/1991 |
| 22 | Prof, V.B.Ghuge | 16/09/1991 To 14/01/1994 |
| 23 | Prin K. T. Thale (Incharge) | 17/04/1993 To 23/04/1993<br>10/08/1993 To 22/08/1993 |
| 24 | Shri. V. N. Karandikar (IAS) (Incharge) | 16/09/1994 To 03/11/1994 |
| 25 | Prin. Dr. Shivraj B. Nakade | 04/11/1994 To 03/11/1999 |
| 26 | Prof. Dr. B. G. Pachpatte (Incharge) | 11/08/1998 To 27/08/1998 |
| 27 | Dr. V. S. Lomte (Incharge) | 04/11/1999 To 20/12/1999 |
| 28 | Mr. K. P. Sonawane | 21/12/1999 To 20/12/2004 |
| 29 | Dr. D. G. Dhuley (Incharge) | 20/04/2001 To 30/04/2001<br>14/05/2001 To 27/05/2001<br>18/07/2002 To 08/08/2002 |
| 30 | Dr. H. A. Gani (Incharge) | 04/10/2004 To 21/10/2004<br>29/11/2004 To 10/12/2004 |
| 31 | Shri. K. B. Bhoge (IAS) (Incharge) | 21/12/2004 To 04/06/2005 |
| 32 | Prof. Nagnath Kottapalle | 05/06/2005 To 04/06/2010 |
| 33 | DR. A. G. Khan (Incharge) | 11/02/2009 To 28/02/2009 |
| 34 | Shri Bhaskar Mundhe (IAS) (Incharge) | 05/06/2010 To 22/09/2010 |
| 35 | Prin. Dr. K. B. Patil | 23/09/2010 To 04/01/2011 |
| 36 | Prof. Dr. V. M. Pandharipande | 05/01/2011 To 28/3/2013 |
| 37 | Professor B. A. Chopade | 04/06/2014 To |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## मा. कुलसचिव

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री. एम.बी. चिटणीस | १९/०६/१९५८ ते ३०/०६/१९६८ |
| २ | श्री. व्ही.के. धामनकर | ०१/०७/१९६८ ते २०/०४/१९७५ |
| ३ | डॉ. व्ही.व्ही. बोरकर (प्रभारी) | २१/०४/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ४ | श्री. एच.एस. मानविकर (प्रभारी) | ०८/०५/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ५ | श्री. एस.बी. चव्हाण (प्रभारी) | २०/०४/१९७६ ते १९/१०/१९७६ |
| ६ | श्री. एम.पी. लवाने | २०/१०/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ७ | श्री. व्ही.के. धामनकर (प्रभारी) | ०२/०२/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ८ | डॉ. जी.एस. अुर (प्रभारी) | २१/०४/१९७९ ते ०२/०७/१९७९ |
| ९ | डॉ. बी.एच. राजुरकर (प्रभारी) | ०३/०७/१९७९ ते १२/११/१९७९ |
| १० | डॉ. एम.जी. कुलकर्णी | १३/११/१९७९ ते १३/०१/१९८० |
| ११ | डॉ. बी.एच. राजुरकर | १४/०१/१९८० ते ०८/०९/१९८० |
| १२ | श्री. एस.बी. पाटील (प्रभारी) | ०९/०९/१९८० ते ३१/०५/१९८१ |
| १३ | डॉ. बी.एम. पाटोदेकर | ०१/०६/१९८१ ते ११/०९/१९८९ |
| १४ | श्री. एस.बी.पाटील | २७/११/१९८८ ते ११/०९/१९८९ |
| १५ | प्रा. जी.वाय.पाथ्रीकर | १२/०९/१९८९ ते २३/०४/१९९१ |
| १६ | प्राचार्य, बी.आर. आरबाड | २४/०४/१९९१ त २५/०८/१९९२ |
| १७ | डॉ. पी.पी. कार्यकर्ते | २६/०८/१९९२ ते २३/०२/१९९३ |

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १८ | डॉ. एम.एन. फरुकी | २४/०२/१९९३ ते ०२/०२/१९९४ |
| १९ | डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | २५/१०/१९९३ ते ३०/१२/१९९३ |
| २० | डॉ. जी.बी.शिंदे | ०३/०२/१९९४ ते ०६/१०/१९९६ |
| २१ | प्रा.डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | ०७/१०/१९९६ ते ३१/०१/१९९७ |
| २२ | डॉ. श्रीमती पी.बी. सोमवंशी (प्रभारी) | ०१/०२/१९९७ ते ०४/०२/१९९७ |
| २३ | डॉ. पी.एम. बोरा | ०५/०२/१९९७ ते १९/११/१९९७ |
| २४ | डॉ. एल.आर. नागरगोजे | २०/११/१९९७ ते १९/०१/२००२ |
| २५ | डॉ. पी.एम. बोरा (प्रभारी) | २०/११/२००२ ते १९/१२/२००२ |
| २६ | डॉ. जी.जी. सुरासे | ३०/१२/२००२ ते ३०/११/२००७ |
| २७ | डॉ. ए.एम. चव्हाण (प्रभारी) | ०१/१२/२००७ ते २७/०३/२००८ |
| २८ | डॉ. डी.व्ही. मुळे | २५/०३/२००८ ते २४/०३/२००८ |
| २९ | प्रा. डॉ. एम.एस. काचोळे (प्रभारी) | २५/०३/२००८ ते २५/०७/२०११ |
| ३० | डॉ. एस.टी. सांगळे (प्रभारी) | २६/०७/२०११ ते १९/१२/२०११ |
| ३१ | डॉ. डी.आर. माने | २०/१२/२०११ ते ६/१/२०१५ |
| ३२ | प्रोफेसर डॉ. सुरेश गायकवाड (प्रभारी) | ६/१/२०१५ ते १५/१/२०१५ |
| ३३ | प्रोफेसेर एम. डी. शिरसाठ (प्रभारी) | १५/१/२०१५ ते २१/१/२०१५ |
| ३४ | प्रोफेसर के. व्ही. काळे (प्रभारी) | २४/१/२०१५ ते २१/५/२०१५ |
| ३५ | डॉ. गणेश मंझा (प्रभारी) | २१/५/२०१५ पासुन |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

### संचालक व कार्यकाळ

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | डॉ. नागनाथ कोतापल्ले | ०१/०९/१९८९ ते ०२/०७/१९९२ |
| २ | डॉ. डी.जी. धुळे | ०३/०७/१९९२ ते ०७/०५/१९९३ |
| ३ | डॉ. सुदाम जाधव | १७/०६/१९९३ ते १७/०६/१९९६ |
| ४ | डॉ. सुधीर गव्हाणे | १८/०६/१९९६ ते ०३/१२/१९९९ |
| ५ | डॉ. अशोक हजारे (अतिरिक्त कार्यभार) | ०४/१२/१९९९ ते ०६/०८/२००० |
| ६ | डॉ. वाय.के. खिल्लारे | ०७/०८/२००० ते ०६/०८/२००२ |
| ७ | डॉ. एस.टी. सांगळे | ०७/०८/२००२ ते १६/१२/२००४ |
| ८ | डॉ. के.बी. शेजुळे | १६/१२/२००४ ते १३/०३/२००७ |
| ९ | डॉ. व्ही.एल. सिरसाट | १३/०३/२००७ ते १३/०३/२००९ |
| १० | कॅप्टन डॉ. एस.टी. गायकवाड | १३/०३/२००९ ते २४/०७/२०११ |
| ११ | प्रा.डॉ. वाल्मिक सरवदे | २५/०७/२०११ ते ३१/०९/२०१३ |
| १२ | डॉ. चेतना प्र. सोनकांबळे | ०१/१०/२०१३ ते |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## रॅगिंग प्रतिबंधक समिती

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नांव | पदनाम | दूरध्वनी क्र.व ई-मेल |
|---|---|---|---|
| १. | प्रा.डॉ. प्रतिभा पाटील<br>विभाग प्रमुख, लोक प्रशासन विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | अध्यक्ष | मो.: ९४२०९३९३२२ का.: ०२४०-२३६०७५७ |
| २. | प्रा.डॉ. रत्नदीप देशमुख - सहयोगी पाध्यापक<br>संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सदस्य | मो.: ९४२३१४७४६६ का.: ०२४०-२४५२३१९<br>ई-मेल : ratnadeep_deshmukh@yahoo.in |
| ३. | प्रा.डॉ. सुधीर गव्हाणे<br>प्राध्यापक व विभागप्रमुख, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सदस्य | मो.: ९०९६९५००३५ का.: ०२४०-२४७४६४५<br>ई-मेल : profgsudhir@gmail.com |
| ४. | प्रा. भिमराव भोसले - सहयोगी प्राध्यापक - इंग्रजी विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सदस्य | मो.: ९७६५३५५९७७ का.: ०२४०-२३७१२५५<br>ई-मेल : bhosalebhimrao9@gmail.com |
| ५. | डॉ. चेतना सोनकांबळे - संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सदस्य सचिव | मो.: ९४२३७८०५४९ का.: ०२४०-२४०३१३२<br>ई-मेल : kadambari6@rediffmail.com |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी परिषद निवडणुका मार्गदर्शन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. आर.आर. देशमुख (अध्यक्ष)<br>संगणकशास्त्र व माहिती वंत्रज्ञान विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ५. | डॉ. भारती गवळी (सदस्य)<br>संगणकशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| २. | डॉ. चेतना सोनकांबळे (सदस्य-सचिव)<br>संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ६. | कॅप्टन डॉ. सुरेश गायकवाड (सदस्य)<br>रसायनशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| ३. | डॉ. पी.बी. पापडीवाल (निमंत्रिक सदस्य)<br>वनस्पतीशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ७. | डॉ. राम चव्हाण (सदस्य)<br>प्राणीशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| ४. | डॉ. सुधाकर शेंडगे (सदस्य)<br>हिंदी विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ८. | डॉ. मुस्तजीब खान (सदस्य)<br>इंग्रजी विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |

## स्व.वसंतराव काळे "कमवा आणि शिका" स्वाभिमान शिक्षण योजना मार्गदर्शन समिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रा.डॉ.सौ. प्रतिभा पाटील (अध्यक्ष)<br>लोकप्रशासन विभाग प्रमुख<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ३. | प्रा.डॉ.सौ. स्मिता अवचार (सदस्य)<br>समाजशास्त्र विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ५. | डॉ. चेतना प्र. सोनकांबळे (सदस्य-सचिव)<br>संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| २. | प्रा.डॉ. आर.आर. देशमुख (सदस्य)<br>संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभाग<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ४. | श्री. प्रदिप जाधव (सदस्य)<br>लेखा अधिकारी<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | | |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## वसतिगृहे नियंत्रण व व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.डॉ. रत्नदिप देशमुख (अध्यक्ष)<br>संगणकशास्त्र विभाग,<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ. प्रतिभा पाटील (सदस्य)<br>लोकप्रशासन विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ.सौ. मेहेर दत्ता पाथ्रीकर (सदस्य)<br>प्लॉट नं. ४९०, एन-३,<br>सिडको, औरंगाबाद | प्रा.डॉ.सौ. प्रमिला जाधव<br>(सदस्य)<br>बलभीम महाविद्यालय, बीड |

## व्याख्यानमाला/शिबीरे मार्गदर्शन समिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रो. के.व्ही काळे<br>संचालक,<br>महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ३. | प्रा.डॉ. सय्यद अझरुद्दीन (सदस्य)<br>वाणिज्य विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ५. | प्रा. गिमिकर परशुराम<br>माजी विभाग प्रमुख<br>मराठी विभाग,<br>डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद |
| २. | प्रा.डॉ. प्रतिभा पाटील (सदस्य)<br>लोकप्रशासन विभाग प्रमुख<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ४. | डॉ. चेतना. प्र. सोनकांबळे<br>संचालक,<br>विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | | |

## राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रम अधिकारी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रा.डॉ. राजेश करपे<br>कार्यक्रम समन्वयक<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. पुरुषोत्तम देशमुख<br>अर्थशास्त्र विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. प्रभाकर उंदरे<br>पदार्थ विज्ञान विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. सोनाली क्षिरसागर<br>व्यवस्थापन शास्त्र विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. ओमप्रकाश जाधव<br>गणित विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबा |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवारंग

## अनुक्रमणीका



| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कविता | १ ते २१ |
| २. | विद्यार्थी लेख | २२ ते ४४ |
| ३.<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | लेख<br>अविष्कार २०१४-१५ - नझीन अख्तर<br>'' जिवन गौरव पुरस्कार'' - हिम्मतराव बावस्कर<br>''राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका'' - डॉ. राजेश करपे<br>- डॉ. सविता बहिरट | ४५ ते ४८ |
| ४.<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | अहवाल<br>उद्योजकता विकास कार्यशाळा - डॉ. महेश थोरात व एस. आर. टकले<br>आरोग्य केंद्र - आंनद सोमवंशी<br>राजर्षी शाहू महाराज अध्यासन केंद्र - डॉ. राजेश करपे<br>विद्यापीठ उद्यान - डॉ. जी. के. हुंबे | ४९ ते ५२ |

**शेतकऱ्याचा संदेश शेतकऱ्याला**

निसर्गाच्या धोक्या पायी......
जीव माझा कोंदला हाय
पण –जगणया शिवाय दुसरा पर्याय तरी कुठं हाय?
श्वास मोकळा करुन, हिरव्यागार ....रानात,
पांढऱ्या पिवळया सोन्यान,
पावसाच्या पाण्यात,
मला बी लय नाचावं वाटतंया
पण, भाग्य तेवढं कुठं आपलं हाय ?
दारिद्रय आणं दुष्काळ तर,
पाचविलाच पुजल्याला हाय.
ना काबाड कष्ट करुन,
उगवल्याल पिक माझं हाय,
ना पाया खालची जीमिन माझी,
ना डोक्यावरचं आभाळ माझं हाय.
मला बी वाटतंया,
मई पोरं बाबासाहेबाच्या इद्यापीठात शिकावी,
आणं पोरीचं लगीन लई थाटात करावं.
पण– आयुष्यातला अंधार,
आणं देवंच जाणु कधी व्हईल उजाड ?
म्या अनुभवल्याल हेच आपल जीवन हाय.
माझ्या मनी आशा, अजुन बी हाय नव्हे?
येडा प्रयत्न माझा,
काळोखात ही उजाड शोधतो.
गरीबीचा अंधार रजवून टाकायचाय.
जाणं प्रयत्नांचा दिवा आपल्यालाच लावायचाय
जाणं प्रयत्नांचा दिवा आपल्यालाच लांवायचाय.

पण– कसं बोलू ?
कसं बोलू ?–थोडा धीर धरा
पण– शेतकरी बंधुनो– माझी अवस्था,
तुमच्या सारखीच हाय नव्हं ?
समदे एक होऊया,
दारिद्रयाची तेरवी आणं संर्घषाचा शेवट करुया.
जगाला पोसऱ्या,
नको करु रं आत्महत्या,
नको घेऊ गळफास,
घेऊ नको शेवट चा घास.
बघ हया निसर्गाची सोनेरी पहाट,
तुझ्या सपनातील हिरव्या रानात व्हाणार हाय
आरं.....नवा कुठे हिरवं पिक उभं,
नी पांढर सोनं,
तुझ्या शेतात पिकणार हाय रं,
तुझ्याच शेतात पिकणार हाय.

**कु. प्रेरणा दिलीप दीक्षित**
समाजशास्त्र विभाग



**माझे विद्यापीठ**

विदयापीठ कार्यक्रमाची सांगते मी महती
संजय पवारांची तिरपी रेघ रेखती
जिजाऊ–सावित्रीच्या ? कथेचे सार
उत्कृष्ठ सादरीकरण केले कोकाटे सर
महिला दिनाचा बाई थाटचं न्यारा
व्याख्यानाला आल्या उपजिल्हाधिकारी मनिषा.....
मनीषाने सांगितला मार्ग यशाचा
अन् न्यायाधीश पाहुण्याने कायदा स्त्रीयांचा.....
सबल, श्रेष्ठ, निर्माती म्हणून ठेवा मान
ती आहे म्हणून शाबूत तुमची मान.....
चार चौघीसारखी पण वेगळी
आली  भवरीदेवी आगळी
सहन केला न अन्याय
स्त्री ला मिळवून दिला सन्मान
अर्थाचे आले थोर सर
नाव असती एस.के. थोरात
सांगे पैशाचे अर्थकरण
करी ज्ञानाची नौका  पार
विदया कलेचे हे उपासक
आहे विकासाचे दयोतक

असे हे माझे विद्यापीठ........



**नाव :– दांडगे वर्षा प्रल्हाद**
**एम. ए (मानसशास्त्र)**

## बोल ते

बोल ते प्रेमळ असावे प्रेम ते निर्मळ असावे
पत्थराला घाव कसले छेदता पिंपळ असावे
पापणीत मेघात बरसे अंतरी वादळ असावे
पूर आला त्या नदीला वाचले कर्दळ असावे
नजर ना लागे कुणाची गोंदती काजळ असावे
लेखनीचे शास्त्र घेता सोबती चळवळ असावे
सुस्त्र सारे दैव माझे चावले परवळ असावे.

## पैसा झाला मोठा

पाण्यापासून सोन्यापर्यंत सोन्यापर्यंत नाण्यापर्यंत
चाकरी पासून भाकरी पर्यंत भाकरीपासून नोकरीपर्यंत
दाढी पासून गाडीपर्यंत गाडीपासून माडीपर्यंत
कॉलपासून हॉलपर्यंत मॉलपर्यंत
चॅटिंग पासून बॉटिंग पर्यंत बॅटिंग पासून सेटिंग पर्यंत
बूटापासून कोटापर्यंत कोटापासून ओठापर्यंत
कष्टकरी पासून दृष्टाचारी पर्यंत दृष्टापासुन
भष्टाचारी पर्यंत पैसा झाला मोठा
पैसा झाला मोठा ......!

**सुरेश सिरसाठ** (एम.ए–प्रथम)

## प्रेम

भर उन्हाळ्यात डोळ्यात पावसाळा ठेवुन गेलीस आणि
भर पावसाळ्यात डोळ्याचा उन्हाळा केलास तरी
माझ्या प्रेमाची गंगा अखंड वाहत राहील
उन्हा पावसात हे प्रिये तुझ्या प्रेमाच्या लाटा
उसळत राहतील माझ्या डोळ्याच्या सागरात
चिरकाल ................निरंतर..........निरंतर

**रामेश्वर वाकनकर**
एम.ए.पी.एचडी

## दहशतवाद

काय सागावे आणि कसे सागावे ?
फोफावलाय सगळीकडे दहशतवाद
राजकारण्याचाच पुढे हात, यात मुळीच नाही वाद
दहशत घालुनी करतोस तु घातपात
मानवतेचे लचके तोडुनी छळले तु दिनरात
कारण, फोफावलाय सगळीकडे हा दहशत वाद
क्रोधाच्या भरात त्याने केला विनाश
का तो समजत नाही यातच आहे तुझा सर्व नाश
कारण, फोफावलाय सगळीकडे दहशवाद
देशामध्ये घडतो आहे दहशत वाद
रक्ताच्या थारोळ्यात पडला मानवतावाद
कधी थांबणार हा मानवा–मानवातील वाद
कारण, फोफावलाय हा दहशद वाद

**साविता गायकवाड**
एम. ए.–मराठी–द्वितीय वर्ष



## असले उधान येतच असतात

मुसळधार कोसळतोय पाऊस तरी, मनातील अग्नीकुंड
विझेना,वारा आहे स्तब्ध तरी अंतरीचे उधान थांबेना.
हजारो प्रश्नाचा उठतो भडका
स्वप्नाचा वाहतोय महापुर आयुष्य भासतय महाप्रलय
अपयशाच्या भितीने हादरतय ऊरं कोण हा
भूंकप आहे तो शांत कसा करावा,
काय उद्देश असले त्याचा, तो पुरा कसा करावा
येवडया भयान वीजा का कडाडतायेत ?
वय झाले म्हणून का ?
वयासोबत अंगाखांदयावर जबाबदाऱ्या आल्या म्हणुन
चार पैसे कमवयाची वेळ आली म्हणुन का ?
दारिद्रयाच्या नशेत शब्द जोडायचे सवय लागली म्हणुन
बेरोजगराच्या गर्दीत हरवलो म्हणुण का
शिक्षणाने शहाणा झाला म्हणुन काहीतरी घडतयं
काही कानी पडतयं असले उधान येतच असतात
अनं असला पाऊसही परिस्थितीशी दोन हात
करण्याची तयारी असणाऱ्या प्रत्येकाच्या मनात

**राम प्रसाद वाव्हळ**
एम–मराठी–प्रथम वर्ष

## विद्यापीठ

विद्यापीठ म्हणाले सागराला
तुझ्याकडे नुसते पाणी आहे
माझ्याकडे जरा बघ
इथे अमृताची वाणी आहे.
तु असशील कितीही महान
तुडूंब भरलेल्या पाण्यानी विशाल
माझ्याकडे जरा बघ,
ज्ञानाने तेवनारी शांत माझी मशाल
तट बंदीना ही भेदुन जातोस
किणाऱ्यालाही जुमानत नाहीस
गर्भीत भावनेने,
हिंदोडो तु घालतोस खुशाल
विज्ञानाची आस मला,
सर्जनाशिलतेचा ध्यास मला
उजाड राणी ज्ञानांकूर फुलवितो
सागरा रे कार्य माझे महान प्रहरी तु शांत रहतोस
मध्वान्हाला पुन्हा खवळतोस ६जनू
बाळासारखा चिडचीड करतोस किती रे सागरा मन
तुझे लहान.....!
अज्ञानाला दुर सारुनी ज्ञानाची भुक भागवुनी
कधी रुसलो कधी न फूगलो
कार्य माझे महान
जाताही येईना किनाऱ्याच्या पुढे तुला
बांधून ठेवले तटबंधीनी पोहचुही शकला
नाहीस कधी डोंगराच्या चराचरात
मला न बांधू शकले कूणी नाही कसली
माझ्यात कमी तोडून साऱ्या तटबंधीत
कधीत पोहचलो मी घराघरात मग सांग सागरा
तु मोठा असुनी झालास लहान
मी लहान असुनी किती महान......!

**मिर्लीद व्य. कांबळे**
एम. ए. प्रथम वर्षे
समाजशास्त्र विभाग

## गौतमा

ज्याने उलथून टाकली सर्वप्रथम
माणसाचे माणुसपण नाकारणारी
रानटी व्यवस्था
ज्याने रोविला येथे निधडया
छातीने
स्वातंत्र्य, समता, बंधुतात्वाचा
अजरामर झेंडा
येथेल्या माणसांच्या ओठांवर
ज्याने फुलवले माणुसीकीचे
गीत
गौतमा धन्य, धन्य ते
तुझे चिरंजन स्मित

**तावरे गीतांजली**
**लोकप्रशासन शास्त्र विभाग**

## बघू दे मला जगाला

उदरात माते तुझ्या तो अंकूर वाढविला
जपुन प्राणापरि त्यात प्राण साठवीला
कळताच मुलगा नसुन मुलगी
पोटातच का गोठविला.....?
आहेस तु ही मांदी का तुला आठवेणा
असुन तु ही नारी उगाच का मारी
शेवटच्या क्षण बिछान्यावरी
मी ही पाजेल तुला ग पाणी
आहे मुलगी म्हणताच
कसा आटला तुझा ग पान्हा
तुच उध्दरिले दोन्ही घरा
आठवून जरा पहा ना............!
नको विचारु कुणाला
कर वाटेल ते तुझ्या मनाला
एवढा तरी विचार कर
बहीन हवी का तुझ्या मुलाला....!
विचारा परि ग माते
तु विचार तुझ्या मनाला
तुझाच ग अंश मी
नको मारु तुझ्या जीवाला
आई पटतय ना तुझ्या मनाला
जरा बघु दे मलाही जगाला

**साखरे आशा कारभारी**
एम. ए–प्रथम वर्ष
समाजशास्त्र विभाग

## माझा –पक्ष

मला कोणी विचारले
कोणता रे तुझा पक्ष
माझा पक्ष आणि फक्त माझा पक्ष
रडणाऱ्याला हसवणारा
दु:खात ही सुख दाखवणारा तो फक्त
माझा पक्ष
आणि तो फक्त माझा पक्ष
कधी आंधळयाच्या डोळा तर कधी
लंगण्यासाठी पाय बनवणारा
अशक्याचे शक्य बनवणारा
तो फक्त माझा पक्ष
अज्ञानरुपी अंधकारातून
ज्ञानरुपी प्रकाशाकडे वाटचालीची शिकवण देणारा
फक्त पैशासठी नाही तर माणुसकीसाठी
प्राण पणाला लावणारा तो फक्त
माझा पक्ष
शत्रुलाही मित्राप्रमाणे वागायला शिकवणारा
प्रत्येकाचा दुष्टीकोन बदलणारा
पाण्यासाठी आग लावण्याचा
दृढ विश्वास असणारा
तो फक्त माझा पक्ष आणि तो फक्त माझा पक्ष
माझा आणि माझा फक्त
एकच पक्ष राष्ट्र उद्धाराकडे आणि
प्रगतीकडे लक्ष हे पक्ष नंतर
सध्या फक्त माझा एकच पक्ष
आणि एकच पक्ष आधी
Degree आणि नंतर
Post Degree कडे लक्ष

## "मोहब्बत है"

ये मोहब्बत है क्या ? सूरज का उगना
किरनों का फेलना लाल रंग से मुसकाना
बता देता है कि मोहब्बत है...... ॥१॥
फुलों का महकना खुशबु से बहकना
होले होले खिलना बता देता है कि
मोहब्बत है ... ॥२॥
बादलो का गरजना धरती पर बरसना
बुंद–बुंद से टपकना बता देता है
कि मोहब्बत है..... ॥३॥
भैवरे का गुनगुना ना फुलो गीत गाना
दोनों का मिलना बता देता है कि ...
मोहब्बत है ...... ॥४॥
श्याम की बॉसुरी बजाना राधा का मधुबन
में आन साँझ का ढलना बता देना है
कि मोहब्बत है .... ॥५॥

**कु. बनसोडे एल. एस**
हिंदी विभाग (पी. एच. डी.)



## माणसाने कोणाकडून काय शिकावे ?

शिकावे त्या वाऱ्याकडून मंद झुळूक व्हायला
स्मित हास्य देऊन हळूवारपणे वाटायला
शिकावे त्या खोडाकडून भक्कम उभे राहयता,
कोणत्याही परिस्थितीत संकटांना सामोरे जायला
शिकावे त्या पानाकडून मोकळेपणाने डुलायला
जन्म मुंत्यूचे नैसार्गिक सुत्र समजून घ्यायला
शकावे त्या मुळाकडून खोलवर रुजायला
स्वत: उलटा प्रवास करत दुसऱ्यांना
आधार द्यायला
शिकावे त्या फांदयकडून डोलते कवडसे पाहायला
हसत खेळत नानाविद्य आकार तयार करायला
शिकावे त्या देठाकडून चांगला आधार दयायला
फुल मरुन पडताना तयार असते सर्वस्व वाहायला
शिकावे त्या फुलाकडून सर्वांना आनंद दयायला
कोमजल्यावरही हस्त जाते मातीला मिठी मारायला
शिकावे त्या फळाकडून आपल्या वेदना विसरायला
दूसऱ्यांना आनंद देण्यासाठी तयार होईल ते मरायला
शिकावे त्या झाडाकडून सामर्थ्याने जगायाला सर्व आघा
सहन करत सुंदर जीवन घडवायला

**विदय जायभाये**
वनस्पतीशास्त्र विभाग

**तुझ्यातच माझ्यासाठी.....**

श्वास माझा, भाव माझे,
भावनांनी या भाराावून पहा,
जगतोय मी आता तुझ्याचसाठी
तुझ्यातच माझ्यासाठी एक क्षण जगून पहा....
गोड तु त्याऊनी तुझ्या अदा
घायाळ करीशी सहवासात येशी ज्यांच्या सदा,
गोडवा माझा, सहवास माझा,
गोडव्याला हया चाखून पहा,
तुझ्यातच माझ्यासाठी.....
जगलो काही काळ तुझ्यासवे,
स्वप्नेरी दुनिया ती की वास्तविक जगणे,
स्वप्न माझे, रंग माझे
स्वप्नांना हया रंगून पहा,
तुझ्यातच माझ्यासाठी........
स्पर्श तुझा तो गुलबक्षीचा,
ओठ तुझे ते, की रसाचे प्याले,
स्पर्श माझा, ओठ माझे,
स्पर्शाला ह्या स्पर्शुन पहा
तुझ्यातच माझ्यासाठी......
जाणतो मी आहा मन तुझे,
तरंग की अंतरंग छेडीले तु माझे?
अंतरंग माझे, मन माझे
मनाला हया जाणून पहा ! पण खरच हं !
तुझ्यात माझ्यासाठी......
ना भेटण ना बोलण, बघुनही भेट नाही,
कुणाला भेटण्यासाठी,अस तडपन नाही,
तडपन, व्हिवळण तुझ्याचसाठी
असचं मला भेटण्यासाठी तडपून पहा
जमत असेल तर हे करुन पहा ।
जगतो विचारात तुझ्या रात्र कशी आहे समजत नाही,
करतो मी असे माझे मलाच उमजत नाही,
विचार कर माझा नि हे उमजून पहा,
जमत असेल तर हे करुन पहा ।
विश्वास ठेवतो तुझ्यावर पण विश्वास अविचल नाही
फसवलेस मला कि मी तुझी नवीन शिकार तर नाही?
प्रित होण्यासाठी विश्वास ठेवून पहा,
जमत असेल तर हे करुन पहा
ध्यास सदैव असतो तुझा आता मन कुठच लागत नाही
तुच आहेस मनात आता,दुसर कोण नाही,
मन लगण्यासाठी मनात मला ठेवून पहा
जमत असले तर हे करुन पहा ।
तुझ्यातच माझ्यासाठी एक क्षण जगून पहा
जमत असेल तर हे करुन पहा.....

**काय जादू झाली कळेना ......!**

सुवर्णमुद्रा, चंद्रमुखाची छटा चहेऱ्यावरी
आली ती यावी जशी स्वप्नातली परी
तेव्हा केली जाण वास्तव्याची कुणीतरी
आलो भानावर जेव्हा काय झाले कळेना
काय जादू झाली ते कळेना.......
हसते अशी, जस फुलाव वसंतात गुलमोहर,
टपोरे डोळे, जसे विशाल सागर,
असली जवळ वाटते मिळाल सारं,
जवळीक असूनही ती दूर का कळेना
ना चौन पडे, ना झोपही लागे आता,
वेळ–जातो निघली
स्मितचित्र डोळ्यातह येवूनी,
ओळखी ते आजवर गेला कसा काळ समजेना
काय जादू झाली ते कळेना.....
जात नव्हते दिवस दिवस जाई,
थोडी झोपही लागे चैनही पडे,
पण तिच्याविना आज मुळी करमेना
झोपतो तरी राहून–राहून जाग येई,
हळूच चिमटा कोण घेई ते कळेना,
काय जादू झाली ते कळेना....
खरंच खूप सुदर आहे ती, अन त्याहून तिची अदा,
नजरेत जादू तिच्या सकलजनांचे मन मोही सदा,
मन मोहीनी ती जादूगरीन ती अन्
काय जादू झाली ते कळेणा......
पुरता राहीलो नाही मी माझा
ती परीकथा नव्हती खरी
आता जाणण्याची वेळ आली,
याला प्रेम म्हणावे की आकर्षण ।
काय म्हणावे ते कळेणा
अन् काय जादू झाली ते कळेना .......

**सुधीर प्रभाकर खोनागडे**
संगणकशास्त्र विभाग
एम. टेक–द्वितीय वर्ष



## हार होत नाही............

लाटांना घाबरुन जहाज कधी पार होत नाही प्रयत्न करण्याऱ्यांची कधी हार होत नाही......
छोटिशी मुंगी जेव्हा दाना घेऊन चलते चढते भिंतींवर शंभर वेळा फिसलते मनाचा विश्वास नसा–नसात साहस भरते चढुण पडणे, पहुण चढणे अवरत नाही शेवटी तीची
महेनत बेकार होत नाही प्रयत्न करणाऱ्यांची कधी होर होत नाही ....
डुबक्या सिंधुमध्ये गोताखारे लावतो आत जावू–जावून खाली हात वापस येतो मिळत नाही माती सहजही पाण्यामध्ये वाढतो दुप्पट उत्साह याच हैराणी मध्ये मुठ्ठी त्याची खाली प्रत्येक वेळी राहत नाही प्रयत्न करणाऱ्यांची कधी हार होत नाही........
असफलता एक आव्हान आहे, स्विकार करा काय कमी राहीली गेली ते पहा आणि सुधार करा जोपर्यंत सफल होत नाही, झोप ,चैन त्याग तुम्ही संघर्षाच मैदान सोडून कधी पळुन जावून का तुम्ही काही केल्याशिवाय जयजयकार होत नाही
प्रयत्न करणाऱ्यांची कधी हार होत नाही.....

**स्वाती बाळासाहेब झगेकर**
एम.ए.– मराठी

## ।। निसर्ग विचारतो प्रश्न जेव्हा मानवाला ।।

निसर्गाची किमयाच असते न्यारी ।
पण त्यात ढवळाढवळ करणारा
मनुष्य प्राणी अविचारी ।
मनुष्य हा तर निसर्गाची उत्पत्ती,
तरीही मनुष्य कसा वेगळा?
याच प्रश्नांची सरबत्ती ।
पण माणसाला कदाचित आंडवत नाही,
निसर्ग कधीच धोका देत नाही ।
उलट मानवाला दिलेल्या देणगीची किंमत,
निसर्ग कधीच मागतही नाही ।
पण त्यात ! निसर्गाची किमया न्यारी ।
पण त्यात ढवळाढवळ करणारा
मनुष्य प्राणी अविचारी ।।१।।
कर्तृत्ववान मनुष्य निसर्गाकडून
फक्त घ्यायलाच शिकला ।
इतके घेतले इतके घेतले की,
भुकंपाचा प्रकोप आणि महापुराने
प्रसंगी स्वत:च्या जिवालाही मुकला ।
नुसत्या घेंण्याच्या स्वार्था मुळेच तर,
शेवटी माणुस धोका दयायला शिकला ।
विसरुन गेला, निसर्गाची किमया न्यारी,
हाच तो ढवळाढवळ करणारा,
मनुष्य प्रानी आविचारी ।।२।।
मानवाने स्वत:च्या प्रगातिच्या ओघात ,
निसर्गाच्या समृद्धीचा खुपच कमी विचार केला
म्हणुन विसरुन चालणार नाही निसर्ग निर्मीकाला
उरलेली माणुसकी तरी येईल निसर्गाच्या कामाला ।
नाही तर प्रश्न पडेल सुंदर निसर्गालाच की,
या बुदधीमान प्राण्यांच्या जगातुन माणुस कुठे निघुन गेला ?

**कु. मीना रामकीसन राजपूत**
एम.फील–समाजशास्त्र विभाग



## जीवन म्हणजे नेमकं असतं तरी काय ?

जीवन म्हणजे असतो एक प्रवाह नदीचा
त्याला सतत वाहत ठेवणं ,
समुद्राला पोचनं महत्वाच हाय !
जीवन म्हणजे नेमकं....... ॥१॥
जीवन म्हणजे असते एक परिक्षा, सगळयांचीच
त्यात पास होणं हे गौणच असतं,
पण मेरिटमध्ये येणाऱ्याच कौतुक निराळ्य हाय !
जीवन म्हणजे नेमकं....... ॥२॥
जीवन म्हणजे असतो एक प्रवास,
जन्मापासून ते मृत्यूपर्यन्तच्या आयुष्याचा,
त्यामध्ये मुक्कामाला पोचन गरजेच हाय !
जिवन म्हणजे नेमकं........ ॥३॥
जीवन म्हणजे असत एक संगीत,
त्यापाशी जडावी आपली प्रीत
स्वर ताल नृत्य आणि लय साधन महत्वाचा हाय!
जीवन म्हणजे नेमकं ........ ॥४॥
जीव म्हणजे असतो एक खेळ,
एकदा जिंकन सहज शक्य हाय,
पण सतत जिंकणाऱ्यांच नाव पुरुषार्थ हाय!
जीवन म्हणजे नेमक ....... ॥५॥
जीवन म्हणजे असत युद्ध,
महाभारतातल्या युध्दासारख,
जिंकलात तर राज्य मेलात तर स्वर्गाच
आरक्षण हाय
जीवन म्हणजे नेमक..... ॥६॥
जीवन म्हणजे असत नाजुक प्रेम,
त्यात असतात नाती गोती,प्रेमाची स्नेहाची स्वप्नांची
आणि भावनेची, ती स्वत: प्रेमाणे जपन महत्वाच होय!जीवन
म्हणजे नेमकं ........ ॥७॥

**दत्तात्रय शिवाजी गायकवाड**
अर्थशास्त्र विभाग



## शिकवण तुझी

झोपडयात रहायची सवय मला, एकदम हृदयात घेतलस तू
कळत नव्हत काय म्हणावं, डार्लिंग म्हणायला शिकवलंस तू

एकटं फिरायला लाज वाटे, हातात हात घेऊन फिरलीस तू
चहाशिवाय माहित नव्हते पण आईस्क्रीम खायला
शिकवलंस तू

प्रेम काय माहित नव्हत प्रितीच्या सागरात बुडवलस तू
कसं जगाव कळत नव्हत पण मरुन जगायला शिकवलस तू

भावगीतही माहित नव्हत प्रेमगीत गायला शिकवलस तु
एकनिष्ट राहिलो मी अन् बेवफा झालीस तू

नवीन होतो या जगात मी, जगाची ओळख दिलीस तू
स्वप्न दाखवून चुराडा करण्याची जगाची रीत शिकवलंस तू

विरहसागरात डुबलो मी, चातकाची आस दिली तू
चुकूनही ओलावले नाही डोळे माझे, आसवाऱ्या वादळात
सोडून गेलीस तू

तुझ्याचसाठी संपलो मी तरीही विचारतेस कोण तू द्यायला
फक्त एकच उत्तर मुर्ख मी अन् शहाणी तू

**अशोक देवकर**
एम. आय. बी. (द्वितीय सेम)

## सखे

सखे,
माझी सोबत करशील ?
पण त्याकरिता तुला
निघावे लागेल प्रवासात
तापलेल्या उन्हात
नि, पेटलेल्या रानात
द्यावी लागेल झुंज, तुला
कधी एकातांत,
आणि चालत राहावे लागेल
अखंड न दमता
यशोधरेचं बळ घेऊन
सावित्रीबाई फुलेंच्या
खडतर तपशचर्ये नंतरही शक्य झाल्यास
मातोश्री रमाबाईच्या मार्गावरुन
प्रवास करावा लागेल
तेव्हाच तुला प्राप्त होईल
ती गती मला येऊन मिळण्याची
कारण मी त्यांच्याच चळवळीतील
वारसापैकी एक आहे.

**कु. जयश्री प्रल्हाद शिंदे**
एम. फिल. (शिक्षणशास्त्र) प्रथर्म वर्ष



## बाबासाहेब

येता आठवण तुमची
नायनात येतात अश्रू
तुम्ही निघून गेलात
आम्ही कोठे असू
स्थिती आमची अशी की
गोठयातील वासरासाठी
जंगलातील गाय धावते
हंबरते वात्सल्यासाठी
तुम्ही माय–बाप आमचे
आम्ही अनुयायी तुमचे
शिकवण तुमची दलितोध्दाराची
विखरलेल्या चळवळी बांधण्याची
कष्ट तुमचे विद्याभ्यासाचे
अंगीकारु आम्ही
घटनाकार तम्ही
सत्शील अनुयायी आम्ही
विसरलो ना आम्ही कोठे
शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे
तुम्ही सांगितल्याप्रमाणे
गुरगुणे आमचे सुरू आहे
समतेला, एकात्मतेला
तुमच्या दाद आहे.
अनुयायांच्या तुमच्या
बाबासाहेब हृदयात आहे.

**कु वंदना जनार्धन भिसे**
एम.फिल–लोकप्रशासन विभाग

## करूण जीवाची होळी....

माझ्या राजांनी करुण जीवाची होळी
दिली रयतेला स्वराज्याची पूरण पोळी ।।धृ।।
महाराष्ट्र धर्म वाढवावा हीच राजांची इच्छा
आता तरी सोडा जाती–पातींचा पिच्छा
याच महाराष्ट्राच्या मातीत ओविली समतेची जाळी
येथे नांदले एकत्र तेली, माळी, साळी कोळी ।।१।।
माझ्या राजांनी......
स्वराज्याचा सुख सोहळा, बडी बेगमच्या न देखे डोळा
अफझुलाने विडा उचलला, समजून शिवाला भोळा
आला स्वराज्यात एकत्र करुण सैन्य दारु गोळा
थोर जिजाऊचा शिवरत्न ज्याने काठीला कोथळा ।।२।।
माझ्या राजांनी......
या मातीमध्ये उपजलि तानाजी मालूसरे
राहूनी एकनिष्ठा, त्यांनीच मिरवीले मानाचे तूरे
गडी व गड जिंकूनी, गड कोटांची माळ ओवीली
स्वराज्यासाठी मरण आपूले लीहिले
आपल्या भाळी।।३।।
माझ्या राजांनी......
आहेच देवाचा देव माझा, शिवछपत्रपती राजा
त्यानेच केली महाराष्ट्राची सुखी प्रजा
तोच खरा आहे. शिवाचा शिवचंद्र मोळी
यमाला ही भय वाटले शंभूच्य मरण वेळी ।।४।।
माझ्या राजांनी......
नरांच्या मातीत जन्मलो भाग्य आपूले थोर गडे
राजांना सांगण्याचे प्रयत्न केले थोडे
आता माझे एकच मागणे पसरतो तुम्हापूढे झोळी
भृण हत्येने, बलात्काराने मूलीचे घेऊ नको बळी ।।५।।
माझ्या राजाने करुण जिवाची होळी
दिले रयतेला स्वराज्याची पूरण पोळी.....

## पाणी

हिरव्या गार धारतीच लेन आहे पाणी
सर्व सजिवाच मूलस्थान आहे पाणी
शेतकऱ्याच्या आशेचा किरण ते पाटाच पाणी
ढगातल आटून शेतकऱ्यांच्या डोळ्यात साणतं ते पाणी

सर्व साधारण बैठकीत ठेवात लागत बिस्लरीत पाणी
गरीबाला गढूळ प्याव लागत पाणी

सर्वानाच पूरुण उतलो जो प्याला असतो बारागावचं पाणी
थोड जरी काम करुण घेयाचे असेल तर दयावे लागते चहा–पाणी
वाट बघा लावतं ते नळाचे पाणी
टँकर आल्यावर भांडण लावते पाणी

शंका मनात आली की कुठेतरी मूरते पाणी
गोड संसारात भांडन लावतं मूरलेल पाणी

पोरीला पोरासोबत पाहील्यावर बापाच्या तोंडच पळत पाणी
सोयरीकीच्या बैठकीत पोरगी घेऊन येते तांब्याभर पाणी

शब्दरुपी रेखाटल, डोळ्यात आणून पाणी
लक्षात ठेवा मानसांनो वाचवले नाही पाणी
तर जिव घेईल पाणी

गरीब असोवा श्रीमंत एक गोष्ट कोरुण ठेवा ध्यानी
सरनावरती गेल्यावर संर्वानाच लागतो थेंबभर पाणी

एकलीटर टाकल्यावर अकरा लिटर देते जमीनीतले पाणी
धरणिला हिरव ठेवा आडवून पावसाच पाणी

**बोनगे राहूल रघूनाथ**
एम. कॉम. फिल

**भाव– प्रेमाचे**

भाव प्रेमाचे मनामधील
मनालाच समजायचे
फुल प्रेमाचे प्रेमामधील
प्रेमालच उमजायचे,
कव्य कुंज्याचे कुंजामधील
कुंज्यालच उमजायचे,
भाव प्रेमाचे मनामधील,
मनालाच समजायचे

खुण खुणांची खुणांमधील
खुणांनीच खुणवायचे,
साद सादाची सादांमधील
सादांनीच ऐकायचे,
भाव प्रेमाचे मनामधील
मनालच समाजायचे,
ओठ मनाची मनामधील
मनानीच हेरायचे,
आस तृप्तीची तृप्तीमधील
तृप्तीलाच वाटायचे
भाव प्रेमाचे मनामधील
मनालाच समाजायचे.
लाज लाजेची लाजेमधील
लाजेनीच लाजवायचे.
मन मनाचे मनामधील
मनानीच मानायचे,
भाव प्रेमाचे मनामधील
मनालाच समाजयचे.

विचारांवर लक्ष ठेवा
त्याचे शब्द होतात.
शब्दावर लक्ष ठेवा
ते कृतीत उतरतात,
कृतीवर लक्ष ठेवा त्यासवयी बनतात
सवयीवर लक्ष ठेवा
त्यातून चारित्र्य घडते
चारित्र्यावर लक्ष ठेवा
ते आपले भविष्य घडविते.

**विकास नामदेव साळुंके**
डेप्ट ऑफ कॉमर्स




## शाळा

शाळा सोडताना....
खरं म्हणजे, आम्हाला
माहीतच नव्हतं
शाळा सोडण्यात एवढं
काय विशेष होतं.
मुली मात्र शेवटच्या दिवशी
सारख्या रडत होत्या,
सरांपासून शिपयापर्यंत
सर्वांच्या पाया पडत होत्या.
मला आठवतय आम्ही
रडणाऱ्या मुलींची
जाम खेचली होती,
खर तर डोळ्यातल पाणी लपवताना
आमचीच गोची झाली होती,
एकमेकांकाडे पाहून लगेच
सावरलं आम्ही स्वत:ला
मनाशीच म्हंटल आता
उगीच रडायचं कशाला ?
भले शाळेतली काही
जुनी नाती तुटतील ,
त्यात काय एवढं
कॉलेज मध्ये नवीन भेटतील
दिवस, वर्ष कशी जातील
कळणार नाहीत,
पुन्हा कधी पावलं इथे
वळणार नाहीत...
रडावसं वाटत होत पण
कुणीच रडले नाही
शाळेतून बाहेर पडताना
वळूनही पाहीलं नाही.....
पण आता मात्र
शाळेत जावसं वाटतंय,
शेवटच्या बाकावर
बसावसं वाटतय,
शाळेतल्या तासांपेक्षा
मधल्या सुट्टीचीच
सर्वांना ओढ  असायची
कारण तेव्हाच सर्वांना
आपली माणस भेटायची...
आज मात्र बरोबर कुणीच नसतं,
शाळेच्या आठवणिने रडताना,
असं वाटत तेव्हाच
रडायला हवं होत, शाळा सोडताना.......

**विजय बालासाहेब बुधवंत**

वनस्पतीशास्त्र विभाग-प्रथम वर्ष



www.shutterstock.com - 379540

## जगण

आयुष्य खरचं कस असत
फुल वेचताना सुद्धा साभाळायच असतं
मुक्त जगण्याला किती लगाम आहे.
रस्त्यावर किती वळणे आणि मोड आहे
घ्याव समजून कुणा कुणाला आणि किती वेळा
त्यालाही मर्यादा आहे.
तरीही म्हणतात आयुष्य सुंदर आहे
पण ते खरचं सुंदर आहे.
दुसऱ्यांसाठी मरण
यात तर खर सुख आहे
आयुष्य हे सुंदर आहे.
खूपच खदखदल
तर आश्रुंना मोकळी करुन दयावी वाट
पण तीही एकटयात
कारण तेच तर आहेत आपले खरे सोबती
आयुष्याच्या भोवऱ्यात
तरीही म्हणतात आयुष्य सुंदर आहे.
जगलं तर गुलाब आहे
काटे तर टोचणारच
पण फुलणं सोडायच नाही
**नाहीतर मरण अटळ आहे.**



**वनिता केरुजी बनकर**
अर्थशास्त्र-एम. फिल

## ती अणि मी पावसात

ती आणि मी पावसात
शब्दांने चिंब भिजलो
प्रेमाने नाहलो नखशिकांत
ती आाणि मी पावसात
एकदा अगणात तीची शपथ
देशील कारे सोबत
जन्माची साथ,
मी पण भिजलो होतो प्रेमात
चिंब होऊन अंगणात
मी म्हणालो
ही तर आपली जन्मोजन्माची गाढ
मागशील तेव्हा देईल साथ
ती आणि मी पावसात
वीजेचा कडाकडाट
सरीनेही दिली साथ
शब्दांने चिंब भिजलो पावसात
प्रेमाने नाहलो एकदा अंगणात
मला भेटली सोबतीण
हातात देऊन हात
ती आणि मी एकदा पावसात
नंतर कळल ती आहे तीच्या संसारात
रममाण माझ्या स्वप्नाचे फुटले आकाश
पावसाने भिजवले मला नखशिकांत
ती आणि मी पावसात



**वनीता केरुजी बनकर**
अर्थशास्त्र–एम. फिल

## शिर्षक यश वाट पाहे तुझी

तुझ्या जीवनाचा
तु इतिहास
घडविणार आहेस
वादळातून ऊज्वल
होणार आहेस
नको खोद करु
तुझ्या जीवनाचा तू इतिहास
घडविणार आहेस
झेप घे भरारी
यश वाट पाहे तुझी
तुझे स्वप्न हे
वाट पाहे तुझी
कष्ट सोसले किती
पण ध्येय खचले कधी नाही
यश वाट पाहे तुझी
भेगातून फुटतात अंकुर
तसे तुझ्या जीवनाचे
फुटतील अंकुर
यश वाट पाहे तुझी.......



## शिर्षक अशी आहे माऊली

अंधकारात होते जीवन
एक किरण पडले.....
पुन्हा एकदा दिसले ध्येय
मी उठून बसले
जीवन आनंदाने
कुलून गेले जीवन
अशी आहे माऊली
अंधकारात दाविले
सूर्याचे किरण
अंधकारात दाविला
एक प्रकाश
पुन्हा एकदा दिसले ध्येय
सूर्याहून मोठी आहे.
ज्ञान दिले
सागराहून अनंत आहे
हारपून गेले सागरात
पुन्हा एकदा दिसले ध्येय
पुन्हा एकदा शोधतो मोती

अशी आहे माऊली
अशी आहे माऊली



**नाटकर सुचिता दत्तात्रय**
एम. ए–इतिहास

## फुले सावित्रीची ज्ञानधुरा

फुले सावित्रीबाईनी ज्ञानधुरा ही चालवली
शेणा दगडांचा मार खाऊन
तरी नही ती घाबरली
लोकांनी निंदा त्यांची केली
तरी, नाही ती माघार घेतली
१८४८ साली पुणे येथे शाळा काढली ॥१॥
पावलोपावली त्यांच्या अपमान झाला
तरी नाही जुमानिले जगाला
स्त्रीशिक्षणाचा ध्यास होती, एवढीच त्यांची आस
त्याच्यामुळे प्रत्येक क्षेत्रात मुलींनी गरुडझेप घेतली ॥२॥
धन्य फुले सावित्री थोर
स्त्री उदधारांचा त्यांना घोर
मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी
कष्ट सोशिले अपार
त्यांच्या कार्यामुळेच त्यांची किर्ती जगात गाजली ॥३॥
होता पाठिंबा फुलेंचा
झाला उद्धार मुलींचा परिवर्तनाची
वीज कडाडली आकाशी अन ध्यासही
घेतला त्यांनी आपल्या मनाशी त्यांच्यामुळेच
शिक्षणाची संधी आज आम्हांला मिळाली ॥४॥

**बडे कल्पना गोविंदराव**
एम. ए.–इतिहास प्रथम वर्ष

## इतना ना पूँछो

इतना ना पूँछो की,
पढोगी कब तक ?
इनता ना पूँछो की,
अभी कितने है साल ?
इतना ना पूँछो की,
पढकर करोगी क्या ?
इतना ना पूँछो की
नौकरी लगेगी कब ?
इतना ना पूँछो की
नौकरी करोगी कोनसी ?
इतना ना पूँछो की,
शादी करोगी कब ?
प्लीज बंद करिए ।
ये सवालों का सिलसिला ।
क्योंकि मैं ये सवाल,
सुन–सुनकर तंग आ चुकी हूँ ।
मुझे भी नही पता की,
मै क्या कर रही हूँ,
और क्या करने जा रही है ।
सिर्फ मुझे इतना पता है की
मैं पढ रही हूँ, पढ रही हूँ.... पढ रही हूँ

**तांबे विजया मुरलीधर**
संधोधन छात्रा
हिंदी विभाग

## कोण हा बळीराजा

झोपेतून उठून केले जीवाचे राण ज्याने,
झोकून दिले जीवन सारे ज्याने,
कर्तव्यापरी अर्पण केले देहदान ज्याने
कोण हे करी जे सर्व काही केले ज्याने.
सोन्याला उगविले मातीत ज्याने,
उपाशी राहून दिले दुसऱ्याला जेवण ज्याने
लढत राहील्या सतत निसर्गाशी करी सामना,
कोण हे करी जे सर्व काही केले ज्याने,
मातीत उभारला देव ज्याने
दिला हातभार देशाला ज्याने
गाळीत घाम तो पाण्यावाणे
कोण हे करी जे सर्व काही केले ज्याने.
जाऊन ठेपला कोठे जाणे,
कोण तारी त्याला देवच जाणे
काय करावे न तो जाणे
करी का आत्म हत्या तो फक्त
तोच जाणे हा फक्त तोच जाणे
हाच तो बळीराजा हाच तो बळीराजा
केले उपकार सर्व जगावर ज्याने....

**शेख इम्रान जब्बार**
समाजशास्त्र विभाग–एम.फिल

## ।। प्रेम वेडा ।।

तो वेडी विचारते मला.....
का रे सांगु पडलास का
कसे सांगु तिला
जेव्हा पासून पहिलंय तुला
चैन नाही एक पल मला....
तो वेडी विचारते मला....
काय रे नाव सांग न.....
कसे सांगु तिला
तुझेच नाव सांगायच मला
ती वेडी विचारते मला...
खुप आवडते का रे ती तुला
कसे सांगु तोला
तिच हावी आहे आयुष्याच्या जोडीला ....
म्हणूनच रोज हेच मागणे....
मागतो देवाला
ती वेडी विचारते मला....
कारे मग सांगणार कधी तु तिला
कसे सांगु तिला मला भिती वाटते तुझे नाव घ्यायला
कारण कदाचित जाशिल सोडून तु
मला एकटयाला

## फुलपाकळी

का उठलात जिवावर माझ्या, मि आहे कळी लहान,
मि तर इवली फुलपाकळी, उमलुन होईल महान.
त्याने दिली जर मजला चोच, दाना देईल तोच पाहुनी,
बापा तु का व्यर्थ काळजीत रे, बसलासी दडुनी,
चिमुकलेच पाय माझे, चिमुकलेच हात लहान
करुनी ओंजळ पुढ्यात तुमच्या, मागते जगण्याचे दान,
मि तर इवली फुलपाकळी, उमलुन होईल महान.
दिवाच हवा तुम्हा सगळ्यांना, मि तर त्यातली वात–वाहीनी
व्यर्थ ठरेल तोही मजवाचून, तव असाच देशाल कोपऱ्यात
ठेंवुनी फुलु द्या असेच झाडावरती, नका घेऊ माझा प्राण,
पाहून दिपतील चंद्र तारे, कर्तृत्व माझे,
असा पायावर तुमच्या, आणुन ठेविल वान,
मि तर इवली फुलपाकळी, उमलुन होईल महान,
किती करु आर्जव तुम्हाकडे, मि तर आहे बंदिस्त गर्भातुनी,
येऊ द्या जन्मास मला, प्रेमातुनी प्रेम देईल सर्वत्र सांडूनी,
अस्तित्व मि आई इवल्याशा, हडकू जिवनाचे रान,
मि तर इवली फुलपाकळी, उमलुन होईल महान.

**जाधव गोपाल जयवंतराव**
एम.ए.प्रथम वर्ष–मराठी विभाग

## माय

राणाच्या कोपऱ्या–कोपऱ्यात एक हुंदका घुमत होता.
झाडाच्या कपारीत एक आवाज रडत होता.
प्रत्येक बाय
स्वप्न पाहते होण्याच माय पण माय होणाऱ्या बायाला
माहीत नसते म्हातार पणाची हाय
दारिद्रयाची हाय सोसत माय म्हातारी होते
बायकोबरोबर राहताना म्हातारीची का बरं अडचन होते ?
परक्यांचे शब्द तरी ऱ्हदय विदीर्ण करी
लेकास मोठं करण्यास माय जिवांच राण करी
लटलट कापणारे पाय काम करणार तरी काय ?
काम केलं न्हाय तर खाणार तरी काय ......

**लोंढे सिध्दार्थ शिवाजी**
राज्यशास्त्र–एम.ए प्रथम



## लढाई मनाची

ध्येयापर्यंत पोहचवणारी
बस झाल सार आता,
कधीच नही चुकायचं
संकटाना घाबरून त्यांच्या समोर कधीच नही
झुकायचं
होऊन गेलेल्या वाईट गोष्टींना
आता का आठवायचं ???
आता फक्त चांगल्या क्षणांना
मनात मात्र साठवायचं !
स्वत:चा मार्ग स्वत:च सापडायचा,
या मार्गावर अविरतपणे चालायचं
मागे वळुण मात्र कधीच नाही पाहायचं,
हाक दिली जरी कुणी
मागे नाही वळायचं,
सतत,सतत आणि सतत चालत मात्र राहयचं
समजत की,
समोर असेल खुप अंधार
तरीही अपेक्षा नाही करायची कुणी बनेल का
आपला आधार ?
का ? उगीच आपण दुसऱ्यांसाठी थांबायच
अन् स्वत:च मागे राहयच
फक्त एकच ठरवायच,
स्वत:चीच सोबत बनुन आता एकटच
लढायचय, स्वत:लाच म्हणायचय
झाली तयारी सारी
अन् करायची आहे लढाई वर स्वारी.

**स्नेहा शामराव देशपांडे**
एम. एस्सी भैतिकशास्त्र–प्रथम वर्ष

## कविता

### ' महा भारत आता इंडिया झालाय...'

आस्मानी, सुलतानी संकटान बळीराजा खचुन गेलाय,
या वामण पुढाऱ्यानी देशाचा पार तमाशा केलाय,
कारण ............
महा भारत आता इंडिया झालाय
सिमकार्ड फुकटात तर खत–वियोनाचा भाव गगणाला
भिडलाय,
कारण ..............
महा भारत आता इंडिया झालाय
शिक्षणासाठी १६ टक्के, गुण होमलोन ९ टक्के व्याजाचा
दर झालाय,
ॲम्ब्युलन्सपेक्षा पिझ्झा बर्गर आता फास्ट झालाय,
कारण...............
महा भारत आता इंडिया झालाय..........
बॅटशी खेळणाऱ्याला एक कोटी पण ..........
जिवाशी खेळणाारा जवान बेहाल झालाय,
कारण.................
महा भारत आता इंडिया झालाय...
सद्‌विचार, इमानदारी, नैतीकता या मूल्यांचा
सुपडा तर केव्हाच साफ झालाच......
कारण.................महा भारत आता इंडिया झालाय...
'मराठी' शाळा औषधाला पण 'इग्रजी' शाळांचा गल्ली
बोळात
सुळसुळाट झालय,
लिपीक ५ लाख, शिक्षक १० लाख, प्राध्यापक २५ लाख
असा नोकऱ्यांचा बाजार झालाय,
कारण ..........
महा भारत आता इंडिया झालाय..

**लांडगे नारायण वसंतराव**
इंग्रजी विभाग–व्दितीय वर्ष

## बाप

बिकट प्रसंग बापच सदा सोडवी आपण गाना फक्त
आईचीच गोडवी आईच गुणगान खुप झाले
पण बिचाऱ्या बापाने कय केले ?
आई असते वेदनेचा हुंकार
तर बाप असतो संयमाची धार
आई असते अन्नपूर्णा
तर बाप असतो अन्नगुरू देवकी यशोदेचे प्रेम
आठवा आठवा टोपलीतुन बाळास नेणारा बाप
रामासाठी कौसल्येची झाली कसरत
पूत्र वियोगाणे विव्हळणारा आठवा दशरत
काळ बदलला  आता मुलांनो नवीन दुनिया आली
वागण्याची मुलांमुलीची आता रीतच बदलुन गेली
काटकसर करुन मुलांना देतात पॉकेटमनी
आपण मात्र वापरी शर्ट–पॅंट जुनी
मुलीला हवे पार्लर अन् नवी साडी
स्वत: मात्र अडी अडचणीत दिवस काढी
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न
बापाला दिसे ऐलीचे शिक्षण अन् लग्न
मुलीच्या लग्नासाठी बापाला लागते धाक
आठवा मुलीसाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलांच्या पणी बापाच्या सदिच्छा
आपण बापाला समजुन घ्यावे हिच माझी इच्छा

**कु. सोनु वसंत क्षिरसागर**
बी.कॉम मोरेश्वर महाविदयालय,
भोकरदन.

## 'तोही जात कंची...?'

जवा शाळात टाकल पहिलं पाऊल बा संग,
तवा मास्तरानं इचारल, ऐ पोऱ्या.....
तोही जात कंची ?
म्या आपला कावरा–बावरा झालू ,
म्या आपला सहा वरिसांच पोर
मला काय म्हाइत ही 'जात' काय असतीया,
मग बानच हळू सांगितल, मही....
जात कंची,
बासंग एकदा गेलू तालुक्यास्नी,
राशन–कार्ड काढायला,
तव्हा ते दलाल बोलल,
लवकर काम करूतुया अन कमी पैशात.
पण आधी सांग भाऊ तोही जात कंची
अशाच एका जातीय दंगलीत मारला गेला निरागस जीव,
दोन–दिस व्हता पडून मग जमलं अन् म्हणाल...
याले जाळायचा की पुरायचा, पर हयाची जात कंची ?
पुसतात मसनवाटयातही जात कंची, जात कंची
पण इचारत नाही माणुस कोणता मेलाय.
लग्नास्नी, नौकरीस्नी अन् राजकारणास्नी पुसतात जातीला,
पण पहात कस नाही त्या माणसाच्या कर्तृत्वाला,
शिवरायाच्या महाराष्ट्रात, भिमरायाच्या ईचाराची माणसं
आम्ही,
पण अजूनही ईचारीत असतुया.....
अबे.......तोही जात कंची.....?
हया जाती–पातीचा आता, जीतच जाळलं पहिजे,
अन् 'समतेची' पताका आसमानात फडकली पहिजे.

**लांडगे नारायण वसंतराव**
इग्रजी विभाग–द्वितीय वर्ष

## "उमलु दे या निष्पाप कळया"

शाळेचा होमवर्क करुन
सकाळीच मुले निघाली असेल
कुण्या लहानग्याने आपल्या
भावंडाला 'टाटा' केला असेल
कुणाला माहिती तो लाडका
खरोखरचं निरोप घेतोय
रक्तविपासूंच्या गोळ्यांनी तो
संपवला जातोय

मुलांमध्ये देव राहतो आणि
त्या देवाकडे माझी तक्रार
देवा कसला हा या
तालिबानांचा न्याय

जीवाच्या आकांताने त्यांनी
काहो फोडला असेल
घाबरून त्यांच्या डोळयात
पाणी आले असेल

तोतऱ्या शब्दांनी त्यांनी
देवाच्या धावा केल्या असेल
त्या क्रुरापासून निसटण्याच्या
सगळया युक्त्या वापरल्या असेल

त्या निरागसांच्या किंकाळ्यानी
न पाझरलास तालिबान तु
तुझ्या या क्रुर हिम्मतीची
खरच दयावी लागेल असहाय दाद
सांगना, धर्माच्या नावावर का हा जिहाद

शेजारच्यासाठी पाळलेला सर्प आता
स्वत:लाच दंश करतोय
निष्पाप निरागस जिवांचा असा
क्रुर अंत करतोय

कोणत्या धर्माने हिंसेचे (समर्थन)
समर्थन केले असेल
कोणत्या कुराणात 'वा' गीतेत
त्याचे संदर्भ भेटले असेल

खुप झाल्या धर्माच्या नावावर
या क्रुर असंबध खेळया
सर्व जग थकलेय, उमलु दया
या निष्पाप कळया
थांबवा हा संघर्ष
हाक दया फक्त
शांततेचा मार्ग निवडून म्हणा हे
हे विश्वचि आमुचे घर.......

**दांडगे वर्षा प्रल्हाद**
मानसशास्त्र विभाग–एम. ए प्रथम वर्ष

## चारोळी

डोळ्यांत अशी लवते ही रात्र चांदण्याची,
हा धुंद गार वारा साद घाली मनाशी ,
तालीम आज होते सळसळत्या पानांची,
कंठी मिळे मला या झंकार ही स्वरांची,
की मीच आहे ग्वाही सुमधुर या गीतांची.......

वात्सल्य हे तुझे मज मिळाले,
आई तु माझी दुनिया गं.....
सांग तुजवर काय त्यागु,
धुंद वाटे जीव गं.....

## स्वरांजली

ही प्रभात विहश्त्या पक्ष्यांची....
ही हवा मंद गारव्याची
कानी मला आज सांगुन गेली
सुरूवात कर तु नव्या गीतांची ....... ।।धृ।।

निळ्या नभात या पाखरे विहरती
धुंद गारव्यात ही गाणी बहरती,
कधी मिळे सुर शब्द नवे
वारा हा साद घेई कल्पतस्त्वी
ही प्रभात .......................... ।।१।।
स्वप्नातली मज गाणी आठवती

प्रेमातली आज भाषा उमलती
स्पर्श होऊनी सुर हे बाबरे
आशा मिळे ही मला भावनांची
ही प्रभात .............. ।।२।।



**सरिता भिमराव घनसावंत**
संगणकशास्त्र विभाग
द्वितीय वर्ष

## माझा भारत स्पर्धेतील भारत

अख्या जगात रे मोठा
अख्या जगात रे मोठा
माझ्या भारताला मान
काळीज फुलून आले
गावु किती गुणगाण

माझ्या भारताची आता
भरारी आकाशात
अवघ्या पैशातच देशानं
मंगळयान केले विकसीत

कृषी क्षेताचा हो आता
साधायचा विकास
धरू विज्ञानाची कास
पाडू समृद्धीचा प्रकाश

पर्यटनाच्या बाबतीत
देश माझा सर्वात पुढे
अजिंठा वेरूळ लेणी
देशाची आभुषणे

प्रगती देशाची पाहून
देश सारेच हरपले
मैत्री कराया देशाशी
पाहुने ओबामा आले.



**रविद्र पंढरीनाथ बागूल**
जनसंवाद व वृत्तविदया विभाग–
बि.ए. एम.सी.जे प्रथम वर्ष

## हासू आणि आसू

सगळे म्हणतात मला
फार सवय आहे हसण्याची
पण त्यांना काय माहित
हि कला आहे, दुःख लपविण्याची,
तुझ्या हसऱ्या चेहऱ्याआड
सारं दुःख लपलं.
तुझं दुःख पाहिलं तेव्हा
माझं दुःख फार कमी वाटलं,
हसरे चेहरे फार दुःखी असतात
कारण हास्याच्या उंबरठयाआड
वेदनेला ते कोंडत असतात
हासू आणि आसू यांत सांगू काय फरक आहे.
एक सुखाचे तर एक दुःखाचे प्रतिक आहे.

**लखे तृप्ती विजय**
एम. कॉम. प्रथम वर्ष

## सुभाषिते

१) उधम :साहस्तं धैर्य बुध्दि : शक्ति : पराक्रम ।
पडेते यत्र वर्तन्ते तत्र साहाय्य कृद विधि : ।।

**अर्थ :–** उदयोगीपणा, धाडस, चिकाटी, बुद्धिमत्ता, शक्ती आणि पराक्रम या सहा गोष्टी जिथे असतात तिथे दैव मदतीला येते.

२)असतो मा सद्गमय,तसमो माज्योतिर्गमंय,मृत्योगांमृतं गमय ।।

**अर्थ :–**असत्या कडून सत्याकडे मला घेऊन जा,अज्ञानरूपी अंध: कारातु मला ज्ञानरूपी प्रकाशाकडेघेऊन जा, मृत्यु पासून अमृतत्त्वाकडे घेऊन जा.

३) न कश्चिदापिजा नाति किं कस्यच्वे भविष्याति ।
अंत: च्व करणीयानि कुर्याद दैव बुद्धिमान् ।।

**अर्थ :–**उदया कोणाचे काय होईल हे कुणालाच माहीत नसते म्हणून शहाण्या माणसाने उदया करावयाची कामे आजच करावीत.

४) नान्नोदक समं दानं न तिथिद्वादशी समा ।
न गायत्र्या: परो मन्त्रो न मातु: परं दैव तम ।।

**अर्थ :–** अन्न पाण्यासारखे दान नाही द्वादशीसारखी शुभ तिथी नाही, गायत्री मंत्रापेक्षा श्रेष्ठ मंत्र नाही आणि मातेसारखे श्रेष्ठ दैवत नाही.

५) अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिस्तथा । द्वावेतौ सुखमेधते यद्भाविष्यो विनश्यति ।।

**अर्थ :–** जो भविष्यकाळाचा विचार करतो व वर्तमानकाळाची परिस्थिती ओळखून जो कार्य करतो असे दोन्ही प्रकारचे लोक सुखी असताता परंतु भविष्यकाळी भाग्य मिळेल तेव्हा पाहू असे म्हणून जो आजचेकार्य उदयावर ढकलतो त्याचा नाश होतो.

६) अन्नदानं परं दानम, विधादानमत: परम ।
अन्नेन क्षणिका पृप्ति: यावज्जीवंच विघया ।।

**अर्थ :–** अन्नदान हे एक श्रेष्ठ दान आहे परंतु विद्यादान हे अन्नदान पेक्षाही श्रेष्ठ आहे, कारण अन्न दाना ने काही क्षणा पुरतीच तृप्ती होते, परंतु विघेमुळे आयुष्यभर तृप्ती व समाधाना मिळते.

७) खिन्नं चापि सुभाषितेन रमने स्वीयं मन: सर्वदा ।
श्रुत्वान्यस्य तुभाषितं खलुमन: श्रोतुं पुनर्वाच्छति ।
अज्ञात्र ज्ञानवतो डप्यनेन हिवशीकर्तुस्त मर्थोभवेत
कर्तव्यो हि स्तुभापितस्य मनुजैरावश्यक: संग्रह: ।।

**अर्थ :–** उदास झालेले मन सुभाषित ऐकून प्रसन्न होते, दूसऱ्या कोणी सुभाषित ऐकवले तर ते मन सुभाषित पुन्हा ऐकण्याची इच्छा करते शिकलेला असो किंवा निरक्षर असो त्याचे मन सुभाषित खेचून घेते व आपल्या ताब्यात ठेवते म्हणून माणसाने आपल्या संग्रहात सुभाषिते ठेवली पाहिजेत.

८) विद्वान प्रशस्यते लोकाविद्वान प्राप्नेति गौरवम । विद्यया लभते सर्वाविद्या सर्वत्र पूज्यते ।।

**अर्थ :–** जगात विद्वानाची प्रशंसा होते विद्वानालाच सन्मान मिळतो, विद्येमुळे सर्वकाही प्राप्त होते, विद्येची पूजासर्व ठिकाणी केली जाते.

**प्रियंका शुभाष सोनवणे**
संस्कृत–एम.ए , द्वितीय वर्ष



## जिजाऊ वंदना

जिजा माऊली तुला वंदितो मी
जिजाऊच र.क्षात वात्सल्य नामी
तुझ्या पाऊली लीन आम्ही सदाही
तुझ्या सावुली लीन कोणीही नाही
नसे दास कोणी नसे राव–स्वामी
जिजा माऊली गं......

तुझ्या धाडसाचे धडे हे आम्हाला
तुझ्या विचारांचे धडे आम्हाला
तयांच्या सवे गाजवू शौर्य आम्ही ।।
जिजा माऊली गं....

तुझी सावली सर्व काळी असू दे
कुडे दु:ख कोणास काही नसू दे:
नसूदे अनोरोग्य अंधार यामी ।।
जिजा माऊली गं....

तुझ्या प्रेरणेने घडो लोक सेवा,
तुझ्या चिंतनाने सुखी काळ व्हावा,
घडो अंत तो शांत साफल्य गामी ।।
जिजा माऊली गं.......
जय जय जिजाऊ जय जिजाऊ

**एकटयानेच**

आयुष्य खुप सुंदर आहे,
सोबत कुणी नसलं तरी,
एकटयानेच ते फुलवत रहा,
वादळात सगळं वाहून गेलं,
म्हणून रडत बसू नका,
वेगळ अस काही, माझ्यात खास नाही असं
म्हणून उदास होऊ नका.
मृगाकडे कस्तुरी आहे.
फुलात गंध आहे.
सागराकडे अथांगता आहे.
माझ्याकडे काय आहे, असं म्हणून रडू नका
अंधाराला जाळणारा एक सूर्य तुमच्यातही लपला
आहे.
अव्हान करा त्या सूर्याला !!!
मग अगवेल तो तुमच्या आयुष्यात नवीन क्षितिज घेऊन.
अंधारामय रात्र संपवून सोनेरी किरणांनी सजून
मग रोजच उगवेल एक नवी सकाळ,
उत्साह ध्येयाने भारुन म्हणून ....
आयुष्य खूप सुंदर आहे,
सोबत कुणी नसलं तरी
एकटयानेच ते फुलवत राह..........

**अमृतवेल (वि.स.खांडेकर)**

**संकलन रामप्रसाद गोट**

भग्न स्वप्नाच्या तुकडयांना कवटाळून बसण्यसाठी मनुष्य जन्माला आलेला नाही ! मानवाचे मन केवळ भूतकाळाच्या साखळदंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही ! त्याला भाविष्याच्या गरूडपंखांचं वरदानही लाभलेलं आहे. एखाद स्वप्न पहाणं, ते फुलविण, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपण धडपडीतला आनंद लुटाणं आणि दुर्दैवानं ते स्वप्न जरी भंग पावलं तरी त्याच्या तुकडयांवरुन रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्याच्या स्वप्नामाग धावण, हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळे !



**कविता**

वडिल माझे कृपेचे सागर,
दिला त्यांनी जीवना आकार,
आई–वडिल माझे थोर,
काय सांगु त्यांचे उपकार,
जीवनाच्या वाटे वरती, किती
असतो त्यांच्या आधार ।।१।।
वडिल माझे कृपेचे सागर ......।।धृ।।

तळपत्या उन्हात अण्
रखरखत्या राणात,
राहिलेत माझ्यासाठी ते उभे,
कष्टाच्या घामात,
कधी घडे त्यांना उपवास,
ओल्या मातीतून चालताना,
तुडविल काटयाचे फास ।।२।।
वडिल माझे कृपेचे सागर ......।।धृ।।

नंदीची चांदणी तुम्ही,
अण् चंदाराची कोर,
शितल तुमची छाया
मला हवी जीवनभर
तुमच्या शितल छाया
मला हवी जीवनभर
तुमच्या शितल छायेमधी
उभं आयुष्य जगेन
बाबा देवापासी ओ,
मी तुम्हालाच मागेन ।।३।।

वडिल माझे कृपेचे सागर ......।।धृ।।

श्री. ह. भ. प.
**वसुदेव महाराज मुंडे**
संस्कृत विभाग–एम. ए



## शेतकऱ्याचा संदेश शेतकऱ्याला

निसर्गाच्या धोक्या पाथी...
जीव माझा कोदला हाय
पण, जगण्या शिवाय दुसरा पर्याय तरी कुंठ हाय?
श्वास मोकळा करुन, हिरव्यागार रानात,
पांढऱ्या पिवळया सोन्यात,
पावसाच्या पाण्यात,
मला बी लय नाचांव वाटतया.
पण, भाग्य तेवढ कुंठ आपलं हाय ?
दारिद्रय आणं दुष्काळ तर,
पाचविलाच पुजल्याला हाय,
ना काबाड कष्ट करुन,
उगवल्याल पिक माझ हाय
ना पाया खालची जीमिन माझी,
ना डोक्यावरंच आभाळ माझं हाय,
मला बी वाटतंया,
मई पोरं बाबासाहेबाच्या रघापीठात शिकवी,
आणं पोरीचं लगीन लई थाटात करावं
पण, आयुष्यातला अंधार,
आणं देवंच जाणू कधी व्हाईल उजाड ?
म्या अनुभवल्याल हेच आपल जीवन हाय
माझ्या मनी आशा, अजून बी हाय नव्हं ?
येडा प्रयत्न माझा,
काळोखात ही उजाड शोधतो.
गरीबीचा अंधार रजवून टाकायचाय,
आणं प्रयत्नांचा दिवा आपल्यालाच लावायचाय.
पण, कसं बोलू?
कसं बोलू ? – थोडा धीर धरा
पण, शेतकरी बंधूनो – माझी बी अवस्था,
तुमच्यासारखी हाय नव्हं?
समदे एक होऊया,
दारिद्रयाची तेरवी आणं संर्घषाचा शेवट करुया.
जगाला पोसऱ्या,
नको करु रं आत्महत्या,
नको घेऊ गळफास,
घेऊ नको शेवटचा घास.
आरं बघ.....
बघ हा निसर्गाची पहाट,
तुझ्या सपनातलील हिरव्या रानात व्हणार हाय
आरं..... तवा कुठं ठिरवं पिक उभं,
नी पांढर सोनं,
तुझ्या शेतात पिकणार हाय रं,
तुझ्याच शेतात पिकणार हाय.



**कु. प्रेरणा दिलीप दीक्षीत**
समाजशास्त्र विभाग
एम. फिळ.

### सुविचार

कोणत्याही गोष्टीसाठी सत्याचा त्याग करु नका, पण सत्यासाठी मात्र कोणत्याही गोष्टीचा त्याग करा

**रविंद्रनाथ टागोर , संकलन : काकासाहेब डिखुळे**

माणसाला जगण्यासाठी भाकरीबरोबरच विचाराचे खादयही गरजेचे असते

**डॉ. बी. आर. आंबेडकर**

जगात कोणत्याही कार्यात यश
मिळवायचे असेल तर एकाग्रता महत्वाची

शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे या शस्त्राच्या बळावर जगदेखील बदलून टाकता येऊ शकते. त्यामुळे शिक्षण घेतले पहिजे.सुर्य चंद्र. आणि सत्य या तीन गोष्टी कुठल्याही स्थितीत अधिक काळ लपून राहू शकत नाही .

सदाचार हाच मनुष्याचा खरा अलंकार आहे **(साने गुरूजी)**

एकाच वेळी एकच काम करा पण असे करताना त्या कामात तुमचे सर्वस्व पणाला लावा

सर्व शिक्षणाचे ध्येय माणूस निर्माण करणे होय

**स्वामी विवेकानंद**

## माझे हे विद्यापीठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद बी.ए च्या तृतीय वर्षात असतानाचं मनाशी निश्चय केला त्याचे वर्तमानकालीन रुप मझे मी या विद्यापीठातील एक हिस्सा बनले. एम.ए करायचे ते या विद्यापीठातील असे ठरविले ते प्रत्यक्षात सार्थ झाले. सुरवातीला जेव्हा आले तेव्हा विद्यापीठाचा निसर्गरम्यपरिसर बघून हरखून गेले. विद्यापीठातील वेगवेगळया झाडांच्या जाती, फुलाच्या जाती, वेली या प्रमाणे इथले विद्यार्थी ही वेगवेगळया विभागातून जिल्हयातून, तालुक्यातून.
खेडयातून आलेली सोबत ममता जिव्हाळा आहेच.

मला सर्वांत जास्त भावतो तो इथला रस्ता दुतर्फा झाडाच्या जणू कमानीच हया कमानी अतिथींच्या स्वागतासाठी नेहमीच सज्ज दिसतात त्यातचं कमवा व शिका योजनेची नारळी बाग सकाळी कमवा व शिका ला जाताना तरुण, वृध्द महिला वॉकसाठी जाताना दिसतात त्याच्याकडे बघून आपणही आपल्या आयुष्यातील काही क्षण हे आपल्या शरीरास द्यावे असे उमजते. मला नेहमी काहीतरी नवीन शिकण्याची आवड आहे. त्यामुळे कमवा व शिका मध्ये लिफाफे फाईल बागकाम असो मनापासून करावेसे वाटते तेथे मला समुहांत काम करण्याची सवय लागली.

विद्यापीठाचा परिसरचं असा आहे की, इथे जेव्हा एखादा कंटाळलेला, थकलेला, निराश झालेला कोणी विद्यार्थी असेल येथील अभ्यासू विद्यार्थी पाहताच त्याच्या उमेद निर्माण होते. विद्यापीठाचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे मोठे सुसज्ज ग्रंथालय व Reading Hall हे जणू ज्ञानगृहणाचे दालनचं आहे. जेवढे घ्यावे तेवढे कमीचं मग उमजायला सुरुवात होते आपण तर या ज्ञानसागरातील थेंब येवढेच ज्ञान आपण मिळावले आहे. Reading Hall मध्ये मला तर भावी IPS, IAS, प्राध्यापक, वकिल, उत्तम शिक्षक, प्रशासक दिसतात.

विद्यपीठाचा कोणताही कार्यक्रम असो मी आवर्जून उपस्थित राहते. कुलगुरु प्रोफेसर बी.ए. चोपडे सर नेहमी नवनविन विषयावरची व्याख्याने म्हणजे आमच्यासाठीची बौध्दिक मेजवाणीचं देतात तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम यामधून विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त कलागुणांना वाव मिळतो. माझ्या आयुष्यात मी प्रथमच एवढा मोठा युवक महोत्सव बघितला तो या विद्यापीठाच्या कृपेने या विद्यापीठात खूप काही शिकण्यासारखे आहे काय घ्यायचे काय नाही हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून आहे.

मला सार्थ अभिमान वाटतो की, मी या विद्यापीठाचा एक भाग आहे. भारतरत्न, महामानवच्या नावे चालणाऱ्या विद्यापीठात मला शिकण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजते.

"विद्येचे माहेर घर
माझे हे विद्यापीठ
सागराहून ही थोर,
माझे हे विद्यापीठ,,



**देवडे भाग्यश्री बाबुराव**
इंग्रजी विभाग-एम.ए. प्रथमवर्ष



## आयुष्य

**"जीवन गाणे गातच रहावे**
**झाले गेले विसरून जावे**
**पुढे पुढे चालावे....**
**जीवन गाणे"**

कालचक्र आपल्या गतीने पुढे सरकत असते पृथ्वी सूर्य तारे सगळे विश्वांच घडयाळ अचुकपणे काम करीत असते.

आयुष्य म्हणजे नक्की काय असते ? मला वाटते आयुष्य म्हणजे नियतीने मांडलेला सुख दु:खाचा खेळ आहे उजळणाऱ्या दिवसा बरोबर नवीन काहीतरी गुपीत उलगडणारं प्रत्येक व्यक्तींने स्वत:ची ध्येय स्वप्न ओळखली आणि स्वत:ला झोकून दिल तर त्या व्यक्तीचे जीवन सुखकर होईल जे भावतं आवडत ते माणसाने मनापासून करावे. ध्येय वेडे होवून आयुष्य जगावे तेव्हा कळेल जीवन खूप सूंदर आहे. या आयुष्यात संघर्ष वेदना सुख दु:ख हे सारे समर्थपणाने पेलावे लागते, पण आयुष्य बदलंण हे आपल्याच हातात आहे त्यासाठी जरा मनापासून प्रयत्न करावा लागतो. आयुष्यात सुख दु:ख हवंच कारण दु:खाशिवाय सुखाची किमंत कळत नाही. तशीच,

जीवनात स्वप्न हवीत, ध्येय हवं सुंदर हसू हवं आयुष्यातील प्रत्येक क्षण समरसून जगून बघा म्हणजे तुमचा सकारात्मक विचारांच्या परीस स्पर्शाने तुमचे आयुष्य कसे सोनेरी होऊन जाईल.

## राजकारणात महिलांचा सहभाग आणि विकास

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात १मे १९६२ पासून पंचायतराज सूरू झाले आहे. पंचायतराजची रचना त्रिस्तरीय आहे. गावापातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरांवर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरांवर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना आहे. त्रिस्तरीय पद्धतीला पंचायत राज पद्धतीला पंचायत राज पद्धती म्हणतात. ७३ वी घटना दुरुस्ती करुन देशातील सर्व पंचायत राज संस्था म्हणजेच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यामध्ये स्त्रियांसाठी ३३% जागा राखीव ठेवण्यात आल्या. या विधेयकाने राजकीय सहभागाच्या कधीही न थांबणाऱ्या एका प्रकियेला सुरुवात झाली. या विधेयकाने देशभरातील दहा लाखाच्या वर स्त्रियांना पंचायत राज्यव्यवस्थेमध्ये आणलं, त्याचा राजकीय सहभाग वाढला. स्वप्नही ज्यांना कधी पाहता आलं नसतं, त्यांना या विधयेकामुळे गावतल्या सत्तेत प्रत्येक्ष हक्काचा वाटा मिळाला. राजकीय निर्णय पक्रियेत स्त्रियांना सहभाग वाढावा या हेतूने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी आरक्षण जाहिर करण्यात आले.

स्त्रियांप्रमाणे मागासवर्गीय जातींनादेखील ७३व्या घटनादरुस्तीमुळे आरक्षण मिळाले आहे. त्यात ३३%मागासवर्गीय जातीच्या स्त्रियांना आरक्षण आहेच. केवळ सामान्य प्रतिनिधीत्व नाही तर सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशी मानाची प्रमुख पदेही स्त्रियांना मिळाली.

गावाचा विकास, पाणी, शाळा, रस्ता, दारुबंदी या सारखे कळीचे विषय माहिलांनी पुढे आणले. दारुबंदीसाठी पंचायती स्त्री सभासदांनी अनेक ठिकाणी प्रयत्न केले काही ठिकाणी यश मिळाले पण बऱ्याच ठिकाणी स्त्रियांना त्रास सोसावा लागला, कारण यातही पुन्हा पुरुषांचेच हितसंबंध असतात.

स्वातंत्र्याप्राप्तीनंतर ४६ वर्षांनी नवा पंचायतराज कायदा आला.त्यामुळे स्थानिक स्वराज्य भागातील कानाकोपऱ्यातू दुर्गम आदिवासी, डोंगराळ भागातून स्त्रियांचे नेतृत्व पुढे यायला लागले. अनंत अडचणींना तोंड देत देतच आपल्या परिसरात ग्रामविकासाठी आणि जनविकासासाठी या महिलांनी विशेष कामगिरी करुन दाखविली आहे.

१९४७ नंतर स्त्रियांनी इतर क्षेत्रांप्रमाणेच विधिमंडळाच्या क्षेत्रातही पदार्पण केले. नवीन विधिमंडळे अस्तित्वात आली, यातही महिला उमेदवार म्हणून उभ्या राहिल्या आणि त्यापैकी सात निवडून ही आल्या.या सात महिला सदस्यामध्ये सुमती गोरे व ताराबाई मोडक यांचे विधान सभेतील कार्य लक्षणीय होते. मृणाल गोरे यांनी आपल्या विधानसभेतील एक आदर्श घालून दिला. अनेक वर्ष पक्षासाठी काम करणाऱ्या स्त्रिया असुनसुद्धा निवडणुका लढविण्यासाठी संधी त्यांना दिलेली नाही, पण शिक्षणामुळे, चळवळीतील अनुभवामुळे नव्या भांडवली समाजातील वाढत्या गरजांमुळे स्त्रियांमध्ये एक वेगळी जागृती निर्माण झाली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. दुय्यम स्थानांची चीड आणि हक्कांची जाणीव निर्माण झाली. बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे, सामाजिक सुधारणांच्या रेटयामुळे आणि १९७५ नंतरच्या स्त्री चळवळीच्या वाढत्या जोरामुळे स्त्रियांच्या राजकीय हक्कांबद्दलची त्यांच्या प्रत्यक्ष सहभागाविषयीची जाणीव वाढली. राजकारणातील प्रवेशाशिवाय काही गोष्टी साध्य होणार नाहीत ह्या विचाराने सर्वच स्तरातील औपचारिक राजकारणांमध्ये स्त्रिया अधिक प्रमाणात दिसू लागल्या आहेत.

स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून एक स्वतंत्र माणूस पुरुषांच्या बरोबरीने हक्क आहे याची जाणीव झाल्यामुळे असा हक्क मिळण्यासाठी तिची धडपड सुरु झाली, यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्त्री संघटना स्थापना झाल्या. या स्त्री संघटनांनी गुलामगिरीतून, अत्याचारातून स्त्रियांना आधीपासूनच काही राखीव जागा महाराष्ट्रात असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांत काम करणाऱ्या त्यातून वरच्या राजकारणात सहभागी माहिलांची संख्या महाराष्ट्रात अधिक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणात वाढण्यास ७३व्या घटनादुरुस्तीमुळे मोठा हातभार लागलेला आहे व हा सहभाग प्रत्येक निवडणुकीत वाढलेला दिसून येतो.

एकूण लोकसंख्येत जवळ-जवळ पन्नास टक्के स्त्रिया असूनही राजकारणात स्त्रियांना मतदानाची हक्क नव्हता. तो हक्क मिळविण्यासाठी स्त्रियांना लढा द्यावा लागला. राजकारणात सहभाग घेण्यासाठी ३३% आरक्षणही झगडा करुनच मिळवावे लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ४६वर्षांनी नवा पंचायतराज कायदा आल्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय चित्र बदलायला लागले. स्थानिक स्वराज्य संस्थात आपल्या बुद्धिची चुणूक दाखविली. अगदी ग्रामपंचायतीची सभासद, सरपंच या पदापासून मंत्रि पदापर्यंत स्त्रिया पोहचल्या आहेत.

शहरी स्त्रियांना सर्वच दृष्टीने जास्त वाव मिळत असला तरीही ग्रामीण स्त्रियाही फार मागे राहिलेल्या नाहीत.

श्रीमती इंदिरा गांधी, बेनझीरभुट्टो, सिरोमाओ बंदरनायके अशा स्त्रियांनी पंतप्रशानपदाची जबाबदारी घेऊन देशाचा कारभार समर्थपणे सांभाळला आहे. बहुमान असलेले राष्ट्रपती पदावर प्रतिभाताई पाटील विराजमान होत्या. याचा सर्व स्त्रियांना निश्चितच अभिमान आहे.निरनिराळया क्षेत्रांत त्या सहजरित्या यश संपादन करत आहेत. कुठेही आणि कोणत्याही बाबतीत स्त्री म्हणून त्या कमी पडत नाहीत, जरी अजुनही पुरुषाची श्रेष्ठता ही मानासिकता पूर्णपणे बदलत नाही. उच्चपदावन स्त्री आलेली त्यांना खपत नाही. कर्तृत्त्वाला किंमत न देता स्त्रियांना डावलले जाते. अनेक ठिकाणी अनेक ठिकाणी अनेक स्त्रियांना हा अनुभव येत असतो. याच अगदी

ढळढळीत उदाहरण म्हणजे भारतातील आपल्या महिला आयपीएस अधिकार किरणबेदी समर्पणाने काम करण्याच्या वृत्तीमुळे प्रतिष्ठेचा मॅगसेस पुरस्कार त्यांना मिळाला आहे. राष्ट्रपतीचे शौर्यपदक मिळाले आहे. उल्लेखनीय सेबेबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाचा बहुमान त्यांना मिळालेला आहे.

अतिशय कर्तृत्त्वान आणि कार्यकुशल असुनही केवळ महिला म्हणूनच दिल्लीच्या पोलीस आयुक्तपदाची संधी त्यांना नाकारण्यात आली. समाजातील तळागाळातील लोक अजुनही खऱ्या अर्थी गाळातच आहेत. प्रत्येक्ष कृतीपेक्षा घोषणाच अधिक होतात, बोलबाला होतो, पण समाजाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात हा वर्ग अजून आलेला नाही.

**आजची महिलांची स्थिती आणि राजकारण :**

एकीकडे सर्वच क्षेत्रांत स्त्री–पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रसंगी आधिक कौशल्य दाखवून काम करताना दिसते आणि दुसरीकडे मात्र सर्व स्तरावर स्त्रीच शोषण करण्याची पुरुष शोषणाची मानसिकताही बळावतांना दिसते ही शोषणाची परंपरागत मानसिकता बदलण्याला होत जाईल अशीच भौमिक परिस्थिती चौफेर आहे.

वास्तविक स्त्री–पुरुष समानतेचा प्रश्न हा नव्या समाजरचनेच्या निर्मितीतील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ भावनिक नसून त्याला भौतिक व वास्तव निर्भीडपणे दाद मागण्याची स्त्रियांची मानसिकता तयार करणं महत्त्वाचे आहे. स्त्रियांसाठी कायदे करुन त्याला पूर्णपणे आवर घालता येत नाही, कायदा हा काही सामाजिक परिवर्तन होणे त्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. गेल्या दशकाती समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणावर भर दिला होता तरी स्त्रीच्या दुय्यम स्थानत अजुनही फरक पडलेला नाही. पुरुषांच्या आाणि बहुसंख्य स्त्रियांच्याही मनोवृत्तीत अजुनही फारसा फरक पडलेला नाही. स्त्रियाही स्वत:ला कमी समझतात. पुरुषांपेक्षा आपल्याला कमी पडलेला नाही. स्त्रियाही स्वत:ला कमी समझतात. पुरुषांपेक्षा आपल्याला कमी समजले जाते अशा स्त्रियांनी स्वत: मधील न्यूनगंड काढून टाकायला हवा.

नवऱ्याच्या अस्तित्व व प्रतिष्ठा यावर स्त्रीची किमंत होते, नवऱ्याच्या अस्तित्वावर तिची रुपंही बदलतात, नवरा असलेली सौभाग्यवती, नवरा गेलेला ती विधवा, नवऱ्याने सोडलेली तो परित्यक्ता अशा बिरुदावल्या स्त्रियांनाच लावल्या जाता

आजही हळदी–कुंकवासारखे समारंभ साजरे केले जातात, त्यात विधवा स्त्रियांना बोलावलं जात नाही आणि अगदी आम्ही खूप प्रगती केली आहे असं म्हणणाऱ्या विधवा स्त्रियांना बोलवतात पण त्यांना हळदी–कुंकु लावत नाहीत. जिला नवरा आहे तिलाच तो मान असतो. म्हणजे खऱ्या अर्थी हळदी–कुंकु हा समारंभ अप्रत्यक्षरित्या पुरुषांचाच असतो. स्त्री–पुरुष समानतेची मागणी करताना आणि त्याचा आग्रह धरतांना निदान आम्ही सर्व स्त्रिया समान आहोत, आमच्यात पुरुषांच्या अस्तित्वामुळे कोणताही फरक आम्ही करणार नाही असे स्त्रिया मानत तोपर्यंत एकूणच समानता घडवून आणणं ही गोष्ट अवघड आहे.

शहरी वातावरणात थोडयाफार प्रमाणात सुशिक्षित स्त्रियांच्या विचारसरणीत बदल होतोय पण संख्यात्मक दुष्टीने हि परिस्थिती नगण्य नागण्य आहे. शतकानुशतके अजूनही बराच कालावधी लागणार आहे.

राजकीय पक्षांच्या स्त्री कार्यकर्त्यांना पक्षाचे सामाजिक व राजकीय अशा दोन्ही प्रकारच्या प्रश्नावर भर द्यावा असे वाटते. स्त्रिया बौद्धिक दृष्टीने कमी पडत नाहीत पण स्त्री म्हणून तिच्यावर पडणाऱ्या मर्यादामुळे त्या पुरुषांच्या मागे पडतात. महाराष्ट्रात सर्वच पक्षांत स्त्री सभासदाचे प्रमाण कमी आहे. काँग्रेस पक्षात त्या मानाने ते अधिक आहे. तरीही नि:स्वार्थी तळमळ, निष्ठा असे गुण जोपासून खऱ्या अर्थाने ज्यांना पक्ष कार्यकर्ता म्हणता येईल अशा कार्यकर्त्यांची संख्या मात्र कमीच आहे.

स्त्रीया कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या असल्या तरी त्या पुरुषी वर्चस्वाच्या बळी आहेत. स्त्रीची दुर्बलता ही नैसर्गिक नसून अशा शोषणामुळे ती आलेली आहे. तिची दडपणूक करुन तिच्यावर दुर्बलता लादली असल्यामुळे तिच्यातील क्षमताही तिला कळेनाशा झाल्या अशी तिची अवस्था झाली.

राजकारण हे स्त्रियांचे क्षेत्र नव्हे, असा समज पुरुषांनी पद्धतशीरपणे स्त्रियांच्या मनात रुजविला. त्याचा अतिशय खोलावर परिणाम स्त्रियांच्या मनावर झाले आणि राजकारणापासून दूर राहणेच योग्य आहे असं त्या मान लागल्या.

म्हणूनच निवडणुकीच्या राजकारणापासून स्त्रि अलिप्त राहत होत्या. त्याची प्रमुख कारणे म्हणजे घरातल पुरुषांचा विरोध आणि असहकार.

भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान समान हक्क दिले. यामध्ये राजकीय हक्क आहेतच पण हे हक्क वापरण्यासाठीची परिस्थिती मा अनुकूल नाही. आर्थिक विषमता, स्त्री–पुरुष भेद, सर्व क्षेत्रांतील पुरुषी वर्चस्व आणि सर्वस्वी असलेली कौटूंबि जबाबदारी यामुळे स्त्रियांना फारस प्रोत्साहन देत नाही.

**समारोप :**

गेल्या पाच वर्षामधल्या निरनिराळया राज्यांमधल विधानसभा आणि या वर्षीच्या लोकसभा निवडणुकांमधू स्त्री–मतदारांच्या राजकीय सहभागाविषयीचं काही आशादायक चित्र निर्माण झाल आहे.

देशपातळीवरच्या स्त्रिया महत्त्वाची पद भूषवत आहेत, असं चित्र भारतात इंदिरा गांधीच्या काळापासून अपवाद नाही.


संदर्भ :-

१) सकाळ शब्ददिप दिवाळी अंक ऑक्टो-२०१४.

२) भारतातील महिला विकासाची वाटचाल, लेखक ज.स.आपटे व पुष्पा रोडे.

३) महिला सत्ता संघर्षाचा आलेख, लेखक वैशाली पवार आणि बाबा आढाव.





**वर्षा उत्तमराव नलावडे**

राज्यशास्त्र विभाग- संशोधक विद्यार्थी




## " कासरा "

दिड महिना झाला तरी सुखदेवन अंघोळ केली नव्हती अंगावर घामाचे ओंघळ येऊन जागीच जिरले होते. त्याच्या अंगाचा वास यायला लागला होता. कवटीच्या कपारित घारे मिचमीचे डोळे. काळवंडलेला चेहरा. दाढी वाढलेली, खूप दिवसापासून केसाचा आणि कंगव्याचा सबंध आला नव्हता, डोक्यावरच्या टोपीच्या कडा घामाने तांबडया झाल्या होत्या, मळलेला सदरा, ओठावर पांढरी बुरशी, तोडावरचा घाम पुसून काळा पडलेला खांद्यावरचा रुमाल, बोटांची नखे वाढलेली, पायात तळाला फाटलेला जोडा, या सर्व साजासहित सुखदेव वसरीच्या डीळीला पाठीचा कणा टेकून बसला होता. कुडाच्या तुऱ्हाटीची बारिक काडी हातात घेऊन जमिनीवर रेघुट्या वढत होता. त्याचं डोकं विचाराने तुडूंब भरलं होत. त्याची नजर दुरवर ओसाड माळरानावरुन फिरुन त्याच्या हातातल्या तुऱ्हाटीच्या काडीजवळ एकत्र येत होती. पुन्हापुन्हा रेघुट्या वढत होता.

गोठ्यात बांधलेल्या बैलाला पाणी कुठून आणावे? हा प्रश्न त्याला पडला होता. गेले दोन वर्ष पाऊस पडला नव्हता. सुरवातीला एक पाऊस पडला अन नंतर पीक फार सुकून मेलं होत. एखाद्या लसलसीत गोंडस मुलाला एखाद्या टी.बी. सारख्या महारोगनं मारुन टाकावं अशी त्या कोवळ्या पिकाची अवस्था झाली होती. प्यायच्या (पिण्याच्या) पाण्याचा मोठा प्रश्न गावात निर्माण झाला होता.

हि तर मार्च महिण्याची सुरवात होती या दिवसात गहु व हरभरा मोठा हिरवागार दिसतो पण या वर्षी सर्व भकास झालं होत. मेल्यागत शेतमळे झाले होते.सगळ भयान लागत व्हतं.

उन्हं डोक्यावर आली तरि सुखदेव त्याच ठिकाणी टेकलेला होता. ता गोठ्यात बांधलेल्या एक बैलाकडे पाहत होता. तो उठला आणि अंगणातल्या रांजणातुन मग्यानं अर्धी बादली पाणी काढल. गोठ्यातल्या बैलापुढे मांडलं. बैलानं त्याला तोंड सुद्धा लावलं नाही बैलाच्या तोंडाला फेस आला होता बिमार मानसासारखी त्याची चारा पाण्यावरची वासनाचं मेली होती निर्जीव डोळ्यानं तो सुखदेवकडे पाहत होता. कानावरच्या गोमाशा उडवण्याची ताकद सुद्धा त्याच्यात राहिली नव्हती. डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहत होत्या.

एके काळी त्याच्या भर जवानीत त्यानं अंगावर माशी सुद्धा बसू दिली नाही. सुखदेवचा आवाज ऐकून कान टवकारायचा, टोपल्यातला आलप मोठया आनंदानं उठून उभा राहायचा चार बैली नांगर दोनच बैल खसाखसा ओढीत न्यायचे अंगावर लदलद मांस होतं.मस्ती होती कारण खायला प्यायला होत आता डोक्यावर फक्त चार पाच किलोचे शिंगाड उभे होते या शिंगाचा त्याला भार झाला होता. कसेतरी त्यानं तोलुन धरले होते अंगावर मोहोळ बसावं तशा गोमाशा बसल्या होत्या शेंपूट सुद्धा निर्जीव झाली होती शिंगाचा भार सोसवत नसल्याने तो तळमळायचा अंगात काही बळच उरलं नव्हत चारा नाही, पोटभर पाणी नाही. कडब्याची पेंढी महाग,तर आलप कुठून आनायचा ?

वावरात हिरवळ राहिली नाही मोकाट जनावरानं आपल्या दाताडानं खरडून खरडून खल्लास करुन टाकली. उंच झाडाचा पाला लोकांनी वरपुन काढला होता. आता मोकाट जनावर रानात हाकलुन दिली तरी जात नव्हती वावरात दगड माती शिवाय कहीही उरलं नव्हत. सापळ्यासरखी झाडं उभी होती

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न राक्षसासारखा उभा राहिला होता. दोन मैलावरुन महादेवाच्या मळ्यातुन पाणी आणावं लागत व्हंत एका खेपेतच मानसाला खुप दम लागायचा जीव मेटाकुटीला यायचा. सुखदेवने सकाळपासून तीन खेपा केल्या होत्या. त्यामुळे तो दमुन बसला होता.

जगणं कठीण झालं होत पाण्यावाचुन जीव कासावीस होत होता. पाणी घरात फक्त स्वयंपाकासाठीच वापरलं जात होत. सुखदेवची बायको चुलीवर दोन भाकरी थापून भिंतीला ठेकून बसली होती. पाठीचा कणा वाकला होता सुकूरुत्या पडून चेहरा काळवंडला होता. वाऱ्यामुळे केसांत धुळ जमा झाली होती. तिच्याही अंगाचा वास येत व्हता. एखादया डंगऱ्या गरिब गाईसारखी तिची अवस्था झाली होती.

सुखदेवला दोन मुली. मोठी लग्नाला आलेली होती, कर्जाचा डोंगर झाला होता. घरातल सर्व आधीच गहान पडल होत नवीन कर्ज कोण देणार ? हा प्रश्न त्याच्या डोक्यात थैमान घालत होता. दोन बैलापैकी एक चारा-पाण्याच्या अभावी मेला होता दुसरा सुद्धा तीन-चार दिवसात मरणार या अवस्थेत दिसत होता, जीवा-भावाचे बैलं डोळ्यासमोर मरतांना काळीज हादरुन जात व्हत. घरात दोन मुली एका बायाको आणि खायला अन्न नाही. पावसाची वाट संपली होती. कोरडा व गरम वारा वाहू लागला भूकेचा आग्नी पोटात तडफडत होता.घशाला कोरड पडली होती. शारिरासोबत मन सुद्धा जळत होत. या भयानक दुष्काळात गावाला पूर्ण घेरलं होत.

सुखदेव याला कंटाळला होता आता सहन शक्ती संपली होती. हातात काही उरल नव्हतं.


संध्याकाळ झाली होती. सुखदेवनं सर्वासोबत दोन घास जेवन केलं होतं आणि मला जास्त भूक नाही असे सांगून खाटेवर जाऊन पडला होता. विचारात चक्र आता थांबल होतं. आता सुखदेव रात्र होण्याची वाट पाहत होता. जेवण करुन बायको व मुली झोपी गेल्या. दिवसभर राबुन थकलेले त्यांचे चेहरे निपचीत झोपले होते.

भिंतीला खुंटीला मेलेल्या बैलाचा कासरा गुडाळून ठेवलेला होता. रात्रीचे अडीच वाजले होते. सुखदेव खाटेवरुन उठल्या घरात दिवा मिनमिनत जळत होता. अन त्यांन भिंतीचा कासरा हातात घेतला आणि हळुच दरवाजा उघडून बाहेर पडला. तोच कासरा त्याच्या पश्नाचे उत्तर होता. थैमान घालणाऱ्या प्रश्नाला आता तो मुठमाती दयायला चालला होता. वार मंद वाहत होत चंद्राच्या पुसट उजेडात त्याला शेताची वाट दिसत होतो. एका ठिकाणी बांभळीच्या झाडाखाली थांबुन त्यानं लांबचा चहाळ घेतला कुत्र्याच्या भुकण्याचे आवाज येत होते सारं गाव चिडिचीप झोपलं होत.

आणि सुखेदवनं गळयाला फास लाऊन एका क्षणात आपल्या शरिराला कायम मुक्त केल होत फक्त निर्जीव शरिर बांभळीच्या झाडाला मंद वाज्याच्या झोतात लटकत होत.



विनोद उत्तम मोरे
एम.ए. प्रथम वर्ष



## समाजासाठी आदर्श व बहुआयामी विद्यार्थी घडवीणारे विद्यापीठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना नाव देणारे विद्यापीठ म्हणून नावारूपाला आलेले विद्यापीठ आहे. अगदी महाराष्ट्राची संस्कृती जपणारे व मराठवाडयाच्या राजधानीत वसलेले हे विद्यापीठ खरच समाजासाठी आदर्श व बहुआयामी विद्यार्थी निर्माण करणारे विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ आम्हा विदयार्थ्यांची जन्म भुमीच नाही तर ती आमची कर्मभूमी सुद्धा आहे. हे आम्ही विसरू शकत नाही.

समाजाच्या कल्याणासाठी व विकासासाठी आदर्श विदयार्थी घडविणारे हे विद्यापीठ आहे या विद्यापीठाचे आम्हा विदयार्थ्यावर फार मोठे उपकार आहेत ते आम्ही आविष्यभर विसरू शकत नाही या विद्यापीठाच्या मातीतच अशी शक्ती आहे. व प्रेरणा आहे की या विद्यापीठात शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही आजही या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी देशात व परदेशात वेगवेगळ्या हुद्यावर आपले काम चांगल्या प्रकारे करतांनी व डॉ बाबासाहेबांच्या नावाने चालणाऱ्या या विद्यापीठाचे नाव सुवर्ण अक्षरात कोरण्याचे काम आज या विद्यापीठातील विद्यार्थी करतानी दिसत आहे. आम्ही लोक अभिमानाने सांगतो या विद्यापीठातील विद्यार्थी हा बहुआयामी, हजरजबाबी, विनोदी, लेखक कलाकार, नाटककार, शिक्षक, प्राध्यापक, इंजिनियर, डॉक्टर, वकील, राजकीय, नेते, सामाजीक कार्यकर्ते शास्त्रज्ञ व तसेच उत्कृष्ट शेतकरी घडविणारे विद्यापीठ हे खरच किती ग्रेट आहे.

या विद्यापीठाने समाजाच्या कल्याणासाठी किती आदर्श निर्माण करणारे व समाजाच्या सुखांत व दुखात

सामील होणारे विदयार्थी निर्माण केलेले आहे. हे आम्ही विसरू शकत नाही. हे विदयापीठ म्हणजे विदयार्थी केंद्रीत विद्यापीठ आहे. या विद्यापीठातील कोणतीही योजना ही विद्यार्थ्यांच्या कल्याणाचाच विचार करते.

आज समाजसाठी खरी गरज आहे समाज सेवक, सामाजीक कार्यकर्ते निर्माण करण्याची व मागास समाजाला प्रवाहात आणण्याची व अगदी तेच महत्वाच काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विद्यापीठाने मराठवाड्याच्या मातीतील ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांच्या वारकंऱ्यांच्या विद्यार्थ्यांना यशाचा किरण दाखवण्याचे काम आज ५० वर्षा पेक्षा जास्त वर्षापासून करतय हे या ठिकाणी नोंदावस वाटत.

याच विद्यापीठाने विद्यार्थ्यांना शिकवीले आपण किती जगतो हे महत्वाचे नाही तर आपण कसे जगतो हे महत्त्वाचे आहे. या विद्यापीठातील विद्यार्थी हा आदर्श व बहुआयामी असतो त्याची कोणत्याही प्रसंगी काणत्याही विषयावर चर्चा करण्यसाठी तयारी असते. आणि त्यामुळे तो विद्यार्थी हजारात एक असा शोभून दिसतो.

याच विद्यापीठाने शिकविले सहकाराची ताकत याच विद्यापीठाने सागितंले समाजातले राजकारण, याच विद्यापीठाने कि माझा विद्यार्थी हा आयुष्यभर सघंर्ष करणारा विद्यार्थी तोआदर्श व बहुआयामी असला पाहीजे.

या ठिकाणी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाचे आभार मानतो की या आयुष्यहुनही प्रिय अशा मातीत मला शिक्षण घेता आलं. तसेच ज्यानी मला शिक्षण घेण्यासाठी मदत केली अशा माझ्या आई वडीलांचेही मी या ठिकाणी रुण व्यक्त करतो व ज्यांच्या आर्शिर्वामुळे व प्रेरणेमुळे मी या महान विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी आलो अशा आदरणीय माजी आमदार कैलासरावजी पाटील (आंबा) चिकटगावकर यांचे आभार मानतो व या ठिकाणी थांबातो.



**भागवत कुर्मादास निकम**
समाजशास्त्र एम ए–द्वितीय वर्ष



### "स्त्री–पुरुष समानतेची गरज"

स्त्री–पुरुष समानता असायला हवी, असे प्रत्येकाला जरी वाटत असले तरी ती मान्य करायला कुठलाही पुरुष धजणार नाही, ही वास्तविक स्थिती आहे. आजच्या समाजव्यस्थेमध्ये म्हटले जाते की, स्त्री आणि पुरुष ही जीवनरूपी रथाची दोन चाके आहेत. परंतु प्रत्यक्षात बघितले तर रथाला मात्र दोन चाके आणि समोर एक घोडा असतात. म्हणून स्त्री पुरुष ही सायकलची दोन चाके समजली जातात. आजच्या या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये सायकलचे समोरचे चाक पुरुष आणि मागील चाक स्त्री समजले जाते. सायकलच्या समोरच्या चाकामागोमाग मागचे चाक चालते म्हणजेच याचा अर्थ असा घेतो की, स्त्री ही नेहमी पुरूषाच्या मागेमाग चालत असते. म्हणूनच स्त्री आणि पुरूष यांना सायकलच्या चाकांची उपमा दिली जाते. सायकलच्या मागच्या चाकाचा एक नाही दोन–दोन ब्रेक असतात. त्याच प्रमाणे आजच्या या समाजात स्त्रीवर वेगवेगळ्या कार्याचा भार सोपवून जसे घरकाम, शेतीकाम इ. तीच्यावरच बंधने घातली जातात, तीला नेहमी पुरूषापेक्षा तुच्छ समजले जाते. असे का ? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक स्त्री–पुरूषाजवळ आहे. परंतू ते उत्तर देण्याची क्षमता मात्र कुणामध्येही नाही.

स्त्रीयांना सुद्धा मन आहे, स्वाभिमान आहे परंतु या निर्दयी समाजाला तीचे मन कधी कळलेच नाही. म्हणतात.

स्वामी तीन्ही जगाचा
आईविना भिकारी

आई ही सुद्धा एक स्त्रीच आहे. मी असे म्हणणार नाही की फक्त स्त्रीच आहे. स्त्री आणि पुरुष हे दोघेही श्रेष्ठ आहे. स्त्री आणि पुरुष हे दोघेही श्रेष्ठ आहेत. परंतू या श्रेष्ठतेमध्ये दोघांसाठी वाटा समान असायला पाहिजे.

स्त्री–पुरूष ही जीवनरूपी रथाचीच चाके आहेत. रथाला तीन चाके म्हणजेच मागील दोन चाके अणि समोर एका घोडा असतो.रथ एकटी स्त्री किंवा एकटा पुरूष यांच्यामुळे चालणार नाही तर यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांचीही आवश्यकता असते. याचाच अर्थ स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये समानता असल्याशिवाय जीवन रूपी रथच काय संपूर्ण समाजव्यवस्थेचे पानही हलू शकत नाही, हे आपणास नव्याने सांगायला नको. आता तरी आपणास जाणीव झाली असेल की, आजच्या समाजव्यवस्थेमध्ये स्त्री–पुरुष समानतेची अत्यंत गरज आहे.

"स्त्री पुरुष समानता
हीच समाजाची निवड आता
चला निर्माण करूया
नवीन स्त्री–पुरुषसम समाजव्यवस्था."



**कु प्रतिक्षा नारायण टिकार**
एम. फिल –अर्थशास्त्र



## खरंच का आम्ही सावित्रीच्या मुली ?

सावित्रीबाई फुले यांच जयंती ३ जानेवारीला सर्वच क्षेत्रातून साजरी होते. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना तुच्छतेची व क्षुद्रतेची वागणूक दिली जायची. त्यांच्यावर अन्याय व अत्याचार व्हायचा, शिवाय त्यांना शिक्षणापासून हेतुपुरस्पर दूर ठेवले जायचे. त्याकाळात साावित्रीबाईनी आपल्या पतीने–ज्योतिबांनी लिदेल्या प्रेरणेचा व संधीचा सदुपयोग केला.स्वत: शिक्षण ग्रहण केले आणि इतर भगिनींना शिक्षित करण्याचा त्या काळात धाडस दाखविलं ठरलेलं कार्य जोमाने सुरू केले. या दाम्पत्याला समाजाचा तीव्र विरोध व रोष पत्करावा लागला. त्या माऊलीने अंगावर शेण, चिखल व दगडांचा मारा सहन केला. पण आपला निश्चय बदलला नाही.

तिचे कार्य थांबले नाही. मुलींची शाळा, हरिजनांची शाळा, पौढ शिक्षण व रात्रीची शाळा हे सारे नवनवीन कार्य, वेगवेगळे प्रयोग यशस्वीपणे चालूच राहिले. त्यांच्याच पुण्याईने स्त्रीला शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणाने स्त्रीला स्वत:च्या आस्तिवाची व स्वत्वाची जाणीव व्हावी, पारंपारिक गुलामगिरीतून तिने स्वत:ला मुक्त करावे, वैचारिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळावावे व स्वता:चा विकास साधावा हे साावित्रीबाईमुळे आजच्या स्त्रीने खरोखर मिळवलं आहे का ?

एकीकडे प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. हे खरं आहे. त्याचा आपल्याला सार्थ अभिमानही आहे. आर्थिक स्वावलंबनही स्त्रीने काही प्रमाणात मिळविले आहे. स्त्री स्वत:कडे **"एक स्त्री"** म्हणून सन्मानाने बघते का ? तिचे स्त्रीत्व तिला अडसरच वाटतंय का ?

प्रसूतीपूर्व गर्भाच लिंगनिदान (Sonography) ही कायद्याने बंदी असूनही सहजपणे चालूच आहे. स्त्रीभ्रुणहत्या ही सुरुच आहे. कन्या अपत्याचा जन्मदर घटतोय. मुलाच्या तुलनेत मुलींची संख्या कमी होत आहे.खेडयातली अडाणी स्त्री असो, की शहरातील नोकरी करणारी सुशिक्षित स्त्री असो. गर्भाच्या लिंगनिदानाला ती विरोध का करू शकत नाही ? स्त्रियांना दागिने, साडया व चैनीच्या वस्तू हव्या असल्या तर त्या हट्ट करतात. अगदी करतात. अगदी एकत्र कुंटूंबातून विभक्त होण्याचा हट्टही केला जातो. तो पूर्ण करुन घेतला जातो, तो पूर्ण करून घेतला जातो. मग हीच स्त्री मी माझा गर्भाच लिंगनिदान करू देणार नाही, कन्या अपत्याचा घरात प्रेमाने स्वीकार करावाच लागेल, असा आग्रह का धरू शकत नाही? भृणहत्ये विरुध्द तिचा विरोध दुबळा का ठरातो ? का कुठेतरी या मातेचीही याला संमती असते ? एक स्त्री म्हणू स्वत:कडे सन्मानाने बघण्याची दृष्टी नसेल, स्वत:चा माणूस म्हणून आदर नसेल तर मुलगा हवाच या बुरसटलेला वैचारकि गुलामगिरीतून तिची सुटका कशी होईल.

शिक्षण मीळवूनही आज एकविसाव्या शतकात स्त्री जर अशी दुबळी ठरत असेल, स्त्रीजन्म नाकरण्यात पोटच्या गोळ्यच्या हत्येत तिचा सहभाग असेल, तर त्या माऊलीने (सावित्रीबाइंनी) आमच्या प्रगतीसाठी, आमच्या प्रगतीसाठी, आम्हाला पुरुषत्राचा गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, आमच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता एक माणूस म्हणून सन्मानाने जगता येण्यासाठी घेतलेल्या कष्टाची आम्ही किती जाणीव ठेवतोय याचा विचार करण्यासाठी वेळ आज आली आहे. नाहीतर या पुरुषसत्ताक संस्कृतीत स्त्रीचे अस्तित्व नष्ट व्हायला क्षणाचाही विलंब लागणार नाही.

तेव्हा खरंच का आम्ही साावित्रीच्या मुली ? हा प्रश्न एकदा स्वत: ला विचारुन बघुया. तरच साावित्रीबाईच्या कार्याचं, त्याच्या परिश्रमाचं आम्हा स्त्रियांना स्मरण आहे असं म्हणता येईल. तेव्हा म्हणावंसं वाटंत.

नका करु गर्भजल परीक्षा जन्माला येण्याआधीच
नका देऊ तिला शिक्षा–मुलगी आहे अनमोल् दिक्षा
ठेवा तिला जतन करुन नऊ महिने उदरात

**कु. जयश्री प्रल्हादराव शिंदे**
एम. फिल –शिक्षणशास्त्रप्रथम वर्ष

## रासेयो नैतिक शिक्षणाचे केंद्र

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणने या उद्दीष्टाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच २४ सप्टेंबर १९६९ साला पासून राष्ट्रीय सेवा योजनेला सुरुवात झाली. महाविद्यालीन विद्यार्थ्यामध्ये स्वावलंबन, चारित्र्य सामाजिक एकात्मा, नितिमुल्य यांचा समन्वय घडवून आणण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकार घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वीकार करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे बोध वाक्य “Not Me But You” हे आहे. या बोधवाक्याप्रमाणे विद्यार्थ्यी कार्य करीत असतो. आपणास समाजात विलिन होण्यासाठी ज्या गुणांची गरज असते. त्या गुणांचा विकास राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे आपल्यात घडूण येतो. राष्ट्रीय सेवा योजने मुळे साक्षरतेचे प्रमाण वाढून निरक्षरतेचा दर कमी होतो आहे. नेतृत्व गुण धारण करुण लोकशाही प्रवृत्तीचा विकास राष्ट्रीय सेवा योजनेत घडून येतो. राष्ट्राबद्दल आदराची भावना, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधीलकीची जाणीव राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विकसित होते. समाजातील गरीब लोक, दुर्बल घटक यांची सेवा करण्याची इच्छा राष्ट्रीय सेवा योजनेमुळे जागृत होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे अनेक फायदे आहेत. या योजनेमुळे समाजातील विविध सामाजिक संस्थाचा परिचर होतो. राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन स्थरावर राबविल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच समाजसेवा करणे आपल्या आसपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळूण त्यांना समजावून घेवून रचनात्मक कार्य करणे समाज सेवेच्या माध्येमातून स्वत:चा विकास करणे, ही राष्ट्रीय सेवा योजनेची उद्यीष्टे आहेत.

मी राष्ट्रीय सेवा योजनेचा एक स्वयंसेवीका आहे. गेली पाच वर्षे पासून मी या विभागात काम करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधवाक्य प्रमाणे मी माझे काम करीत आहे. आणि पुढे सुध्दा असेच करणार आहे. माझे राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक/स्वयंसेविकांना आवाहन आहे की आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आहोत. त्या मुळे प्रत्येक स्वयंसेवकाने सामाजिक कार्यात भाग घ्याव ही नम्र विनंती .



## जिवलग मित्र–वृक्ष

जेव्हा होतास छोटासा तुझी निगा मि राखली काही दिवसांनी
तुला नवी पालवी फटली नव्या शाखा फुटताच जुणी पालवी
सुखली छोटया छोटया फांदीवर तुझ्या फुलेही लागली

आता झाला तु मोठा तुझी उंचीही वाढली कृपा ईश्वराची झाली
तुला फळेही लागली फळे बघुनीया तुला पक्षी आकर्षीत झाली
काही पक्षी तुझ्या फांदीवर राहण्यास लागली.

रूप विराट रे तुझं दाट तुझी रे सावली दाट सावलीत तुझ्या पशु
येवू लागली छाया तुझी खुप मोठी माझ्या अंगणी पडली
सहवासाची रे तुझ्या मला ओढही लागली.

मऊ, मातीत रे वृक्षा तुझी मुळे पसरली जाडं जाडं मुळे तुझी
खोल मातीत रूजली जाड मुळांनी रे तुझ्या घट्ट जमीन धरली
शाखा मुळांची रे तुझ्या एकमेकांत गुतंली

जाडसर खोड तुझी ओटयावर पसरली जनू अंगणात माझ्या
एक स्तंभ उभारली काही दिवसांनी साल तुझ्या खोडाची
निघालरी नव्या दिवसांच्या पोटी नवी साल तुला आली

घनदाट पाणे. तुझी दाट त्याची रे सावली कोवळया पाणांवर
तुझ्या फुलपाखरे बसली काही पाणे तुझी राजा पिवळी होवूनी
पडली तुझ्या पाणाच्या देठांत वस्ती फुलांची वसली

लांब लांब फांदया तुझ्या त्याला हिरवी पालवी एक एक फांदी
तुझी हिरव्या पाणांनी सजली कोवळया फांदीवर तुझ्या कोवळी
कोंब उगवली पारवरांनी फादीवर तुझ्या घरटे बांधली

एकामागे एक एक काही वर्षे पलटली काळाच्या ओघात तुझी
प्रतीमा सुखली आले म्हातारपन तुला तुझी वाढ ही संपती
फुल, फुळे, पाणे तुझी सर्व सुकुणीया गेली

एक दिवस धोक्याचा एक घटना घडली एक रात्र वादळाची तुझे
प्राण घेवून गेली मुळांजकट रे तुझे शंव कोसाळले खाली तेव्हा
डोळयांतुन माझ्या धार अश्रृंची गळाली .

**निकम तुषार प्रभाकर**
बी. एस्सी–द्वितीय वर्ष
मोरेश्वरी महाविद्याल भोकरदन.

## मानवी संवेदना ठेवा

आज आपली भारतीय संस्कृती खालावत चालली आहे. आणि पाश्चात्य संस्कृती हळू हळू आपल्या देशात येत आहे. याला कुठे तरी थांबायला पाहीजे. पोशाख, राहण, खाण, वागण्यापर्यंत ही पाश्चात्य संस्कृती आपल्या देशात पगडा गाजवायला लागलीय.

घरा वृध्द आई–वडील नको झालेत. एकत्र कुटूंब पद्धती नाहीसा झाली आहे. दोघात सिसरा नको झालाय कशामुळे या उच्च शिक्षणामुळे की काय अस कधी–कधी वाटत ? कारण याच प्रमाण जास्त उच्च शिक्षीत तसेच नोकरदार लोकात दिसून येते.

ज्या आई–वडींलाच्या पोटी जन्म घेतल्या ज्यांनी लहानाच मोठ केल. स्वत:कडे खडे माती खावून स्वत:ची कसलीही कदर न करता मुलांना उच्च शिक्षण देऊन पोट भरण्याची आक्कल देतात. त्या आई–वडीलांची अपेक्षा माझा मुलगा–मुलगी या जगात ताट मानेन जगावेत आमच्या वाटयाला जे अज्ञान दु:ख , कष्ट आलं ते त्यांच्या वाटेला नको अस त्या आई–वडीलांना वाटत. परंतु मुलगा मोठा झाला नोकरी लागली, लग्न झालं की आई–वडीलांचे घेतले कष्ठ सोसलेले दु:ख त्याचे उपकार विसरतो त्या बिचाऱ्या आई–वडीलांना किंमत देत नाहीत. सांभाळत नाहीत त्याच्या सारख्या कमनशिबी–निच व्यक्ती या जगात दुसरा असू शकत नाही. कारण ज्यांना आई–वडीलांना सांभाळण्याची अनमोल संधी भेटते, जो त्याच्या महातारपणी आधार बनतो त्याच्या सारख्या नशिब वान व्यक्ती दुसरा नाही.

वरचे वर वृध्द आश्रमाची संख्या वाढत चालली आ... त्या मुलांना माहीत नसत की, आपण जस आपल्या आई–वडीलां... आश्रमात ठेवल पाठवल त्याच वृध्द आश्रमात आपल्यालाही ... मुलगा ठेवण्याची वेळ येणार आहे.

मानूस हा मानूसकीपण विसरत चाललाय थोडा पैसा, ... सत्ता हातात. आली की एक त्याच्यात मी पणाची घमेंड चढते पण ... ठेवा तुम्ही जरी पैसान मोठे झाला तरी मानूस हा मानसापेक्षा कधी... नसतो.

कारण रस्त्यावरचा भिकारी जरी असला त्यालाही ... मान–सन्मान, अपमान भावना असतात त्यांची कदर करा.

शिखर कितीही उंच झाले तरी ते पायाचे अ... विसरल्याने शिखर राहत नाही तर ते भूईसपाट होऊन जाते. म्हणून प्रत्येकांनी आपल्या पूर्व इतिहासाची जाणीव ठेवावी.

**कु. वरबडे रोहिणी भास्कर**
एम.ए–द्वितीय वर्ष



### बाप

आई घराचं मांगल्य असत. तर बाप ही मांगल्य असतो पण या घराच्या अस्तित्वाला खरचं कधी आपण समजुन घेतल का ? बापाला महत्व असूनही त्याविषयी जासत लिहिल जातं नाही कोणताही व्याख्याता आई विषयीच बोलतो. संत महात्म्यांनीही आईचेचे महत्व अधिक सांगितले देवादिकांनीही आईचेच कौतुक केले चित्रपट तयार झाले तेही आईचेच मोठमोठे पुरस्कार दिले जातात तेही आईच्याच नावाने, चांगल्या गोष्टींना उपमा दिली जाते तिही आईच्याच नावाने पण बाप बद्द काय ? आईकडे अश्रृंचे पाट असतात पण बापाकडे संयमाचे घाट असातात आई रडून मोकळी होते पण सांत्वन बापालाचं करावे लागते. रोजच्या जेवणाची जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरिची सोय करणारा बाप आपण सहत विसरतो सर्व समोर आई मनानी रडू पण बापाल रडता येत नाही, कारण छोटया भावंडांना जपयच असतं. आई गेली तरीही रडता येत नाही कारण बहिणीना आधार दयायचा त्याच बरोबर शहाजी राजांची ओढताण विसरून चालणार नाही, बापाच मुला वरती किती प्रेम असते हे बाप झाल्या शिवाय कळत नाही.

बापाच्या टाचा झिजलेल्या बुटांकडे बघितल कि त्याच प्रेम कळते. त्याची फाटकी बनियान बघितली की कळत आमच्या नशिबाची छिद्रे त्यांचा बनियानला पाडली. त्यांचा दाढी वाढलेला चेहरा त्यांचा काटकसर दाखवित असतो. मुलींना नवीन कपडे घेतील पण स्वत: मात्र जुनीच कपडे वापरतील मुलगा सलुनमध्ये ४० ते ५० रुपये खर्च करतो. मुलगी ब्युटीपार्लरमध्ये ५०-६० रुपये खर्च करते. पण आपण आजारी पडलो तरी दवाखान्यात जात नाही पण डॉक्टर एखादा महीना आराम करण्यास सांगिल याची भिती वाटते.कारण मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण बाकी असते. घरात, उत्पन्नाच दूसर साधन नसत ऐपत नसातना मूला-मुलींना शिकवल जात.

छोटया संकटाकरिता आई असते, तर मोठया संकटाकरिता बाप असतो. हाताला चटका बसला, ठेच लागली तर आई गं ! शब्द बाहेर पडतो पण रस्त ओलांडताना एखादी गाडी आचनक आली तर बारे ! शब्द बाहेर पडतो कोणत्याही परिक्षाचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती जवळ घेते. कवटाळते, कौतूक करते पण चुपचुप जावून पेढे आणणारा बाप आपण का विसरतो १ प्रस्तुती काळातील आईच्या संवेदनाची जाणींव सर्वजन सागतात. पण दवाखान्याच्या आवातरात पन्नीसह बाळाची सुखरुप सुटका व्हावी या करिता देवाला मनापासून प्रार्थना करणारा बाप काकळत नाही? कोणत्याही मंगल प्रसंगी घरातील सर्व मंडळी जातात पण अत्यंविधी प्रसंगी बापालाच जाव लागत. मुलाच्या नोकरीपुढे लाचार होणारा बाप मुलीच्या स्थळांसाठी उंबरठे झिजवणारा बाप. घरच्यांसाठी स्वत: च्या व्यथा दडणारा घराच्या मानाकरता अपमान सहण करणारा बाप असतो. बापाच महत्व कोणाला कळत ? ज्या घरात बाप संपतो त्या घराकडे अनेकांच्या वाईट नजरा

**मयुरी सुनिल गायकवाड**
बी.एस.सी प्रथर्म वर्ष

### स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या : राजमाता जिजाऊ .

भारतीय इतिहासाने स्त्रियांप्रती नेहमीच उदासीनतेची भूमिका घेतली आहे. कित्येक कर्तबगार महिलांच्या कार्यकर्तृत्वांची दखल इतिहासाने घेतली नाही. पुरुषी धर्मव्यवस्थेचे बाळकेंद्र पिलेल्या इतिहासकरांनी त्याच मानसिकतेमध्ये इतिहास रचला. त्यांच्या या इतिहास रचनेमध्ये स्त्रियांचे स्थान कायम दुय्यम राहिले, कारण भारतीय समाज हा रुढीवादी आणि परंपराप्रिय आहे. तसाच तो धार्मिक प्रवृत्तीचा आणि अंधश्रद्धाळूसुद्धा आहे. संपूर्ण भारतीय इतिहासाचे लेखन वर्णवर्चस्वावादी दृष्टीने केलेले आहे. पण काही कर्तत्वान स्त्रियांचे कार्य इतके देदीप्यमान आहे की, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय इतिहासाला पूढे जाताच येत नाही. आधुनिक राष्ट्रनिर्मितीची राष्ट्रनायिका राष्ट्रमाता जिजाऊ हे त्यापैकीच एक भव्यदिव्य नाव, जिजामाता केवळ एक राजकुलीन स्त्री नव्हती, तर इतिहास घडविणारी एक महान शक्ती होती. त्या काळाचा विचार करता जिजामाता या प्रखर परिवर्तनवादी व आधुनिक विचार सरणीच्या होत्या.

विदर्भातील बुलढाणा जिल्हयातील सिंदखेड राजा येथे राजे लखुजी जाधव आणि महाराणी म्हाळसाबाई यांचे पोटी एक दिव्य, तेजोमय कन्यारत्न १२ जानेवारी १५९८ ला सुप्रभाती जन्माला आले.त्या म्हणजे माँसाहेब जिजाऊ, ४१५ वर्षापूर्वी जिजांऊच्या जन्माचा आंनद व्यक्त करण्यासाठी वडील लखुजी विठोजी जाधव यांनी हत्तीवरून साखर वाटली. जिजाऊंच्या आई म्हाळसाबाई लखुजी जाधवांना चार पुत्र होते. चार पुत्रानंतर कन्यारत्न झाले. जाधव परिवारात चार मुललानंतर मुलगी जन्माला आली म्हणून सर्वांना अतिशय आंनद झाला आणि माँ.जिजाऊ याच्या जन्मोत्सवाला पाहता-पाहता दिवाळीचे रूप आले. नगरास साखरपान आणि

भोजन दिले गेले, आंनदमय वातावरणात चिंब होत असतांना. माँसाहेबांचे काका जगदेवराव जाधव हे परिवारासहीत तुळजापुरला देवीची ओटी भरण्यासाठी गेले होते. आज जेव्हा समाजात स्त्रीभ्रूण होत असतांना तिला वाचविण्यासाठी धडपड करावी लागते. तेव्हा सव्हा चारशे वर्षापूर्वीचा हा इतिहास आठवावा लागतो.

अतिशय लाडाकौतुकात माँ साहेबांचे बालपण सिंदखेडराजा येथे गेले. परंतु बाहुला बाहुलींच्या खेळ-खेळण्यात त्यांनी बालपण गमावले नाही. तर काकांच्या आणि मोठया भावाच्या मदतीने अनेक साहसी खेळ, मैदानी खेळात त्या तरबेज झाल्या. त्यांचे वडिल लखुजी राजे आणि म्हाळसाबाई हे दोघेही सुसंस्कृत होते. म्हाळसाबाई या फलटणच्या निंबाळकर या नावाजलेल्या घराण्यातलील होत्या. म्हाळसाबाई अत्यंत धोरणी मुत्सददी स्वाभिमानी आणि धाडसी होत्या. आईच्या सद्‌गुणांचे लेणे जिजाऊंना जन्मत: प्राप्त झाले होते. जिजाऊ एकुलती एक कन्या असल्याने त्यांचे विशेष कौतुक तर झालेच, शिवाय त्यांच्या जडणघडणीतही विशेष लक्ष दिले गेले जिजाऊंचा जन्म एक राजमान्य घराण्यात झाल्यामुळे त्यांच्या बालमनाचा विकास होण्यास त्यांच्या पित्यांच्या घराण्यात सर्व गोष्टी अनुकूल होत्या. जिजाऊंना वयाच्या पाचव्या वर्षी सर्व खेळ, घोडदौड हत्तीवरील स्वारी, पोहणे, शस्त्रकला, शस्त्राची ओळख व पारख होती. या सर्व गोष्टींमध्ये त्या निपुण होत्या, तसेच जिजाऊंचे मराठी, संस्कृत, फारशी आदी भाषावर प्रभुत्व होते.

बालवयातच इ.स. १६१० दरम्यान जिजाऊंचा देवगिरी येथे शहाजी राजे भोसले यांच्याशी आतिशय थाटामाटात विवाह पार पडला.मालोजी भोसल्यांच्या घरी जिजाऊंच्या रूपाने वैभव आले.विवाहापूर्वीचे शहाजी राजांच्याकडे सरदार पद होते. कर्नाटकात असतानाचं स्वंतत्र राज्य स्थापन करण्याची महत्वाकांक्षा शहाजीराजे बाळगुन होते. म्हणूनच त्यांनी जिजाऊंना शिवनेरीवर राहण्यास सांगितले होते. विवाहनंतर जिजाऊंचे संपूर्ण आयुष्यचं आव्हानांनी भरलेले होते. आव्हानाशी दोन हात करीत बहुजनांचे राज्य निर्माण करण्याचे ध्येये जिजाऊंसमोर होते. रूढीवादी स्त्रियांप्रमाणे ऐषोरामात त्या कधीच गुतूंन पडल्या नाहीत. कटकार स्थानाचे राजकारण खेळल्या नाहीत. यावरून जिजाऊमध्ये मनाचा दीलदारपणा, सहनशीलता व समंजसपणा किती होता याचे दर्शन घडते.

दुसरीकडे भाऊबंदकीमुळे मुघलसत्ता कशी खिळखिळ होत होती याचे प्रत्येक्ष चित्र जिजाऊ पाहत होत्या. म्हणूनच कुटूंबासाठी व स्वराज्याच्या बांधणीसाठी कोणत्याही आव्हानांना तोंड दयावयची तयारी त्यांनी ठेवली होती. पुण्याच्या जहागिरीची आादिलशहाने अतिशय वाईट अवस्था केल्याची वार्ता ऐकूण जिजाऊ पुण्याकडे निघाल्या. आदिलशहाचा सरदार जगदेवराव याने १६३० मध्येपुण्याच्या भूमिवरून गाढव बांधून नागर फिरवला व पहार रोवली होती. यामुळे संपूर्ण पुणे उद्ध्वस्त झाले होते. जिजाऊ पुण्याला आल्यानंतर पहिल्यांदा त्यांनी ही धर्मिक दहशत मोडून काढली. जमिनी नांगरण्यासाठी घेतल्या. आठरापगड जातीतील लोकांचे सहकार्य घेतले पूजेसाठी स्वत: ची विधवा आई म्हाळसाबाई व विधवा वहिनीची निवड केली.

यावरून जिजामाता किती आधुनिक विचारधारेच्या होत्या. याचे प्रत्यंतर येते. शिवजन्मपुर्वी महाराष्ट्राची अवस्था अतिशय वाईट होती. अशा परिस्थितील दक्षिणेकडे दख्खनच्या पठारात मराठी सत्तेचे बीज रोवले जात होते. यवनी आत्याचाराने संपूर्ण जनता त्रस्त होती. जिजामातातेने तेव्हाच मनाशी खुणगाठ बांधली की, या परिस्थितीला बदलणारा युगपुरूष मीच घडविणार !

इ.स. १६१९ ला पहिले पुत्र जन्माला आले. ते म्हणजे संभाजीराजे भोसले. (पुढे इ.स. १६५४ मध्ये वयाच्या पस्तीसाव्या वर्षी कणकगिरीच्या युध्दात ते मारले गेले. ) आणि

"शिवस्पर्शाने धन्य जाहली "
मायभूमीची माती ।
स्मृतीरूपाने चिरंतन राहील,
कर्तृत्वाची महती ।। "

१९ फेब्रुवारी १६३० ला हिंद स्वराज्याचे संस्वापक, मराठयांमध्ये महाराष्ट्रांची अस्मित जागृत करणारे रयतेचे प्रतिपालक छत्रपती शिवाज महाराजांचा जन्म जुन्नर तालुकयात शिवनेरी किल्यां झाला. तो दिवस सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा आस होता.शहाजी राजे कर्नाटकात होते. इकडे बाळ शिवाजी वाढ होते. परंतु जिजाऊंना शहाजींच्या स्वराज्य निर्मितीची तळम अस्वस्थ करत होती. आणि जिजाऊंनी शिवबांना घडवायल सुरुवात केली. त्यांनी लहानपणापासूनच विरांच्या थोरामोठयांच्या कथा त्यांना सांगितल्या. शिवाजी महाराजां जबाबदारी मोठया खंबीरपणे माँसाहेबांनी पेलली.

त्यावेळाच्या परिस्थितीवर एक नज टाकली तर असे दिसून येते की, आदिलशाही निजामशा आणि मोगलशाही यासारख्या बलाढयासम्राज्याखाली संपू देश दडपला गेला होता . जिकडे-तिकडे अन्याय, अत्याचा माजला होता. कुणीही यावं आणि रयतेची लकतरं वेशीव टांगावीत, भरदिवसा कोणाचीही अब्रु-लुटावी, कुणाच्या कत्तली करव्यात अशी परिस्थिती होती. शेतकरी, व्यापा गोरगरीब यांना कुणी वाली उरला नव्हता रयंत अगदी गंजू गेली होती. ही सर्व परिस्थिती शहाजीराजे उघडया डोळ्यां रापाहत होते. नेमकी हीच परिस्थिती बदलण्यासाठी, रयतेला

संकटातून बाहेर काढण्यासाठी शहाजीराजे सांगतील ती गोष्टमानून शिवाजी महाराजांना घडविण्याचे महान कार्य माँ साहेबांनी केले. त्यांच्यावर योग्य संस्कार केले. त्यांना केवळ रामायण, महाभारताच्या कथा सांगितल्या नाहीत तर गोरगरीब जनतेसाठी, शेतकरी, कष्टकरी यांच्या हक्कासाठी लढण्यास भाग पाडले. त्यांना युद्धकेलेचे शिक्षण दिले. शिवबाचे युद्धकलेचे शिक्षण झाल्यानंतर जिजाऊंनी शिवबाला प्राप्त परिस्थतीचे धडे दयावयाला सुरवात केली. अन्याय भ्याडपणे सहन न करता त्याविरूद्ध बंड कसे करायचे याची शिकवण छोटया शिवबाला देऊ लागल्या परकीय लोक आपल्याच लोकांना कसे गुलाम बनवत आहे. याची सार्थ उदाहरणे त्यांच्या पूढे ठेवू लागल्या. गुलामगिरी विरूद्ध छगधगता ज्वालामुखीच त्यांनी शिवबांच्या मनात पेटविली

शिवाजी महाराजांच्या एकूण पन्नास वर्षांच्या छोट्याशा कालखंडात जवळपास अख्खे पंचेचाळीस वर्षे शिवराय हे जिजाऊनामक वटवृक्षाच्या छत्रछायेत वाढले त्यामुळे शिवरायाचे गुरू आऊसाहेब जिजाऊचर होत्या. नाही तरी आई ही बाळाची पहिली शाळा असते.

शिवराजेचे शिक्षण घरींच झाले. चालीरिती, रूढी, परंपरा, रिवाज, राज्यकारभाराच्या प्रथा यांचा शिवबाने जवळून अभ्यास केला. या कालखंडात शहाजीराजे हे ही आपल्या कुटंबात रममाण झाले होते.

शेवटी जेव्हा जिजाऊ – शिवबा संबंधावर अधिक प्रकाश टाकते. शहाजी राजे जिजाऊ साहेबांना म्हणतात ङ्कआम्ही संभाजी राजांना संभाळतो,तुम्ही शिवाजी राजांना सांभाळा.बघुया,कोण मोठा **होतो ते.** "

हे संभाषण इ.स. १९४२ चे आहे. त्यानंतर इ.स.१९६२ मध्ये शहाजीराजे स्वराज्यात येतात. शिवाजीराजांच्या उंच व उत्तुंग कामागिरीचा आलेख पाहून ते भारावून जातात.आऊसाहेब जिजाऊंना बंगळूर हून–पुण्यास येतांना दिलेल्या जबाबदारीची त्यांना आठवण होते.

जिजाऊंनी नेहमीच काळाच्या पुढे जाऊन विचार केला आहे. अंधश्रद्धा, कु–प्रथा, शुभ–अशुभ यासारख्या गोष्टी कधी पाळल्या नाहीत. यावरून आधुनिकतेचे भूर्तिमंत प्रतिक म्हणून जिजाऊँचे व्यक्तित्त्व दिसून येते. आज संगणकाच्या युगात एखादया दगडाला शेंदूर फासून त्याठिकाणी तात्काळ देऊळ बांधली जातात. देवाच्या नावाने स्वत:चे पोटपाणी भागवणाऱ्या धर्माधांची संख्या आजही तितकीच मोठी आहे. आधुनिक भारताच्या विकासासाठी ही गोष्ट लाजिरवाणी आहे.

जिजामातेने शिवबावर अतिउच्च प्रतीचे संस्कार केले. त्यांच्या मनात स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीचे बिजारोपण केले. स्वराज्य निर्मितीचे प्रेरणास्त्रोत म्हणून त्या शिवबाच्या मागे खंबीरपणे उभ्या होत्या. जिजाऊंनी धर्मव्यवस्थेला लथाडले आणि शिवबाचा राज्यभिषेक करायला सांगितला. सत्ता स्थापठयाचा आणि राजसिंहासनावर बसण्याचा हक्क बहुजनालाही आहे. या लोकशाी मूल्याची जाणीव जिजाऊमध्ये होती. आणि शिवबांना राज्यभिषेक करून ते मूल्य त्यांनी वास्तवात उतरविले जिजामाता केवळ १७ व्या शतकातील इतिहासाची जननी नव्हे; तर वर्तमान काळ व भविष्य काळाची स्फुर्तीदात्री होती. जिजाऊंनी केलेल्या संस्काराचे शिवबाचे सोने केले. बहुजनांचा राज, जाणता राजा, एक लोककल्यणकारी राजा म्हणून त्यांचा लौकिक कायम आहे. शिवबा घडले नाही, तर घडवले गेले, ते जिजाऊंच्या संस्कारामुळे आज जिव जन्माला येत आहेत, पण शिवबा घडवणारी जिजाऊंची उणीव आहे. समाजात चालणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींचे प्रमाण बघत:, तरूण पिढीने हे लक्षात घ्यावे .

जिजाऊ म्हणजे आदर्शमाता, आदर्शपत्नी, आदर्श कल्याणकारी राज्यनिर्मिती आहे. शिवबांना घडवून स्वराज्य निर्माण करणारी अद्वितीय राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वाला भारतीय इतिहासात तोड नाही. आशा या राजमाता जिजाऊंनी शिवाजी राजांचा राज्यभिषेक डोळे भरून पाहिला व त्यांना जानवलं की रयतेचे राज्य, हिंदवी स्वराज्य हे आता स्थिर आहे. राज्यभिषेकानंतर ११ व्या दिवशी रायगडच्या पायथ्याला पचाडला १६ जून १६७४ या दिवशी विरमाता जिजाऊंनी जगाचा निरोप घेतला. आणि जाता–जाता मोठया आंनदाने म्हणावसे वाटते की,

"सूर्या आधी प्रमाण करावा पुर्व दिशेला,.
शिवाआधी प्रणाम करावा जिजामातेला.!"

आज घराघरांतुन लहानपणापासून
जिजाऊंच्या संस्काराच्या
बीजारोपणाचा वसा आजच्या जिजाऊंनी
घेतला पाहिजे. आपल्या
पाल्यांवर चांगले संस्कार करण्याची
जबाबदारी आधुनिक
जिजाऊंवर आहे. युग प्रवर्तक शिवबा
घडवायचे असतील
तर प्रथम जिजाऊ तयार होणे ही,
काळाची गरज आहे.



– पंकज अरविंद लोखंडे
विदयार्थी संसद सचिव.
मोरेश्वर कला, विज्ञान व
वाणिज्य महाविदयालय
भोकरदन. जि. जालना.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा मोठा विस्तार झाला आहे. गावपातळीपर्यंत प्राथमिक माध्यामिक शिक्षण पोहोचले आहे. विद्यापिठांची संख्यादेखिल वाढतचं आहे. ही मोठी शैक्षणिक क्रांतीच म्हणावी लागेल. परंतू मागे वळून पाहिले की, शिक्षणात गुणात्मक बदल घडतांना दिसून येत नाही. कारण फूले–शाहू–आंबेडकरांच्या 'पुरोगामी' महाराष्ट्रात त्यांच्या विचारांची पेरणी करण्यास आणि त्यांचे विचार आत्मसात करण्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना यश मिळू शकले नाही. म्हणूनच आज शिक्षणाचा पाया अरूंद होत चाललेला दिसून येत आहे. ही घटना 'पुरोगामित्वाला' पर्याय उभा करणारी आहे, असं वाटते. ज्या प्रमाणे या घटनेला शिक्षक आणि विद्यार्थी जबाबदार वाटतात; तितकीच शिक्षणव्यवस्थाही आहे. म्हणूनच नव्या शिक्षण व्यवस्थेची निर्मिती १९४६ मध्ये 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापणा करून केली. त्याद्वारे मुंबई येथे 'सिध्दार्थ महाविद्यालय' आणि औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालय' उघडले. शिक्षणापासून जो समाज वंचित होता, त्यांना शिक्षणाची संधी मिळाली. 'शिक्षणामुळे मानसाला स्वत:च्या आस्तित्त्वाची जाणिव होते. म्हणून बहूजन समाजातीय मुलांनी शिकून आपल्या समाजाचा उध्दार करावा.'ही त्या मागची बाबासाहेबांची भूमिका होती. आणि हि संधी 'पिपल्स एज्यूकेशन सोसायटीच्या ' निर्मितीतून बहूजन समाजाला बाबासाहेबांनी करून दिली. आणि या दोन्हीही महाविद्यालयाच्या परिसरातूनच बहूजन समाजाच्या शैक्षणिक पर्वाची सूरूवात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींसह झाली, हि मोठी क्रांतीच म्हणावी लागेल. कुठल्याही जातीधर्माचा द्वेष न करता प्रत्येकाला महाविद्यालयात प्रवेश घेण्याची व्यवस्था बाबासाहेबांनी केली होती. तशी तो आजही आहे. परंतू आमच्या मस्तकात जात सर्वदूर रूजलेले असल्याने पहाडाएवढ्या महापुरूषाला आम्ही जातीमध्ये अडकवू पाहत आहोत. बाबासाहेबांनी उभ्या आयुष्यात कधी ब्राम्हणांना विरोध केला नाही. त्यांचा विरोध होता तो ब्राम्हण्याला. म्हणजेच वेद–स्मृती–जातीभेद मानणा–यांना. ब्राम्हण्य हे महाभयंकर विष असल्याचे मत बाबासाहेब व्यक्त करतात. बाबासाहेबांनी हिंदू धर्माविषयीही कधी द्वेष केला नाही. याउलट हिंदू धर्माची उन्नती व्हावी, त्यांच्यामध्ये सुधारणा व्हावी, महिलांचे संरक्षण व्हावे, यासाठी बाबासाहेबांनी कायदेमंत्री असतांना संसदेत हिंदू कोड बील मांडल. त्यावेळी तात्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आश्वासान देवूनही हे बील पारीत होवू शकलं नाही. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे पहिले केंद्रीय मंत्री होत, ज्यांनी समाजहिताच्या रक्षणासाठी कायदा संमत करू शकलो नाही, म्हणून आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. आयुष्यभर ज्यांनी अमाणूषतेची वागणूक दिली, त्याच्याप्रती असलेली बाबासाहेबांची ही भावना होती. म्हणूनच आचार्य अत्रे म्हणतात, की 'आंबेडकरांचे हिंदू कोडबील जर मान्य झाले असते, तर हिंदू समाजातील सर्व भेद,अन्याय आणि विषमता नष्ट होऊन हिन्दु समाज हा अत्यंत तेजस्वी आणि बलशाली झाला आसता आणि भारताच्या पाच हजार वर्षाच्या इतिहासात जी क्रांती आजपर्यंत कुणी घडवून आणली नाही. ती घडून आली असती. पण दूदैव भारताचे ! दूर्भाग्य हिंदू समाजाचे ! '

हजारो वर्ष जो समाज गुलामीच्या बंधनात बंधीस्त होता. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार ज्याला नव्हता. त्या समाजाला बाबासाहेबांनी बौध्द धम्माची दीक्षा देवून माणसात आणले. त्यांना नवा जन्म दिला. आर्थिकतेने सक्षम नसल्यामुळे त्यांना शिक्षणासाठी आरक्षणाचा सहारा बाबासाहेबांनी दिला. कि, जेणेकरून या आधारावर हा समाज आपला दर्जा उंचावून समता प्रस्तापित होउ शकले. परंतू त्यांच्या या भूमिकेवर जेव्हा तात्कालीन नेत्यांनी विरोध दर्शविला तेव्हा त्यांच्या तोंडावर टाळा बसवतांना बाबासाहेब म्हणतात,' पाच आणि दहा या संख्यांना दोनाने गुणले तर दहा व विस येईल. म्हणून पाचाला दोनाने गुणून दहाला एकाने गुणले तरच उत्तर सारखे येईल. याचाच अर्थ खालच्या वर्गाला भरपूर सवलती देउन त्यांना वरच्या पातळीवर आणले पाहीजे.'' यालाच बाबासाहेब समता असे मानतात. दलित समाजातील विद्यार्थ्यांनी खुप शिकावं, उच्च विभुषित व्हाव आणि आपल्या समाजाचा उध्दार करावा. समाजाला दिशा द्यावी. अशी बाबासाहेबांना अपेक्षा होती. कारण व्यक्ती स्वातत्रयाच्या रक्षणासाठी जर तुम्हाला शक्ती प्राप्त करायची असे तर शिक्षण घेणे आवश्यक आहे. म्हणून आपल्या व्यक्तीस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण शिकलं पाहीजे. हे सांगतांना बाबासाहेब उच्च शिक्षणालाअधिक प्राधान्य देतांना म्हणतात, की'हजार मुले चौथी शिकुन पास झाल्यापेक्षा एक मुलगा बी.ए. व्हावा.' म्हणजे याचा अर्थ प्राथमिक शिक्षणाकडं दूर्लक्ष करावे असा नाही. तर 'प्राथमिक शिक्षण देतांना शाळेत विद्यार्थ्यांना केवळ बाराखडी शिकवून चालणार नाही. तरी मुलाची मनं सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. सामान्य माणसाला शिक्षण घेणं सुलभ होईल अशी व्यवस्था निर्माण करायला हवी. यासाठी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनं शिक्षणाचं धोरण ठरवून शिक्षणातएकसुत्रीपणा आपल्याला आणावा लागेल. तेव्हा कुठे राष्ट्र उभारणीच्या दृष्टिनं एक सक्षम पिढी निर्माण होउ शकेल. 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे,ते प्राषण केल्यानंतर म्हणाले होते. मनूष्य गुरगुल्याशिवाय राहणार नाही.' असे

बाबासाहेब

परंतू आज मोठया प्रमाणात शिक्षणाचे बाजारीकरण होत असल्याने,नव्हे तर शिक्षणात व्यभिचार वाढत असल्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ढासळत चालली आहे. अशा वेळी दुध पिल्यानंतरही डरकाळी न येणे हा इथल्या शैक्षणिक बाजारीकरणाचा, शिक्षकांचा संकुचित विचाराचा आणि विद्यार्थ्यांचा अकार्यक्षमतेचा परिनाम होय. पहिल्या तासात विज्ञानाच्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना डार्विनचा सिध्दांत शिकवावा ते वर्गाबाहेर पडातच इंग्रजीच्या बाईने ॲडम आणि इव्हची कथा शिकवावी. खरचं हा शिक्षणविषय व्यभिचार नव्हे का ? याचा विचार आज सर्व अंगांनी होणे गरजेचे आहे.

एकदा पंडित मदन मोहन मालविय यांनी बाबासाहेबांचे ग्रंथालय पाहील्यानंतर लाखो रूपयांना विकत मागितले. या सौद्याला नाकारत बाबासाहेब म्हणतात, पंडितजी, तुम्ही तर मला माझी शक्तीच मागत आहात ती मी तुम्हाला कशी देईन. एवढं बाबासाहेबांनी पुस्तकांना जपलं आहे. बाबासाहेबांच्या मुंबई येथिल राजगृहात २२,००० पुस्तके आणि दिल्ली येथिल निवासस्थानी १५,००० निवडक ग्रंथसंपदा होती. एवढया ग्रंथापैकी बाबासाहेब आपल्याला हवे असलेले पुस्तक आणि त्यातिल एखादा संदर्भ क्षणार्धात शोधून काढीत. इतकी त्यांची स्मरण शक्ती दांडगी होती. त्यासाठी त्यांना २४ तासांपैकी १८ तास आभ्यास करावा लागला. तहान–भुक विसरून अविरत परिश्रम त्यांनी त्यासाठी घेतले. असे पुस्तकाविषयी प्रेम, आत्मीयता आपण स्व: मध्ये निर्माण करावी. बाबासहेबांच्या अथक परिश्रमांना डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले तर त्यातून राष्ट हिताची उभारणी करणारी पिढी निश्चितच निर्माण होईल. परंतू केवळ शिक्षण घेणे उपयोगाचे नाही तर त्या शिक्षणाला शिलाची जोड असावी. ज्या शिक्षणाला शिलाची जोड नाही ते शिक्षण कुचकामी असल्याचा दावा खुद्द बाबासाहेब करतात. विद्येबरोबर प्रज्ञा म्हणजेच शहापण, शील म्हणजे सदाचारयुक्त असं आचरण, करूणा म्हणजे सर्व मानवजीसंबंधी प्रेमभाव, मैत्री म्हणजे प्राणीमात्रांविषयीची आत्मीयता या चार पारामिताशिवाय शिक्षणाला काहीही महत्त्व नाही. हे बाबासाहेबांचे विचार आज विद्यार्थ्यांनी आत्मसात करून देशहितासाठी प्रयत्न करावेत.

एखादा विचार समाजाने अंगिकारावा यासाठी तो विचार पेरण्याचं काम हे प्रसारमाध्यमांचे आहे. परंतू आभाळाएवढा महापुरूष आज जातिच्या मचाटयात बंधीस्त केल्यानं बाबासाहेब आंबेडकर म्हणताचक्षणी ते बौध्द समाजापुरते मर्यादित होउन जातात. एवढी भयानक अवस्था आहे आहे. प्रसार माध्यमांनी बाबासाहेबांचा राष्ट्रहिताचा, बहूजन नेतृत्तवाचा आणि सामाजिक बदलाचा बहूआयामी विचार पेरण्याचा प्रयत्न ते जिवंत असतांना सोडा पण त्यांच्या महापरिणीर्वाणानंतरही पाहिजे तसा कधीच केला नाही. हे एक महाभयंकर वास्तव आहे. हे स्विकारतांना माध्यमाचे अभ्यासक प्रा. जयदेव डोळे म्हणतात, ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ढोंगी पत्रकारीतेवर तुटून पडलेले सच्चे पत्रकार आहेत. पण महाराष्ट्रातील माध्यमांनी बाबासाहेबांना यशस्वी साथ न देणं हा महाराष्ट्रातील माध्यमांनी बाबासाहेबांना यशस्वी साथ न देणं हा महाराष्ट्रातील पत्रकारीतेवरील बट्टाच होय.'

**अमरदिप वानखडे**

जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग

**संदर्भ सुची – १. 'बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यार्थ्यांना संदेश' – विजय जाधव २. सकाळ 'दीक्षा' विषेशांक २००५' ३. 'हाल' प्रा. जयदेव डोळे.**

## 'कुलगुरूचे प्रेरणास्थान आणि कामगाज'

कुलगुरूंचा परिचय : –

नाव :– बी. ए. चोपडे

कुटुंबातील पहिले पदवीधर

सातारा जिल्हा, तालुका कराड,एक्या छोट्याशा

पहिले प्रेरणा स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दुसरे प्रेरणा स्थान, आई वडिल

**शिक्षण :–** शिवाजी विदयापीठ, कोल्हापूरची बी.एस्सी हि मायक्रोबायलॉजीतील पदवी सायन्स कॉलेज कराड येथून संपादन केली व आपली एम.एस्सी.मायक्रोबॉयलॉजी ही पदव्युत्तर पदवी पूणे विदयापीठातून प्राप्त केली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती संपादन करून त्यांनी इंग्लेडमधील युनिर्व्हसिटी ऑफ नॉटिंगहॅम या प्रसिध्द विदयापीठातून सुक्ष्मजिव शास्त्रात पी.एचडी. हि पदवी मिळवून संशोधन क्षेत्रात आपला ठसा उमटवला. त्यानंतर त्यांनी पोस्ट डॉक्टरल संशोधनसाठी अमेरिकेच्या शिकागो येथिल जगप्रसिध्द अशा युनिर्व्हरसिटी ऑफ इलिनस या विदयापीठात प्रवेश घेतला व या क्षेत्रातील जागतीक पातळीवर नोंद घेतले जावे असे संशोधन पूर्ण केले.

गेली ३० वर्ष ते पूणे विदयापीठातील मायक्रोबॉयलॉजी विभागामध्ये अध्यापन व संशोधन करित होते. कुलगुरु डॉ. चोपडे यांचे संशोधनाचे क्षेत्र बॅक्टेरियल जेनेटीक्स, मॉलिक्यु लर बॉयलॉजी मेडिकल मायक्रॉबॉयालॉजी आणि जेनेटिक्स असून या क्षेत्रात देशातील व जगातील एक नामवंत संशोधक म्हणून ख्याती मिळवलेली आहे.

पुणे विदयापीठात त्यांनी या क्षेत्रात मोलिक संशोधन

करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ६०पेक्षा अधिक शोध निबंध प्रकाशित केले आहे. व त्यांनी आपल्या नावावर संशोधना करित प्रतिष्ठीत पेंटट प्राप्त केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाला डॉ.चोपडे यांच्या रुपाने एक उत्तम दर्जाचा संशोधक शिक्षणतज्ञ आणि गरिब, होतकरू विदयार्थ्यांच्या परिस्थितीची जाणिव असलेले कुलगुरू लाभलेले आहेत.

येत्या पाच वर्षात विदयापीठाला आंतरराष्ट्रीय गुणवत्ता व एक हजार कोटींचा कॉर्पस फंड उभा करण्याचा व संशोदनालाच चालणा देण्याचा त्याचा मानस आहे. कुलगुरू पदीविराज मान होण्या अगोदर ते सावित्रीबाई फुले पूणे विदयापीठ पूणे विदयापीठातील मायक्रॉबॉयलॉजी सुक्ष्मजिव शास्त्र विभागाचे जेष्ठ प्रोफेसर व जेनेस्टीकचे नामांकीत शास्त्रज्ञ डॉ. बी. ए चोपडे यांनी आपल्या कुलगुरू पदाचा कार्यभार २ जून रोजी स्विकारला विदयापीठातील प्राध्यापक व विभाग प्रमुखांच्या समोर प्रो. डॉ. चोपडे यांनी विदयापीठाच्या पुढील पाच वर्षातील विकासाचा आरखडा व संकल्प करून आपल्या दैनंदिन कारकिर्तीची प्रभावी सूरवात केली.

**सातान्यातील तो क्षण ठरला जिवनाचा टर्निंग पाईट :–**

आईवडिला समवेत डॉ.चोपडे हे कामानिमित्त सातारा बस स्टॅन्ड वर आले असता. पोटासाठी काम शोधत असतांना आई वडिल हलाखीची परिस्थीत अचानक सातान्यातील बसस्टॅन्डवर डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा पुतळा आहे. तेव्हा आई सोबत पुतळ्या समोर बसले तेव्हा आई म्हणाली होती. कि माझा मुलगाही असाच परदेशात जाऊन शिक्षण घेईन डॉ. बाबासाहेब आंबडेकर प्रमाणेच त्यांचा विचाराव मोठा होईल असाच सूट बुट कोटात राहिल ही त्यावेळी आईने व्यक्त केलेली भावना होती.

पण हे बोल पुढे खरे ठरले डॉ. चोपडे हे आंतराष्ट्रीय शिष्य वृत्ता मिळवून परदेशात जान्या साठी निघाले असता आई पाठवण्यास तयार नव्हती.

कारण आईचे म्हणणे असे होते कि मूले परदेशात जाऊन शिक्षण घुऊन मोठे होतात ते पुन्हा मायदेशात फिरकत नाहीत. ते तिकडेच स्थायिक होतात. स्वत: हाच्या जन्मभूमिला कर्मभूमिला विसरून ते केव्हाचेच परदेशमय होतात. त्यातही ते तिकडयाच मूलीशी लग्न करतात. असे माझ्याही लेकराचे होईल ही आईचा भावना होती. परंतू डॉ. चोपडे यांनी आईला (वचन) सांगितले होते कि, मि परदेशात जाऊन बाबासाहेबा सारखे शिकेल सुटाबुटात राहिल अनेक पदव्या घेईल त्या शिक्षणाचा फायदा हा माझ्या भारतातील शोषित वंचित, गरिब समाजाला होईल. मि परदेशात स्थायिक होणार नाही. अनेक संधी परदेशातील सोडून देऊन मि शिक्षणपूर्ण करून भारतात परत येईल.

**अन् आईचा विराध मावळला :–**

डॉ. चोपडे यांनी आईला समजून सांगितल्या नंतर आईचा विरोध हा मावळला आणि आई ही परदेशी धाडण्यात आले पूणे विदयापीठात जेष्ठ प्रोफेसर म्हणून नियुक्त ही झाले. त्या नंतर आतो सध्या विदयमान कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर माराठवाडा विदयापीठाचे कुलगुरु आहेत.

ज्या महामानवाच्या विचारांवर यशाचे शिखर सर केले. त्याच महामानवाचे अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव असाणाऱ्या विदयापीठाचे कुलगुरू होण्याचा बहुमान त्यांना मिळाला कित्ती महान क्रांती झाली. ज्यांना गरिबीच्या वंचिताच्या वेदना सहन कराव्या लागल्या.

पण ही यशाची कारर्किद बहरलेली असतांना मात्र डॉ. चोपडे यांची आई ही पाहण्यास या जगात नाही. अस कुलगुरू सांगतात, खरंच स्वामि तिन्ही जगाचा आई विना भिकारी.

**१६ तास करतात काम:–**

कुलगुरू डॉ. चोपडे सर विदयापीठाला आतंरा राष्ट्रीय स्तरावर नाव– लौकिल मिळवून देण्यासाठी सलग १६तास कार्यालयीन कामकाजात व्यस्त असातात. ते विदयार्थी प्राध्यापकाचे प्रश्न ऐकून घेऊन त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करतात. १६ काम करून बॅक कमिटिचा अ दर्जा प्राप्त असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विदयापीठाला ते संशोधनासाठी विदयापीठाची ओळख राष्ट्रीय आंतराराष्ट्रीय स्तरावर व्हावी यासाठी प्रयत्न शील आहेत.

**पिंपळवण उभारणार :–**

१५ऑगस्ट २०१४ रोजी वृक्षारोपन करतांना ते म्हणाले कि. येथे प्राचीन बौध्द लेण्या आहेत. त्यांच्या पायथ्याशी असाणारी जमिन ही खालीच आहे निसर्गरम्य वार्तावरण आपल्या विदयापीठासारखे दूसऱ्या कोणत्याच विदयापीठात नाही. आपल्या विदयापीठात नारळवन आहे. त्याच धर्तीवर पिंपळवणं निर्माण करावं अशी सूचना नाही त्यांना सहकाऱ्यांना केली. पिंपळ वृक्षाचे फायदे कसे आहेत. आरोग्य विषयक याबाबत त्यांनी प्राध्यापकां बरोबरच विद्यार्थ्यांनाही माहीती दिली. आणि विद्यापी[illegible] प्रशासनाने त्या मान्यही केली.

**डॉ.आंबडेकर रिसर्च सेंटर अभारणार:–**

आपल्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबडेक[illegible] मराठवाडा विदयापीठ असे नाव आहे त्या महामानवाच[illegible] कार्याचा अभ्यास येथिल शिकणाऱ्या विद्यार्थ्याला करता या[illegible]

यासाठी रिसर्च सेंटर उभारणार आहेत.

**नामविस्तार इतिहासाचे करणार जपणुक :-**

मराठावोडा विद्यापीठ औरंगाबाद याचा नामविस्तार हा १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे झाले परतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच नाव मिळावं विद्यापीठाला यासाठी किती संघर्ष झाला. किती जणांची कुटूंब शहिद झालीत यांचा सपूर्ण इतिहास जतंन करण्यासाठी ठोस निर्णय घऊन पावले ऊचलल्याजातील याच आश्वासनही कुलगूरू महोदयांनी दिले आहे.

**अन् दिली कुलगूरूनी अश्रूंना वाट मोकळी करून**

१४ जानेवारी २०१५ हा नामविस्तार दिनी शहिद कुटूंबातील जर्नाधन मवाडेचे नातलग मुलगा विवेक व वनीताताई बाई हया कुलगूरूला भेटल्या त्यावेळला त्यांनी संपूर्ण इतिहासाच अवलोकन झाल्यानंतर शहीद कुटुंबातील सदस्याची ओळख पटल्यानंतर त्यानी केलेला त्यागाची महती झाल्यानंतर स्वत: हा कुलगूरूनाही अश्रु आवरता आले नाहीत हे विशेष.

त्यांनी विदयापीठातील नाटयगृहातील कार्यक्रमातही विवेक मवाडेला बोलण्याची संधी देऊन उपस्थित जनतेला मनोगत ऐकण्याची संधी दिली किती हृदयविळवगारी घटना होती यावरुनच आपणाला लक्षात येते. अन् संपूर्ण नामांतराचा इतिहासाची जपणूक व जतन करण्यात येईल व नव्याने इतिहास लिहला जाईल याची आठवनही करून दिली.

**संशोधनाला वाव देणार:-**

विद्यमान कुलगुरु डॉ. चोपडे हे संशोधक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांना संशोधन करण्यची आवड आहे विद्यार्थ्यांनी संशोधन करुन नवनिर्मितीला चालना दयावी असा त्यांचा आग्रह आहे.

त्यातूनच आंररराष्ट्रीयय परिषदाचे आयोजनही करण्यात आले होते. नविन संधी विद्यार्थ्यांना माहीत व्हाव्यात असा त्यांचा नेहमी आग्रही मत असते. विद्यापीठातील विद्यार्थी हा नेहमी केंद्र बिंदू असावा असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

**केंद्रियविद्याठाचा दर्जा मिळवून देण्यावर भर :-**

त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात प्राध्यापक आणि विदयार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात असं स्पष्ट जाणवते कि आपण ज्या विद्यापीठात शिकतो त्या विद्यापीठाला जागातिक स्तरावर नावलौकिक प्राप्त करुन देण्याबरोबरच आपण त्याला अर्थात ज्या महापुरुषाचे नाव विद्यापीठाला आहे. त्यासाठी १६ तास काम करुन मि. आणि तुम्ही सुध्दा केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्यासाठी रात्रंदिन प्रयत्न करत राहू. हा किती त्यांचा दृढ विश्वास आहे. यावरूनच त्यांची उच्चता. विद्याविभूषता विचार करण्या बरोबर ज्ञानाची पातळी किती मोठी आहे. किती ते ध्येयाने प्रेरीत झाले आहेत. यावरून स्पष्ट होते. प्रत्येक वेळी बोलतांना ते विद्यार्थ्यांशी स्पष्टपणे संवाद साधतात. यावरुण स्पष्ट होते की सर्वांना सामावून घेऊन यशामागे न पळता यश आपल्या पाठीशी उभे राहिल ते एकटयाने होणानर नाही त्यासाठी केंद्रीयविद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी प्राध्यापक, विभागप्रमूख, विद्यापीठ प्रशासना समवेत मि ,कुलगुरू आपण सर्वांनी प्रयत्न केले तर यश हे जवळ आहे. आणखी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला जाईल यात शंका नाही. असा त्यांचा गाढा व अभ्यास पूर्ण मनोदय विश्वास कुलगूरू डॉ. बी.ए चोपडे यांचा आहे.

**धर्मनिरपेक्षता : अर्थ आणि गरज**

**(Secularism: Meaning and Needs)**

राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षता दृष्टिकोनाची विशेष गरज आहे. कारण भारत हे बहुधर्मीय राष्ट्र आहे. भारतात हिंदू मुस्लिम, बौद्ध ,जैन शीख पारसी ख्रिश्चन धर्मीय परस्परांच्या साम्निध्यात जीवन जगत आहेत. धर्माधर्मातील सहिष्णु वृत्तीमुळे सर्वधार्मीक समुहांना स्वविकासाची संधी लाभलेली आहे. काही प्रमाणात धार्मिक समुहांत तात्कालिक स्वरूपाचे ताण तणाव निर्माण झाले असतील ही परंतु १९४७ चा देशाच्या पाहणीचा अपवाद वगळता राष्ट्राला धोका निर्माण होईल अशी ठळकपणे कोणतीही घटना घडलेली नाही.

प्राचीन काळापासून विभिन्न धर्मीय आक्रमण कारी , व्यापारी, आश्रित म्हणून या देशात आले आाणि भारतीय भुमीत सामावले गेले. बौद्ध, जैन आणि शीख हे याच देशातील धर्म असून हिंदू धर्म सुध्दा याच भूमिकेतून विकसित झाली आहे. या सर्व धार्मिक समहांमध्ये परस्परांच्या जीवन पध्दतीचा आदर करण्याची धारणा आहे.

सम्राट अशोकाने (इ.स.पु.३रे शतक ) आपल्या शिलालेखातून धर्मनिरापेक्ष तेचा विचार मांडला आहे. राज्य कोणत्याही धार्मिक आचार. विचारात हस्तक्षेप करणार नाही. तसेच प्रत्येकाला स्वधर्मचरणाची मुभा आहे, असे नमूद केले आहे. सम्राट अकबराने दिने इलाही धर्माची स्थापना करून सर्व धर्मातील तत्व ज्ञानाचा त्यात अंतभाव केला आहे. छत्रपती शिवरायांचा दृष्टिकोन धर्म निरपेक्ष होता त्यांच्या सेनादलात विभिन्न जाती धर्माच्या सैनिकांचा अंत भावि होता हे सर्व विदित आहे.

इंग्लंडमधील व्यापारासाठी आलेल्या आाणि पुढे वसाहत निर्माण करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनी

बिटिशशासकांनी विभिन्न धर्मसंबंधी सहिष्णुता दर्शविली असून ऐतद्देशियांच्या धार्मिक व्यवहारात हस्तपेक्ष न करण्याचे धोरण स्वीकारलेले दिसून येते. राजा राम मोहन रॉयसारख्या समाजसुधारकांनी केलेल्या प्रयतनातून सती प्रथेवर बंदी घालणारा कायदा इ.स.१८२८ मध्ये लॉर्ड बेंटिग याने केला. इ.स. ध१८३५ मध्ये इंग्रजी माध्यमाच्या मां शाळामधून धर्मनिपेक्ष शिक्षण (Secular Education) देण्यात आरंभ झाला. इंग्रजांनी शासन म्हणून केलेल्या भौतिक सुधारणा तसेच सामाजिक समस्याचा संदर्भात केलेले कायदे धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनात्मनक प्रेरित होते.

इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्या लढ्याचा प्रेरणा इतिहास पाहिला तर या लढयाच्या प्रेरणा धर्मपंथांना ओलांडून गेलेल्या होत्या. एक प्रकारे त्याचे स्वरूप धर्मनिरपेक्षा होते. जाती धर्म पंथाचा विचार त्यात मुलीच नव्हता ब्रिटिशांची सत्त नष्ट करणे हे सर्वांचे ध्येय होते.

इ.स. १८८५साली अखिल भारतीय कॉंग्रेसची स्थापना झाली. तिचे पहिलं अध्यक्ष बॅ.उमेश चंद्र हे ख्रिश्चन तर तिसरे अध्यक्ष बद्रुद्दिन तय्यब जी हे मुस्लिम होते. दादा भाई नौराजी हे पारशी हाते म्हणजेच अखिल भारतीय कॉंग्रेसचे स्वरूपही पूर्णपणे धर्मनिरपेक्ष होते. पुढे मात्र इंग्रजांनी आपल्या धोरणात बदल केला आणि धार्मिककतावादा जो पासले स्वातंत्र्याची चळवळ गतिहीन करणे तिच्या संघटनात्मक शक्तिवर आघात करण्याच्या हेतू ने धार्मीक फूट कशी पडेल या चा विचार करण्यात आला. असे असले तरी म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले देशव्यापी स्वातंच्याचे आंदोलन, १९४२ ची चलेजाव चळवळ धर्म-पंथ-वंश-जात-भाषा प्रदेशातील जनतेला जोडणारी होती. राष्ट्रीय पातळीवर सर्व प्रकारच्या भेदाभेदाला विलांजली देऊन एकसंघ एकात्म भारतीय समाजाचे चित्रसा कारणारी होती. स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनी धर्मनिरपेक्षता या मुल्यास अतिशय महत्व दिलेले आढळते.

**धर्मनिरपेक्ष तेचा अर्थ :- Meaning of Secularism**

धर्मनिरपेक्षता म्हणजे एखादयाचा धार्मिक आदर्श आणि विश्वासाच्या साधरण पणे सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात हस्तेक्षप नसते.

एम.एन.रॉय :- जेव्हा राज्याचा विशिष्ट धर्माशी जिवंत संबंध नसतो तेव्हा निधर्मी राज्य म्हणता येईल.

**डॉ. एम. एन. श्री निवास :-**

धर्म निरपेक्षता म्हणजे पुर्वी धार्मीक म्हणून मानल्या गेलेल्या गोष्टीचे धार्मीक आधार संपुष्टात येणे होय ।।

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

हे राज्य निधमी आहे. याचा अर्थ लोकसभा विशिष्ट धर्म अन्य लोकांवर लादू शकणार नाही.

या धर्मनिरपेक्षते चा पुरस्कार १९३१ च्या कराची येथील कॉंग्रेस अधिवेशनामध्ये व जवाहरलाल नेहरू यांनी केला होता. नेहरु धर्मनिरपेक्ष धोरणाचे समर्थक होते.

येथे धर्मनिरपेक्ष राज्य आणि धर्मनिरपेक्ष समाज यातील अंतर लक्षात घेतले पहिजे कारण घटनेने कोणत्याही एक धर्माचा स्वीकार केलेल नाही. (उदा. पाकिस्तान मुस्लिमधर्म) सर्व धर्मांना समान मानले आहेत परंतु भारतीय समाजात मात्र धर्मनिरजेक्षता नाही. साधारणता : प्रत्येक व्यक्ती स्वधर्मा चे आचरण करीत असते. प्रार्थना पुजा, उपवास संस्कारात सहभागी होते आणि तशा प्रकारे स्वधर्म आचाराची त्या व्यक्तीला मुभा आहे .

**घटनेचे कलम २५ (१)**

मा हा १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, लोकसभा राज्यसभा-विधानसभा-विधान परिषद-न्यायाल शासकीय संस्था संघनात राष्ट्रीय नेत्यांन अभिवादन केले जाते. राष्ट्रीय गीत गाईले जाते शिक्षणातून कोणत्याही एकाच धर्माचे आचार निवेदन केले जाते नाही. शिक्षणसुध्दा धर्मनिरपेक्ष आहे.

**घटनेतील प्रबंध :-**

भारतीय राज्यघटना १९५० मध्ये संमत करण्यात आली, या घटनेचे स्वरुप पूर्णच धर्मनिरपेक्ष आहे. मात्र त्यावेळी घटनेच्या ध्येय निदर्शक प्रास्ताविकात धर्मनिरपेक्ष संकल्पना नव्हती. १९७८ च्या घटनादुरुस्ती धर्मनिरपेक्ष संज्ञा समाविष्ट करण्यात आली.

धर्मनिरपेक्षतेला आधार देणाऱ्या काही तरतुदी **पुढीलप्रमाणे -**

कलम १५ (१) व कलम २५ मध्ये समानते अधिकार दिलेले आहे. कलम (१५) (१) नुसार राज्य केवळ धर्म वंश जा लिंग व जन्म स्थान अथवा या पैकी कोणत्याही कारनावरु कोणत्याही नागारिकाला प्रतिकूल असा भेद भाव करणार नाही

**कलम २९ (१)** नुसार, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान केला आहे राज्य धर्म या कारणा वरुन भेदभा करणार नाही आणि सर्व व्यक्ती धर्म प्रतिज्ञापित करणे आचरणे, व प्रसार करणे यासाठी हक्कदार आहेत.

या तरतुदी नुसार शासकीय शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही, धार्मिक शिक्षण किंवा प्रार्थना या मध्ये सहभागी होण्याची सक्ती राज्यामध्ये केली जाणा नाही. धामिक स्वातंत्र्य जोपर्यंत सार्वजनिक शांतता नैतिकता आणि आरोग्य यांना बाधा येत नाही तो पर्यंत दि जाऊ शकते मात्र ज्या धार्मीक बांबतीत हस्तक्षेप करणे आवश्यक आहे त्यात हस्तक्षेप करण्यात अधिकार राज्याल आहे. उदा: देवदासी प्रथा इ.

राज्य घटनेतील या तरतुदी नुसार भारतीय

लोकशाहितील विविध संस्था-संघट नांचे कार्य चाललेले आहे.

**धर्मनिरपेक्षतेची गरज :-**

भारतासारख्या बहुधर्मीय समाजामध्ये राज्याचे धर्मनिरपेक्षात हे मूल्य स्वीकारुन रुढिनियत समाजापासून (sacred society) धर्मनिरपेक्ष समाजाप्रत (sacred society) मूलभूत परिवर्तन घडविले आहे. बेकर म्हणतो धर्मनिरपेक्ष तेने परिवर्त नाला गती दिली आहे. या प्रकियेत धर्मप्रभावाचा शासकीय क्षेत्रात मागमूस ऊरला नाही.

श्रीराम कृष्ण परमहंस, विवेकानंद म.गांधी आणि सर्व थोर साधू संत राजनीतीज्ञांनी धर्मनिरपेक्षतेचा केलेला पुरस्कार हा प्रामुख्याने धर्मनिरपेक्षतेची गरज दर्शविणार आहे.

या द्रष्टयांनी भारतीय समाजाचा इतिहास आणि सदयसमाज रचना लक्षात घेऊन धर्मनिरपेक्षतेचे समर्थन केले आहे.

धर्मनिरपेक्षतेची गरज दर्शविणारे मुद्दे पुढील प्रमाणे -

**राष्ट्रीय एकात्मता :-**

आत्ता पर्यत केलेल्या चर्चेवरुन हे स्पष्ट होते की, भारतात राष्ट्रीय एकात्मातात निर्माण करावयाची असेल वर सर्व धार्मिक गटांना समान मानले पाहिजे. प्रत्येक धार्मिक समूहाला स्वधर्मचरणाची अनुमती दिली पाहिजे. आणि प्रत्येक धर्मातील घटकांनी दुसऱ्या धर्मातील जीवन पद्धतीचा आदर करण्याचे निश्चित केले पाहिजे. म्हणजे राष्ट्रीय एकात्मता साध्य होईल.

थोडक्यात धर्मनिरपेक्षा धोरणातून राष्ट्रीय एकात्मता साधण्यास बळ प्राप्त होते आणि राष्ट्रीय एकात्मतेत सातत्य राखले जाऊ शकते.

**राष्ट्रीय भावना:-** भारतीय समाजातील सदस्य आपआपल्या धर्माचे आचरण करतात, धार्मिक संस्कार लहानपणापासून केले जातात. त्या धर्मातील संकेत-विश्वास-प्रथा-परंपरा म्हणजेच धार्मिक जीवनपध्द्‌तीशी परिचित होतात. या प्रकियेतून स्वधर्म विषयीचे प्रेम, आत्मीयता निर्माण होणे स्वाभाविक असते.

विभिन्न धाार्मिक गटांमध्ये सहिष्णुतेची भावना असावी म्हणजेच राज्याने स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या धोरणाचा प्रत्येक समुहाने पुरस्कार केला पाहिजे.

त्याचप्रमाणे स्वधर्मपिक्षा राष्ट्र महत्वाचे आहे, हे मानले पाहिजे,एक प्रकारे धार्मिक भावनपेक्षा राष्ट्रिय भावना वरचढ असावी ही राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज असल्याचे सहजपणे लक्षात येते.

**सामाजिक ऐक्यभाव :-**

भारतीय समाजाचे धर्माच्या आधारे वेगवेगळे खंड झालेले आहेत, प्रत्येक धार्मीक समूहात स्वश्रेष्ठतेची भावना असते. अशा स्वयं केद्रिततेच्या भावनेमुळे दुसऱ्या धर्मावर टिका केली जाते, आमचा धर्म श्रेष्ठ कसा आहे? अशा चुकीच्या धारणेमुळे धार्मिक समुहांमध्ये ताण-तणाव आणि संघर्ष उद्‌भवण्याची शक्यता नाकरता येत नाही असे संघर्ष टाळाचे असतीलतर आपल्या धर्माप्रमाणे वर्तन करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे तसेच दुसऱ्या धर्माविषयी उदारतेची भावना बाळगली पाहिजे.

धार्मिक ताण-तणावाचा इतिहास लक्षात घेऊनच भारतीय घटना कारांनी आणि त्या पुर्वीच्या समाज सुधारकांनी सामाजिक ऐक्यभाव वृद्धिधंगत होण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज लक्षात घेतली आहे. एकून भारतीय समाजातील ऐक्यभावाचे लहान करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज स्पष्ट होते.

**समान संधी :-**

देशातील विभिन्न धर्मातील सदस्यांना आथिक-राजकीय-सांस्कृतिक सामाजिक अन्य क्षेत्रात समान संधी प्रदान करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज आहे.

राज्याने विशिष्ट धर्मालाच मान्य ता दिली असती तर त्या धर्मातील सदस्यांना सर्वात सर्वात जास्त संधी मिळाल्या असत्या आणि इतर धमीयांची गळचेपी झाली असली: परंतु धर्मनिरपेक्षतेमुळे बहुसंख्यांक धर्मीयांबरोबर अल्पसंख्याकांना सुध्दा तितकीच संधी प्राप्त झाली आहे.

**व्यकितमत्व विकास :-**

या देशातील प्रत्येक नागारिकास सारखेच अधिकार आहेत,

कोणत्याही नागारिकांमध्ये भेदभाव (कलम-१५) केला जात नाही. धार्मिक समुहाच्या सदस्यत्वापेक्षा त्याच्या अंगी असलेल्या गुण व कौशल्यास महत्व दिले जाते. म्हणजेच प्रत्येक नागरिकाला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची संधी दिली जाते. तसेच कोणावरहीअन्याय केला जात नाही. हे घडण्यासाठी राज्याने घटनेत स्वीकारलेले धर्मनिरपेक्षतेचे धोरण पायाभूत ठरले आहे.

**समस्यांचे निर्मुलन :-**

भारतीय समाजातील जाती पृथा अस्पृश्यता या धर्माच्या आधाराने जोपासलेल्या समस्या होत्या. घटने ने स्वातंत्र्य समता बंधुता समान न्याय ही मुलये स्वीकारलेली आहे. प्रश्न विषमता निर्माण करणारे आहेत. शोषणावर आधारित आहेत म्हणून त्या संबंधात कायदे करण्यात आले आहेत आणि त्यांना भेदाभेदाचा आधार मानण्यात येणार नाही असे अभिवचन देण्यात आले आहे.

एक प्रकारे धर्मनिरपेक्षते च्या धोरणाने प्रस्तुत समस्यांचे निर्मुलनात मदत प्राप्त झाली आहे.

त्याच प्रमाणे जगात आपल्या राष्ट्रीची प्रतिमा उज्ज्वल होण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज आहे. बहुधर्मीय असलेल्या देशात बहुसंख्यांक असलेल्या धर्माच्या सदस्यांनाच राजकीय क्षेत्रात पदे दिली गेलेली नाही. सर्वोच्च पदावर अधिष्टीत झालेल्या व्यक्तींचा विचार केला तर याचे प्रत्यंतर येते. या सर्व निर्णयावर धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टिकोनाचा प्रभाव पडलेला दिसतो.

सव्वाशे कोटि लोकसंख्या असलेल्या देशातील वेगवेगळ्या धर्माचे नागारिक राष्ट्रीय विकासाठी सतत झटतात आणि त्याच्यांत कोणत्याही प्रकारचा भयंकर संघर्ष नाही, याचे श्रेय धर्मनिरपेक्षतावादी धोणास दिले पहिजे.

काही वेळा धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध असे काही हितसंबंधी लोक चुकीचे प्रतिवादन करतात. परंतु धर्मानिरपेक्षतेत कोणत्याही धर्माला विरोध नाही. उलट सर्वधर्मांविषयीचा आदर आणि समभाव त्यात समाविष्ट आहे.

भारतीय स्वातंच्याचा अर्ध खत शतकापेक्षा जास्त कालवधी लोटला आहे, या कालखंडतील राष्ट्राची सर्वागीण प्रगती पाहता म.गांधी पं.जवाहरलाल जी नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबडेकर आणि सर्व नेत्यांनी स्वीकारलेले हे धोरण कसे योग्य होते हेच स्पष्ट होते.

**भावसार तन्मय प्रभाकर**
'एम. फील. समाजशास्त्र विभाग



## स्व. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण योजनेचे (कमवा आणि शिका) मूल्यमापन

**प्रस्तावना :–**

विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा मूलभूत घटक आहे. समाजातील विविध स्तरांतून विद्यार्थी येत असतात. यामध्ये उच्च, मध्यम व निम्न उत्पन्न गटातील विद्याथ्र्यांचा समावेश होतो. खऱ्या अर्थाने समाजातील निम्न व मध्यम स्तरातील विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात यावेत व टिकावेत, त्याचा सर्वांगीण विकास व्हावा. जागातिक शिक्षण व्यवस्थेत त्यांनी टिकवून राहावे यासाठी शिक्षण व्यवस्थेत विविध उपक्रम व योजना शालेय, महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर राबविल्या जातात. त्यापैकी बहुजन समाजात शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी, ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचण्यासाठी, कमवा व शिका योजना महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

**कमवा आणि शिका योजनेची पार्श्वभूमी :–**

शारिरिक श्रमावर भर दिल्याशिवाय गोरगरीबांची मुले शिकू शकणार नाहीत या विषयीचा विचार पाश्चात्य सुप्रसिद्ध स्विझ शिक्षणतज्ज्ञ जॉन हेन्रिक पेस्टालॉझी यांनी बऱ्याच वर्षावूर्वी मांडला होता. शिक्षणाचे साधन म्हणून शारीरिक श्रमाकडे पाहण्यासाठी कल्पना पेस्टालॉझी यांनी बऱ्याच वर्षापूर्वी मांडला होता. शिक्षणाचे साधन म्हणून शारीरिक श्रमाकडे पाहण्याची कल्पना पेस्टालॉझीचा एक सहकारी फिलिप इमॅन्यूएल फेलेबर्ग (१७७१–८४) याने आणखी विकसित शारीरिक श्रमांच्या द्वारा शिक्षण या त्याच्या योजनेला युरोप अमेरिकेत चांगली प्रसिद्धी मिळाली. बौद्धिक आणि शारीरिक श्रमाचा समन्वय घडवून आणणाऱ्या या शैक्षणिक प्रयोगासंबंधी फेलेनबर्ग यांचा शैक्षणिक आकृतिबंध विशेषत : अमेरिकेत लोकप्रिय झाला. अमेरिकेत सुरुवातीचे महाविद्यालय याच तत्वावर स्थापन करण्यात आली. ब्रुबॅचर से. एस (१९४९) यांच्या मते, खऱ्या अर्थाने अमेरिकेतील शारीरिक श्रम हे महाविद्यालयाचे उद्दिष्टय नव्हते तर परंपरागत शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यार्थ्यांना इतरांबर अवलंबून रहावे लागू नये, हाच त्यामागचा खराखुरा हेतू होता. भारतात शिक्षणाचे महत्कतव लक्षात घेऊन समाजसुधारकांनी स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक शैक्षणिक संस्था सुरु केल्या. त्यापैकी एक कर्मवी भाऊराव पाटील हे होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिक्षणाबद्दलची आस्था पाहता त्यांनी महाराष्ट्रात ०४ऑक्टोबर १९१९ रोजी काले, ता. कराड येथे 'रयत शिक्षण संस्थेची ' स्थापना केली. ही शिक्षण संस्था स्थापन करण्यामागे प्रमुख हेतु होता की, ग्रामीण भागातील बहुजन समाजाची मूले शिक्षण प्रवाहात यावीत. म्हणूनच एका उक्तीनुसार–

साऱ्या कोवळ्या जीवांना अक्षरांचा स्पर्श दिला
उजेडाचे दान देण्या झोपडीत सुर्यं आला ।

या संस्थेच्या स्थापनेनंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांना असे लक्षात आले की, अनेकांना आर्थिक परिस्थिती अभावी शिक्षण घेणे शक्य नव्हते, याबरोबरच शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना विशिष्ट कौशल्य आत्मसात करुन भावी जीवनात यशस्वी झाला पाहिजे, या हेतूने महात्मा गांधी यांच्या स्वावलंबन कार्यातून प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९२७ मध्ये रयत संस्थेच्या धनणीच्या बागेत 'कमवा आणि शिका' या योजनेस प्रारंभ केला. रयत शिक्षण संस्थेचे ब्रीद वाक्य 'self Reliance Through

Education' या मागील योजनेतून साध्य होते. रयत शिक्षण संस्थेने सूरूकेलेल्या या योजनेचे रोपटे आज वटवृक्षात रुपांतरीत होऊन महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठ व महाविद्यालय राबविल्या जात आहे.

मराठवाड्यातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती मागासलेलली असल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून मराठवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात स्थापना २३ ऑगस्ट १९५८ रोजी करण्यात आली. या विद्यापीठातून उच्च शिक्षणाच्या प्रमाणात वाढ व्हावी आणि आर्थिकदृष्या गरीब असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वसंतरावजी काळे यांनी इ.स. १९७४ साठी विद्यापीठाच्या अधिसभेत 'कमवा आणि शिका' योजनेचा प्रस्ताव मांडला व तो मंजूरही झाला . त्यानुसार १९७४ पासून ही योजना डॉ. बाबासोहब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कार्यरत आहे. या योजनेचे २७ ऑक्टोबर २००७ रोजी 'स्व. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना ' असे नामकरण तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री मा. ना. शरचंद्रजी पवार यांचे हस्ते करण्यांते आले .

**कमवा आणि शिका योजनेता सहभागी विद्यार्थ्यांची संख्या :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कमवा आणि शिका योजनेत २००१-०२ पासून आजपर्यंत सहभागी विद्यार्थ्यांची संख्या पुढीललप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

| अ.क्र. | वर्ष | कमवा आणि शिका लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | २००१-२ | २७५ |
| २ | २००२-०३ | २५० |
| ३ | २००३-०४ | २५० |
| ४ | २००४-०५ | २७५ |
| ५ | २००५-०६ | ३०० |
| ६ | २००६-०७ | ४०० |
| ७ | २००७-०८ | ३५० |
| ८ | २००८-०९ | ३२५ |
| ९ | २००९-१० | ४८५ |
| १० | २०१०-११ | ५०० |
| ११ | २०११-१२ | ४५० |
| १२ | २०१२-१३ | ५५० |
| १३ | २०१३-१४ | ५९० |
| १४ | २०१४-१५ | ४७० |

आधार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद कार्यालयीन नोंद

**योजनेचे स्वरूप:-**

गेल्या ३८ वर्षापासून निरंतरपणे ही योजना चालू आहे. विद्यार्थी स्वावलंबी व्हावे. तसेच त्यांना श्रमाची प्रतिष्ठा कळावी म्हणू प्रत्येक म्हणून प्रत्येक दिवसाला दोन तास विद्यार्थ्यांकडून श्रम करुन घेतले जाते. विद्यापीठात येणारा विद्यार्थी हा ग्रामीण भागाती असल्यामुळे आणि त्याचे मातीशी आाणि त्याचे मातीशी घट्ट नाते असावे. त्याला कृषी संस्कृतीची जाणीव असावी म्हणून विद्यापीठातीन उद्यान, शेतीतील कामे, फळबाग लागवड, भाजीपाल्याची शेती शेती, इ. कामे या योजनेत विद्यार्थ्यांकडून करुन घेतली जातात. तसेच त्याला भविष्यात व्यवसायाभिमुख संधी उपलब्ध व्हावी यासाठी या योजनेअंतर्गत फाईल केंद्र, फोटो कॉपी केंद्र व एस. टी. डी. केंद्र यासारखे उपक्रम राबविले जाते. या योजनेपासून विद्यार्थ्यांना लाभ मिळत असतो. तसेच विद्यापीठासही प्रत्यक्षपणे लाभ मिळत असतो.

**१ प्रत्यक्ष स्वरुपातील लाभ :-**

या घटकात योजनेच्या अनेक उपक्रमापासून प्रत्यक्ष स्वरुपात विद्यापीठास लाभ मिळतो. यात फळबाग व विक्री केंद्र, भाजीपाला लागवड व विक्री, फाईल लिफाफे व स्क्रिन पिंटींग केंद्र, पीसीओ ॲण्ड एसटीडी केंद्र, फोटो कॉफी केंद्र, इ. उपक्रमाचा यात समावेश केला जातो.

**II) अप्रत्यक्ष स्वरुपातील लाभ :-**

योजनेअंतर्गत प्रत्यक्ष स्वरुपातील विचार केला असला तरी योजनेतून अप्रत्यक्ष स्वरुपात लाभ प्राप्त होत असतात, जसे विद्यापीठातील परिसर साफ-सफाई, गांडूळखत आणि बीज निर्मिती केंद्र, वृक्षरोपण व संरक्षण इ. फायदे विद्यापीठास या योजने अंतर्गत मिळतात.

कमवा आणि शिका योजनेतील सामाजिक लाभ-व्यय दर्शविणारा तक्ता

| | Benefits - लाभ | Costs -व्यय |
|---|---|---|
| I) वास्तविक (Real) | | |
| 1. प्रत्यक्ष (Direct) | | अदानांवरील आणि मानघनावरील खर्च |
| A) मूर्त (Tangible) | पदव्यत्तर शिक्षणाची संधी | |
| B) अमूर्त (intangible) | स्वावलंबी विद्यार्थी (श्रमप्रतिष्ठा) | |
| 2. अप्रत्यक्ष (Direct) | | |
| A) मूर्त (Tangible) | पालकांवरील आर्थिकभार कमी होणे | |
| B) अमूत (intangible) | शिक्षित समाजाची निर्मिती | |
| II) आर्थिक (Pecuniary) | योजनेतून विद्यार्थ्यांना मिळणारे मानधन | |

**आधार :-** Musgrave Richard A. (1989), Pubic Fiance, Mcgraw-Hill Book Company.

वरील तक्त्यामध्ये कमवा आणि शिका योजनेतील विद्यार्थ्यांना बाह्यतेच्या स्वरुपात मिळणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्येक्ष लाभावी स्थिती दर्शविलेली आहे. कमवा आणि शिका योजनेमध्ये विद्यार्थ्यांना वास्तविक–प्रत्यक्ष (मूर्त, अमूर्त) व अपत्यक्ष (मूत, अमूर्त ). तसेच आर्थिक लाभ मिळतात. योजनेतून मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा विचार करता योजनेतून मिळणारे मानधन कमी असेल तरी योजनेतील विद्यार्थ्यांना बाह्यतेच्या स्वरुपात मिळणाऱ्या प्रत्यक्ष लाभामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध होते व श्रम प्रतिष्ठमुळे विद्यार्थी स्वावलंबी बनतो तर अप्रत्यक्ष स्वरुपाच्या लाभामध्ये पालकावरील आर्थिक भार कमी होणे व उच्च शिक्षित समाजाची निर्मिती अशा स्वरुपाचे बाह्य लाभ हे विद्यार्थ्यांना योजनेच्या मिळतात असे वरील विश्लेषणावरुन स्पष्ट होते.

**सद्यस्थितीतील चालू असणाऱ्या उपक्रमाची कामगिरी :–**

कमवा आणि शिका योजने अंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात, फाईल, लिफाफे, पॅड व स्क्रिन पिंटिंग केंद्र, फोटो कॉपी केंद्र, एस.टी.डी.व पी.सी.ओ. केंद्र, स्टेशनरी व विद्यापीठ प्रकाशन केंद्र, शेती, गांडूळ खत प्रकल्प इत्यादींचा एकूण लाभ व व्ययाचा तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**सद्यस्थितीतील चालू असणाऱ्या उपक्रमांची कामगिरी दर्शविणारा तक्ता**

| अ क्र | उपक्रम (२०१४–१०) | AARR परताव्याचा इच्छित दर १५% | क्रम RANK | लाभ व्यय गुणोत्तर BCR i= 10% | क्रम Rank | नक्त विद्यमान मूल्य N.P.V i= 10% | क्रम Rank | नक्त विद्यमान मूल्य N.T.V i*= 10% r* = 20 | क्रम Rank |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फाई, लिफाफे, पॅड व स्क्रिनपिंटिग केंद्र | १३.२२ | ५ | १.३८ | ५ | १,९७,१६३.४८ | ४ | ९४९९३९.९५ | ३ |
| २ | फोटो कॉपी केंद्र | ४०.७९ | १ | २.४३ | १ | ४,८७,७३९.७ | २ | १३३५९३५८५ | २ |
| ३ | D STD & PCO केंद्र | ३४.८१ | २ | २.६५ | २ | ५,९३,१७४.६ | १ | २०३६५२५.५६ | १ |
| ४ | शेती | २५.९८ | ४ | १.८६ | ४ | २,२५,४९५.६३ | ३ | ७१००९८.१२ | ४ |
| ५ | गांडूळ खत | २६.९९ | ३ | १.९० | ३ | ४३,५५५.९३ | ५ | १३९९५९५.४५ | ५ |

टिप :– १. २००४ ते २०१० या कालावधीत वरील सर्व उपक्रम चालू होते.
२. २००४ ते २०१० या कालावधीत नवीन उपक्रमाची सरुवात करण्यात आली त्यामुळे या कालावधीची निवड करण्यात आली.

**सर्वक्षणाचे निष्कर्ष आणि शिफारशी :–**

खालील निष्कर्ष व शिफारशी या प्राथमिक व दुय्यमसाधनसामुग्रीवर आधारलेला आहे.

१) कमवा आणि शिका योजनेसाठी अंदाजपत्रकात केलेली तरतूद पूर्णत: खर्च केली जात नाही, असे दिसून आले.२००१–०२ ते २०१०–११ या वर्षात केलेल्या तरतुदीपेक्षा खर्च कमी झाल्याचे दिसून आले. यासाठी योजनेच्या अंदाजपत्रकात केलेली तरतूद पूर्णत: खर्च करण्यात यावी अथवा तो निधी अन्यत्र वळवू नये.

२) विद्यापीठातील विविध विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता विद्यापीठातील एकूण विद्यार्थी संख्यशी कमवा आाणि शिका योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १० टक्के असून ते कमी असल्याचे दिसून आले. यासाठी आार्थिकदृष्ट्या गटातील मागेल त्या विद्यार्थ्याला काम देण्यात यावे.

३) कमवा आणि शिका योजनेद्वारे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रति तास मानधन खूप कमी असल्याने दिसून येते. कारण वाढता मेस खर्च, स्टेशनरीच्या वाढत्या किंमती, डी.टी.पी खर्च, फोटो कॉफीचे वाढले दर, इ.वाढ लक्षात घेता मानधन अपुरे पडते. यासाठी योजनेतील विद्यार्थ्यांना मानधन भाववाढीच्या दराशी निगडीत ठेवून दरवर्षी वाढवावे.

४) कमवा आणि शिका योजनेते करताना वापरली जाणारी अवजारे दुय्यम दर्जाची असल्याचे दिसून आले. त्याचा शोध घेतला असता त्यामध्ये झाडे व झुडपे तोडण्यासाठी बोथट कुऱ्हाडी, बिगर मुठीचे विळे व खुरपे, गवत काढण्यासाठी बोथट तलवारी, इ. या अजवारांच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थ्यांना काम करताना त्रास होताना दिसून आला. यासाठी अवजारे अद्यायावत, तांत्रिक मजबूत व संख्येने अधिक उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५) योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांना श्रमप्रधान काम करत असल्याचे आढळून आले. योजनेतील विद्यार्थ्यांना कलागुणानुसार कौशल्याची, व्यावसायिक व कार्यालयीन कामे देण्यात यावीत.

६) योजनेत श्रम करत असताना जखम झाल्यास प्राथमिक उपचार करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सोय सुविधा नाही. त्यासाठी प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करण्यात यावी.

७) कमवा आणि शिका योजनेअंतर्गत आणखी दोन नवीन फोटो कॉफी केंद्राची स्थापना करण्यात यावी. कारण सद्यस्थितीत विद्यापीठात दोन फोटो कॉफी केंद्र चालू आहे. परंतु वाढती फोटे कॉपींची मागणी लक्षात घेता हे केंद्र अपुरे पडते. यासाठी नवीन फोटो कॉफी केंद्र चालू करण्यात यावे.

८) कमवा आणि शिका योजना संगणीकृत करणे आवश्यक आहे. कारण प्रशासनाचा प्रशासकीय व आर्थिक ताण कमी होईल आणि याचाच फायदा विद्यार्थी व विद्यापीठ प्रशासनाला होईल.

**श्री गोवर्धन एल. भुतेकर**
संशोधक–अर्थशास्त्र विभाग
मार्गदर्शन : प्रोफेसर धनश्री महाजन.



## 'रासेयो'तून स्वयंसेवकांचा उत्कर्ष

समाजामध्ये घडणाऱ्या गोष्टींकडे सकारात्मक पाहण्याची गरज आहे, समाजात असणाऱ्या नकारात्मक गोष्टी, त्याच्या समस्या, प्रश्न जाणून घेण्यासाठी व्यक्तिमत्त्व हे व्यापक, चतुरस्त्र असणं महत्त्वाच आहे त्या समस्येकडे डोळसपणे बघून त्याच निराकरण कशा पध्दतीने करता येईल या दृष्टिने व्यक्तिमत्व घडविता आल पाहिजे. हे प्रश्न सोडवत असताना त्याचा फायदा त्या व्यक्तीला व त्याच्या समाजासुध्दा होतो. म्हणून अशा समाजाला उत्तम नागारिक देण्याच काम करणारी यंत्रणा म्हणजे 'राष्ट्रीय सेवा योजना'

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना वर्षभर श्रमदान, वृक्ष लागवड, रक्तदान, रस्ता सुरक्षा आभियान, एड्स जनजागृती रॅली, ग्रामस्वच्छता अभियान, पाणी अडवा पाणी जीरवा अशा विविध समाजयोगी उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेतले जाते. तसेच समाजा प्रति असेलली त्यांची जाणीव सुध्दा स्वयंसेवकांना विविध शिबीराच्या माध्येमातून करुन देण्यात येते. त्या उपक्रमांव्यतिरिक्त स्वयंसेवकांना विविध क्षेत्रात विकास करता यावा तसेच आपल्यातील कलागुण सर्वांसमोर सादर करता यावेत म्हणून विविध राज्यस्तीय स्पर्धेचे आयोजन देखील केली जाते. यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या अभ्यासाचा समावेश असलेले 'आव्हान' हे शिबीर नेतृत्व गुणविकास प्रशिक्षणासाठी 'प्रेरणा शिबीर' साहसी क्रिडा प्रशिक्षणासाठी 'साहसी' शिबीर शिखर सर करण्याच्या प्रशिक्षणासाठी वन–चेतना शिबीर, तसेच स्वयंसेवकांना सांस्कृतिक क्षेत्रात विकास करता यावा, आपल्यातील कलागुण सर्वांसमोर सादर करता यावे म्हणून 'उत्कर्ष' या राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले जाते.

'प्रेरणा' हे राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीर या वर्षी नवीनच सुरु झाले. या वर्षीचे शिबीर हे सावित्रीबाई फुले पूणे विद्यापीठ पुणे या ठिकाणी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून माझ्यासह एकूण दहा विदयार्थ्यांचा संघ या शिबीरात सहभागी झाला. या शिबीराचा उत्कृष्ट स्वंयसेवक म्हणून मला गौरविण्यात आले. या शिबीरामध्ये आम्हाला समाजाच्या समस्या सोडवत असताना नेतृत्व गुण किती महत्त्वाचे आहे, देणे कसे आवश्यक आहे. त्याचा फायदा आपण स्वतःहाला व समाजाला कसा करुन घेऊ शकतो याविषयी अनेक सामाजिक क्षेत्रांतील तंज्ञानी मार्गदर्शन केले. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून मला गौरविण्यात आले. त्याबद्दल आनंद आहेच पण त्याही पलीकडे जाऊन या शिबीराने मला काय दिले ते महत्त्वाचे आहे. या शिबीराने दिलेले ज्ञान मी माझ्या जीवनात व्यावहारिक पातळीवर आमलात आणू शकलो तर या शिबीरातून खरी प्रेरणा मिळाली असे म्हणता येईल व जीवनातील मार्गदर्शकांच्या यादीत या शिबीराचा समावेश होईल.

'रासेयो' च्या माध्यमातून समाज जागृतीसाठी काम करणाऱ्या युवक युवतींनाही त्यांचे कलागुण सर्वांना दाखविता यावेत म्हणून दरवर्षी 'उत्कर्ष' या सामाजिक–सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले जाते. या वर्षी प्रथमच या स्पर्धेचे यजमानपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे आले होते. 'स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यापीठ' या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा घेण्यात आली. नृत्य गटात संकल्पना नृत्य, नाटय गटात पथनाटय, संगीत गटामध्ये समूहगीत, भारतीय लोकवादय, भारतीय लोककला गटामध्ये पोवाडा, भारुड, लालीतकला गटामध्ये भीत्तीचित्र, साहित्य गटामध्ये वकतृत्व निबंध, कविता स्पर्धा तसेच छायाचित्रण या विविध गटात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघात माझा सहभाग होता.

या स्पर्धेत एकूण १९ विद्यापीठांचे संघ सहीभागी झाले होते. क्रिएटिव्ह नृत्य व पथनाटयाच्या माध्यमातून विद्यार्थी–विद्यार्थीनींनी सामाजिक वास्तवाचे दर्शन घडविले. आपल्या अभिनयातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतानाच या कलाकारांनी सामाजिक परिस्थिवर गांभीर्याने विचार करायलाही भाग पाडले. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थी वक्त्यांनी स्वच्छता विषयाचा विविध अंगानी विचार केलेला दिसून आला. कविता, पोवाडा, बासरीवादन, समूहगीत अशा विविध प्रकारांमधून विद्यार्थ्यांमधील मूक्त कलेचा अविष्कार बघायला मिळाला

या 'उत्कर्ष' राज्यस्तरीय स्पर्धेत समूहगायन, क्रिएटिव्ह नृत्य, पथनाटय, पथसंचलन, वक्तृत्व, भित्तीचित्र, लोकवादय, भारुड अशा विविध प्रकारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने एकूण १२ पारितोषीके पटकावित या स्पर्धेत उत्कृष्ट संघ, उत्कृष्ट संगीत विभाग, उत्कृष्ट नाटय विभाग यासह या वर्षीचे 'उत्कर्ष' या स्पर्धेचे विजेतेपद मिळविण्याचा बहुमान मिळावला व खऱ्या अर्थाने स्वयंसेवकांचा उत्कर्ष घडून आला.

अशा विविध प्रकारच्या शिबीराच्या माध्यमातून युवक युवतींना घडविण्याचे कार्य रासेयोच्या माध्यमातून केले जाते. राष्ट्रांची उभारणीमध्ये युवक हा केंद्रस्थानी आहे. युवकांच सहभागी होण फार महत्त्वाच आहे. युवकांच संपत्ती आहे. तो समस्या जाणू शकतो व त्या सोडवू शकतो. म्हणून समाजाच्या सेवेतून समाजाचा व आपल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्येमातून

उपलब्धआहे. यात प्रत्येक विदयार्थ्यांनी सहभागी होऊन राष्ट्रपती असलेली आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे.



**खंडेराव हरिभाऊ काळे,**
राज्यशास्त्र विभाग

## बालपणातील शिक्षण

सोण्याचा गोळा वरती येत होता. तो पाखरांचा किलबिलाट कानावर आषटत होता. आकाश लवलसर होत होते. इतराकडे बघण्यासारखे ते दृष्य बदलत जात होते कधी पक्ष्यांचा तर कधी प्राण्यांचा तर कधी अचानक थिर्र करणारा दिर्घ आवाज एकू येत होता तो आवाज कधी मंजूळ तर कधी किरकस तर कधी भितीदायक दृष्य बनत होते. थोडक्यात मातीचा सुगंध दखळता तितक्यात वीजांचा कडकडाट भिन्न करत होता. आणि थोडक्यात वेळात थेंबाचे आगमन झाले जोर जोरात ओश्डणारी प्राणी. पक्षी भयभीत होत होती. तेवढयात अचानक थेंबे बंद झाली त्यांच ते रुसन काहि समजण्यासारखा नव्हत परंतू त्या रुसण्यात काहितरी दडल होत. पुन्हा अचानक जोराचा तो भरभर करणारा सोसाटयांचा वारा सोबत घेवून येणारे ते भयानक आवाज रानाला थिर्र करुन जात होते अचानक कुण्या प्राण्याच्या जीव बचावनी करत होता. तो असा थक्क करणारा आवाज अंगावर शहारे उमटविण्यासारख्या होता. हातात टॉर्च असल्यामुळे अंधार आसत नव्हता सर्व काहि टॉर्चच्या भरवश्यावर होते. अशा प्रवासात कोण होता तो ?

जाता जाता अचानक कोठून तरी किरकस आवाज कानाला नकोसे वाटणारे होते. मन भयभयीत होत होते पायात चप्पल होती परंतू ती ही दोन बंद असलेली अंगात आपरा सदरा व आपरी पँट होती पण पूर्ण जीव त्या पिशवीत दडला होता होतं. काहितरी त्याच्यात जे खूप महत्वाचे होते त्याच्यासाठी कुठून काय येईल याची जाणीव नव्हती परंतू कुठे तरी प्रवास करताना मनात अनेक शंका-कुशंका निर्माण होत होत्या पण सांगण्यासारखे ऐकायला कुणी नव्हत पळताना पाया चिखलाने भरत जात होते पायावर अधून मधून लाल मुंग्या चढत चालताना सुध्दा हया परिस्थितीवर मात करुन जान महत्वाच होत. मनात अनेक वेगवेगळया प्रकारे विचार एकमेकांशी भांडत होते. मुंग्याच्या त्या फॉर्मिक ॲसिड मुळे जरा पायाला गुथंडा येत परंतू हया गुथडया कुडे दुर्लक्ष करणे महत्वाच होत. काहि ठिकाणी हत्ती बुडेल एवढे मोठे गवत होते. नंतर पोटरी पर्यतचा गवताचा प्रवास अविस्मरर्णीय जानवत होता परंतू त्या अविस्मरर्णीय प्रवासात अचानक कुद्धततरी सळसळ आवाज येत होता. हया आवाजाच्या दिशेने जाने धोकादायक होते त्या दिशेने बघितल्यास पाच फुट(रुंदीने)इतके गवत बाजूला सारलेले दिसत होते परंतू त्याकडे दुर्लक्ष करनेच योग्य होत मनात जिद्द धिकाटी होती आणि त्या सोबत थोडी हिम्मत होती

काही वेळेस चालता चालता अचानक चांगली पायवाट लागायची परंतु त्या कच्च्या वाटेवर छोटया मोठया किडयांची घरे होती. विचू, गोम हे तर स्वतःची घरे करुन बसली होती.त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नव्हते काहि मार्ग चांगला होता परंतू त्याकडे जाणे फार कठिण होते परंतू महत्त्वाचे तेवढेच होते

नजर हाटि तो दुर्घटला घटी अशी म्हण त्या प्रवासात लागून होती, पण तो वेळ आलाच आणि चांगली पायवाट जी माझ्यासाठी योग्य होती तीला सुरुवात झाली पायवाट मिळताच एक घंटीचा आवाज ऐकू आला आणि प्रवासाची वेळ संपली ती घंटा दुसरी कशाचीही नसून ती एका जिल्हा परिषदेची होती. आणि माझ्या पिशवीत दुसरे काहि नसून त्यात पुस्तक आणि एक पाटी देखील होती व तो दुसरा कोणी नसून मी (माऊली) होतो

हा प्रवास माझा रोजचाच एका जंगलापलीकडील एका छोटयाश्या झोपडीतून सुरु होता. शाळेत जाण्यासाठी एक माठे जंगल ओलांडून जाव लागायच जीव मुठात धरून ज्यास लागत जंगलात माझ्यावर अनेकदा विंचू, गोम अश्या किडयांचे वार झाले पण मनात जिद्द होती चिकाटी होती. ती शिकण्याची त्यामुळे दुसरे काहिच दिसत नव्हते.

परंतू रोजच्या भितीमुळे परिक्षाची भिती गायबच होऊन गेली होती म्हणतात का ''जो डर गया सो मर गया'' हया म्हणाली फॉलोव्ह करुन नंबर पटकावण झोप होत. माझ रोज चोरून शाळेला जाण माझ्या आई-वडिलासांठी चिंताजणक बाब बनली होती. परंतू मनात शिकण्याची जिद्द असल्यामुळे थोड झोप असल्या सारख जाणवत होत. हे पहिली ते सतवी पर्यतचं बालपणीतील शिक्षण एक मनात घर करुन गेले.



ज्ञानेश्वर रखमाजी भवर
एम. कॉम-प्रथम वर्ष

## Aaviskar 2014-15

### Vice of the Participant Ms. Nazneen Akhter (Winner, V Category)



Aavishkaar (invention) 2014-15 was organized on a very grand scale this year in line with its vision to catalyze the young minds towards innovation and developing a scientific bent of mind, which was quite evident from the way it was organized from planning, promoting,promoting till
organizing committee at every stage. I being a participation in the engineering and technology category was amazed by the ideas and models of the fellow participants. I also realized that Aavishkaar (invention) is not just a patent of science subjects,but was immensely impressed with models from Agriculture & social science categorience

## ''जिवन गौरव पुरस्कार''

**हिम्मतराव बावस्कर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत जिवन गौरव पुरस्कार देण्यात आला. जिवन गौरव पुरस्काराचे मानकरी **मा. हिम्मतराव बावस्कर** हे होते. त्यावेळी केलेल्या भाषणाचा हा संपादित अंश आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागास भेट दिली असता या विभागामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकारीत झालेले आर्टिकल्स बघायला मिळाले ही विद्यापीठासाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यानंतर येथे तीन पेटंर बघितले. त्याच गतिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरावाडा विद्यापीठाचे विद्यार्थी प्रगती करत राहिल्यास कमीत कमी दिवसात याच विद्यापीठातुन खात्रीलायक नेचर आर्टिकल्स पब्लिश होणार आणि नोबेल सुध्दा मिळेल. ज्या दिवशी नेचर आर्टिकल्स पाब्लिश होईल. त्या दिवशी मी स्वतः आपल्या विद्यापीठमध्ये येईल त्या विद्यार्थ्यांचे कौतुक करेल. कारण संशोधकाला पुनर्जन्म घेण्याची जरुरी नसते. न्युटने एकादाच गुरुत्वाकर्षणाचा ज्ञोध लावला. त्यावर काम करत बसा. प्लेमिंगने एकदाच पेनिसीलीनचा शोध लावला आता रोग दुरुस्त करत बसा.

मी जरी महाड येथे राहत असलो तरी या भागाचा आणि महाडचा खुप संबंध आहे. जाधवांची कन्या सिंदखेड राजाची त्यांचा पुत्र शिवाजी यांची राजधानी रायगड, महाड पासून ३५ किमी. अंतरावर तसेच रामदासांचा जन्म जांब येथे झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडमधील चवदार तळे अस्पृश्यासाठी खुले केले त्या महाड मधे मी काम करत आहे. चवदार तळ्याच्या काठावर बसुन बाबासाहेबांच्या आशिर्वादाने त्यांच्या तिक्ष्ण नजरेखाली मी संशोधन करत आहे ते टिकवत आहे. ज्या वेळेस मी बिरवाडीला गेलो. त्यावेळेस वृत्तपत्रात छापुन यायचे, विंचू दंशाने मृत्यू. त्यावेळी मी बघितले. दररोज एक डेथबाडी यायची. मी स्तब्ध झालो. मी त्यावेळी शपथ घेतली. मी यावर संशोधन नाही करु शकलो तर मी आत्महत्या करिन त्यावेळी शेतकरी सर्पदंशाने सुध्दा मारले जायचे/मरायचे.

मित्रहो आज मराठवाडा तसेच विदर्भामध्ये शेतकरी आत्महत्या होतात. त्यासाठी त्या ठिकाणी जावून विद्यार्थ्यांने संशोधन करायला हवे. तलाठी, सरपंच, ग्रामसेवक, शिक्षक हे खेडया मधील चार महत्वाचे स्तंभ आहेत. विद्यार्थ्यांने त्या खेडया मधे जावून अभ्यास संशोधन करावे..... का ? कारण आहे शेतकऱ्याच्या आत्महत्येचे. १९७२ ला दुष्काळ पडला होता त्यावेळस का नाही आत्महत्या झाल्या ? आत्ताच का एवढ्या वाढल्या. Sucide is to be dipression and diparasion is a Constravercy disease. मित्रहो आता वेळ आली आहे ती आपण शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या संदर्भाने त्यांचे संशोधन करण्याची त्याची वाढेमुळे खोदने गरजेचे आहे. ज्या ग्रामीण भागातील आरोग्याचे मंदीर म्हणजे घाटीचा दवाखाना आहे त्या आरोग्याच्या मंदीरामध्ये दुरुन-दुरुन येणाऱ्या लोकांसाठी All Intitute of medical science सारख्या सस्थचेतुन उत्तमात उत्तम सोई देण्याचा प्रयत्न करावा. जसे विद्यापीठाचा दर्जा पाहीजे तसे आरोग्यासाठी All India Institute of medical science स्थापन करायला पाहिजे.

अकोल्यामधे-बुलढाण्यामध्ये मुत्रपिंडाच्या रोगाने कितीतरी रुग्ण मृत्यूमुखी पडतात. माझ्या मुलाने मला तसा मेल केला. मी स्वतः त्या ठिकाणी जावून पाण्याचे, रक्ताचे, मातीचे नमुने महाड मधे नेवून तपासले. त्यावर संशोधन

केले.त्यामध्ये कॅडमीयम आढळले. या परिसराला खारपाण पट्टा म्हणतात हा कॅडमीअम किडणीमधे २४ वर्षे असतो. हा कॅडमीअम आला कोढून ? संशोधन केले असला फॉस्फेट खतामधुन त्याची जमीनीत वाढ झाली. फॉस्फेर तर संपूर्ण महाराष्ट्र भर वापरले जाते. मग याच भागात वाढ का ? तर हे तेथील पाण्याबरोबर संयोग पावून त्याचे पिण्याच्या पाण्यासोबत पोटात गेल्याने कॅडमीम वाढले.

माझी आई मला भेटायला यायची ती म्हणायची तु खूप मोठा डॉक्टर झाला तु आमच्या काय कामाचा ५०० कि.मी. दुर गेला आहेस तु ''तर संशोधक हा एका कुटुंबाचा नसतो, तो अख्या / संपुर्ण जगाचा असतो. असेच संशोधन आपल्या विद्यापीठातुन घडावे तेव्हाच डॉ. बाबासाहेबांच स्वप्न साकार होईल.

सध्या माहीती तंत्रज्ञानाचा जमाना आहे. चुकनही कॉपी–पेस्ट करु नका. जिद्दीने संशोधन करायला पहिजे. संशोधन पैसा लागत नसुन प्रसंगावधान तिव्रबुध्दी लागते. मी आत्तापर्यतच्या संशोधनासाठी सरकारचा एकही पैसा वापरला नाही मी विचू दंशावर संशोधन केले आहे. विंचु चावलेल्या रुग्णाचे कुणीही B.P तपासला नव्हता तो मी तपासला त्यावेळी उच्च रक्तदाब जाणवला त्यावर संशोधन करुन औषध निर्माण केले. अशाच एका प्रसंगी एकाखेडे गावात सर्पदंशाने एका वर्षात २७ लोक दगावले. ज्या गावात दंगावले त्या गावात जाऊन हिंदु, मुसलमान, श्रींमत, गरिब कसा राहतो कुठे झोपतो याचा अभ्यास केला यामध्ये गरिब खाटेवर, श्रींमत कॉटवर, गरिब मुस्लीम जमीनीवर झोपतो. त्यावर साधी मच्छरदाणी वापरल्यास मलेरीया, ताप, चिकुणगुनिया तसेच सर्पदंशापासून सुटका मिळते.झाले एक प्रकारचे संशोधन मला यासाठी काही कष्ट करावे लागले नाही. काही विद्यार्थी /जो विद्यार्थी म्हणतो मला ग्रॅण्ड नाही त्याच्या मनातुन संशोधन करायचे नसते. कोणत्याही पाहुण्याला पंचतारांकित हॉटेलात ठेवण्याची गरज नाही. जो राहत असेल त्याने भारताचा अभ्यासच केला नसेल. आपल्याला भारतात शिकायचा आहे. आपल्याला देशाची प्रगती करायची आहे. त्यासाठी मला परदेशातील कितीही मोठी नोकरी आली तरी मला माझ्या मायभुमीचा अभिमान आहे. मी मायभुमीतच संशोधन करीन कारण याच मायभुमीने मला जिवन गौरव पुरस्कार मिळवून दिला आहे. ज्या देशात जन्माला आल्यानंतर या देशाने आपल्याला या देशाचा व्हिसा दिलाय. त्यामुळे तुम्हाला या देशाची, गरिबाची, शेतकऱ्यांची अडचण दुर केली पाहीजे त्यावर संशोधन केले पाहिजे. परदेशातील विद्यापीठ नुसते नावालाच माझे आर्टिकल फक्त इंग्रजीत नसल्यामुळे प्रकाशीत होऊ शकले नाही, मी जे काही काम महाड मधुन करतो. तेच काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून घडावे अशी आशा ठेवतो.

शब्दांकन
नागेश सोनोने (MCJ)



## राष्ट्रविकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका

महाविद्यायीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

स्वावलंबन, चारित्र्य संवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नविन शिक्षण पध्दतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे २४ सप्टेंबर १९६९ पासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात येते.

१९६९ मध्ये पायलट स्वरुपात देशातील केवळ ३७ विद्यापीठात ४०,००० विद्यार्थ्यांसाठीच ही योजना होती. हळूहळू ती विस्तारली. सध्या देशातील १८० विद्यापीठातील ९५०० महाविद्यालयातील जवळपास २६ लाख विद्यार्थी या योजनेत सक्रीय सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्रातील वेगवेगळया २५ विद्यापीठामधून ३४९९०० राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उच्च शिक्षण घेत असताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य करतात तर मराठवाडयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाड विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्य जवळपास २१३ महाविद्यालयातून ३६५ कार्यक्रमाधिकार्यांच्य मार्गदर्शनाखालील ३६००० तर स्वामी रामानंद तिर्थ मराठवा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाशी संलग्नीत चार जिल्हयात १५७५० स्वयंसेवक उच्च शिक्षण घेत असताना सामाजि बांधिलकी स्वीकारुन समाजामध्ये सलोखा-शांतता निर्मा करण्याचे, देशाचे ऐक्य-अखंडता टिकवून ठेवण्याचे, दे

उभारणीचे विधायक व रचनात्मक कार्य करताना दिसून येतात. कारण राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद "Not Me But You" असे आहे. मी केवळ माझ्यासाठी नाही तर समाजाच कांही तरी देण लागतो हा संदेश देते. तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या बिल्ल्यामध्ये आठ आरे असून हे आरे म्हणजे गतीचे प्रतीक आहेत. थांबला तो संपतो असा संदेश ते देतात आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक समाजासाठी अष्टोप्रहार कार्य करायला तयार असतात.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जलसंधारण, वृक्षारोपन, शोषखड्डे, रस्ते निर्मिती, जलपूनर्भरण, स्वच्छता मोहिम, पर्यावरण संवर्धन, समर्थ भारत अभियान, मुनिजन ग्राम अभियान, उर्जा संवर्धन, कन्यारत्न अभियान, रस्ता सुरक्षा अभियान, आरोग्य विषयक वेगवेगळे उपक्रम, शेती विषयक उपक्रम, रक्तदान, बाल संगोपन, बचत गट, साक्षरता प्रसार मतदार जनजागृती अभियान, हरित ऊर्जा दिंडी, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, ग्रामीण भागात जाऊन त्या ठिकाणचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्वेक्षण करुन प्रकल्प तयार करणे, समाजातील प्रश्न त्यांच्या अडचणी त्यांच्या विकासाच्या मार्गातील अर्थळे समजून घेवुन योग्य त्या व्यसपीठावरुन सोडवण्यासाठी शिफारस करणे, पाठपुरावा करणे, वेगवेगळया शासकिय योजनांचे फायदे शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी ,अशिक्षित लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणे, आदी असंख्या उपक्रम राबविले जातात.

तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाचे दिवस व सप्ताह महाविद्यालयामध्ये साजरे केले जातात. त्या माध्यमातून त्या-त्या विषयावरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यपाल भवन च्या वतीने प्रत्येक जिल्हयातील ३० विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते. जेंव्हा जेंव्हा भूकंप, पूर, वादळ, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीठ, बॉम्बस्फोट इत्यादी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक समाजाच्या मदतीला सर्वात अगोदर धावून जातात. किल्लारीच्या १९९२ च्या भूकंपाच्या वेळी व २००६ मध्ये गोदावरी नदीला जेंव्हा महापूर आला तेंव्हा या आपत्तीपासून लोकांची सुटका करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक धावून गेल्याचा इतिहास ताजा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या वतीने गेल्या दोन वर्षापासून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. त्यासाठी गृहविभागाने जाणीवपूर्वक एन.एस.एस. च्या सहकार्याने हे अभियान राबविले. प्रत्येक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या अभियानामध्ये हिरीरीने पुढाकार घेतला. कारण रस्त्यावर होणाया अपघातातून दरवर्षी लक्षावधी लोक मरतात त्यामध्ये युवकांचे प्रमाण लक्षणीय असते.देशाचा आधारस्तंभ असलेला युवक अशा पध्दतीने मरतो हे पाहुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घोषवाक्य, रॅलीज, पथनाटय, गांधीगीरी अशा कल्पक उपक्रमांच्या साहयाने रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेने फार मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे कांही प्रमाणात अपघातांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.

तसेच मराठवाडयावर सतत पडत असलेले दुष्काळ व त्यामुळे निर्माण होत असलेली पाणी टंचाई लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय विशेष शिबीरासाठी "जलसंवर्धनासाठी युवक" ही थिम गेल्या तीन वर्षापासून जाणीवपूर्वक निवडली गेली. त्यामुळे महाविद्यालयांनी घेतलेल्या दत्तक गावांमधून जलसंधारणाची कामे फार मोठया प्रमाणात हाती घेण्यात आली. त्यातून फार मोठया प्रमाणात पाण्याचे संवर्धन आणि पाणी वापराचे महत्व लोकांच्या लक्षात आणून देण्यास निश्चितच मदत झाली आहे असे म्हणावे लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निसर्गरम्य असलेल्या ७२५ एकरच्या परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योनेच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे फार मोठया प्रमाणात करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून विद्यापीठ परिसरातील पाणीपातळी वाढण्यास मदत झाली. त्यामुळे विद्यापीठ परिसरात चिंच, अंबा, सिताफळ, पेरु, चिकू आदीच्या फळबागा बहरल्या आहेत, त्यातून विद्यापीठाचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे.

तसेच आनेक महाविद्यालयांनी एक-एक टीएमसी पाणी साठेल एवढया क्षमतेचे बंधारे बांधले आहेत. कांही महाविद्यालयांनी दोन-तीन कि.मी.चे रस्ते बांधले आहेत. या माध्यमातून समाजाला भौतिक सुविधा पुरविण्याचा प्रयत्न रासेयोच्या माध्यमातून सातत्याने होतो आहे. बीड जिल्हयातील पाली घाटामध्ये बिंदूसरा प्रकल्पाच्या पूर्वेस इंन्फट इंडिया नावाची संस्था एच.आय.व्ही. ग्रसत बालकांच्या संगोपनाचे काम करते त्या ठिकाणी बीड शहरातील राष्ट्रीय सेवा योजनेची विशेष शिबीरे लावून त्या संस्थेला कच्चा रस्ता करुन देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले. परंतू त्याहीपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे इंन्फट इंडिया संस्थेतील त्या एच.आय.व्ही. ग्रस्त मुलांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी आपला भाऊ म्हणून आपली बहीण म्हणून दत्तक घेतले आणि आपल्या घरच्या लग्नसमारंभात आनंदाच्या प्रसंगी घरी घेऊन जाऊन त्यांचा चार दिवस पाहूणचार केला.

माझ्या दृष्टीकोनातून ही फार मोठी उपलब्धी आहे.

विद्यार्थ्यामध्ये समाजसेवेची आवड निर्माण करत असताना त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या विकास घडवून आणण्यासाठी या योजनेची सुरुवातच झाली असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमहत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी वेगवेगळया उपक्रमांची आखणी केली जाते. त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा, त्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांचा दृष्टीकोन वैश्विक व्हावा या दृष्टीकोनातून वेगवेगळया शिबीरांचे आयोजन केले जाते या शिबीरासाठी वेगवेगळया जाती-पातीची, धर्म पंथाची, वेगवेगळया प्रदेशातील वेगळा वंश, वेगळा पंथ, वेगळा आचार विचार असलेली मुले एकत्र येवून विचारांची आदान-प्रदान करतात, त्यांच्यात साहचर्य निर्माण होते आणि वेगवेगळया शृंखला इथे गळून पडतात. खया अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.

अशा अनेक प्रश्नावर राष्ट्रीय सेवा योजनेचे काम सातत्याने सुरु आहे. ज्या पध्दतीने राळेगण सिध्दी, हिवरे बाजार, एक रोल मॉडेल म्हणून जगाच्या इतिहासात पुढे येऊ शकले त्या पध्दतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातूनही अशी कांही गावे दत्तक घेऊन त्यांचा पूर्ण कायापालट करण्याचा मानस आहे.

२४ सप्टेंबर वर्धापन दिन ते ०२ ऑक्टोबर हा कालावधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्य प्रसिध्दी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त २४ सप्टेंबर रोजी महास्वच्छता जनजागृती अभियान सर्वत्र राबविण्यात आले असून या सप्ताहात किमान ५०००/- बोटल रक्त संकलन विद्यापीठाच्या आखत्यारीत वेगवेगळया महाविद्यालयातून झालेले आहेत. तसेच स्वच्छतेच्या संदर्भात फार मोठे काम रासेयोच्या माध्यमातून झाले आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची व्याप्ती व महत्व दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. २३ ऑगस्ट २०१३ रोजी केंद्र शासन व टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या मदतीने स्क्रील डेव्हलपमेंटचा उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांसाठी ४ प्रातिनिधिक

महाविलयातून सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे निश्चितच या स्वयंसेवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचे वाढते महत्व लक्षात घेऊन युजीसी ने सर्व विद्यार्थ्यांना या विषयाचे महत्व पटावे म्हणून अभ्यासक्रमामध्ये या विषयाचा ऐच्छिक विषय म्हणून समावेश केला आहे. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना ही आता योजना राहिली नसून सामाजिक उत्तरदायीत्व निभावणारी फार मोठी चळवळ झाली आहे असे म्हणता येईल.



**डॉ. राजेश करपे,**
**कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरा मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

सर्वप्रथम मी ,'युवारंग' च्या माध्यमातून माझ्या सर्व विदयार्थी मित्र मैत्रिणीना शुभेच्छा देते.

विद्यार्थिनी वसतिगृहयची अधिक्षक या नात्याने मलाही माझे विचार, भावना व्यक्त करण्याची संधी युवारंगच्या माध्यमातून मिळत आहे याचा मला आनंद आहे. वसतिगृहामध्ये काही बाबी मला ठळक जाणावल्या. एक म्हणजे बहुतांशी विद्यार्थीनी या मध्यमवर्गीय, गरिब कुटुंबातून शिक्षणासाठी येथे आलेल्या आहेत. या काही विद्यार्थिनींनी आपल्या स्वतः च्या अनुभवा संबंधी माझ्याशी संवाद साधला. 'त्यावेळी त्या अनुभवामध्ये मी स्वत : लाही शोधत होते. खरच या सर्व विद्यार्थिनी इथपर्यंत / पदव्युत्तर शिक्षणापर्यंत पोहचल्या ही खूप मोठी गोष्ट आहे. कारण अतिशय प्रतिकूल अशा आर्थिक परिस्थितीतून त्या हे शिक्षण घेत आहे. आणि ही कौतूकास्पद बाब आहे. एक स्त्री या नात्याने मला या सर्व विद्यार्थिनींचा अभिमान आहे.

'युवारंग' च्या माध्यमातून मला विद्यार्थी मित्र, मैत्रिणींना सांगायचे आहे की, विद्यार्थी कल्याण विभाग, सर्व वसतिगृहांचे सर्व अधिक्षक, विद्यापीठ प्रशासन हे सर्वच विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवूनच निर्णय घेत असतात. आपल्या विद्यार्थ्यांना चांगल जेवण मिळाव, स्वच्छ पाणी मिळाव, संरक्षण व्यवस्था चांगली असावी आणि त्याचबरोबर विद्यार्थ्याच्या विकासाला ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहे त्या त्या गोष्टी नियमात राहून उपलबध करून देण्याचा प्रयत्न हे स जण करत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नेहमीच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना नाव देण्यासाठी अने उपक्रम राबवत, असते आणि त्यातलाच एक महत्त्वाच उपक्रम म्हणजे 'युवारंग' आहे.

विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार मांडण्याची कला अवगत होण्याचे एक साधन आहे. यातुनच भावी लेखक, साहित्यीक समिक्षक, विचारवंत, अभ्यासक यांची फळी निर्माण करण्या युवारंग हे एक स्फुर्तीस्थान आहे असे मला वाटते.

'युवारंग' च्या या अंकाला आणि माझ्या सर्व विद्या मित्र-मैत्रिणींना माझ्या अनेक शुभेच्छा.

संकलक- क्षितिजाभूमकर



**डॉ. सविता बाळकृष्ण भहिरट**
**अधिक्षक**
**प्रियदर्शनी मुलींचे वसतिगृह,**
**डॉ. बा. आ. म. विद्यापीठ औरंगाबाद.**

**विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व वाणिज्य विभाग, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री जि. औरंगाबाद यांच्या सयुक्त विद्यमाने आयोजित**

**''उद्योजकता विकास कार्यशाळा'' अहवाल**

विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे पत्र (संदर्भ संविका/शिबिरे/कार्यशाळा २०१४) प्राप्त झाल्यानंतर संदर्भिय पत्रानुसार उद्योजकता विकास कार्यशाळेच्या आयोजनासंबंधी संचालक विद्यार्थी संचालक विद्यार्थी कल्याण विभाग यांच्याबरोबर चर्चा करुन शनिवार दि. २४ जानेवारी २०१५ रोजी उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्याचे ठरले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यलयातील वाणिज्य विभाग व विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ जानेवारी २०१५ रोजी उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये उद्घाटन समारंभ सकाळी १०.३० वाजता दुसरे सत्र दुपारी १:०० व समारोप सत्र दुपारी २.३० वा असे तीन सत्रांचे नियोजन करण्यात आले होते.

उद्योजकता विकास कार्यशाळेचे उद्घाटन हे सकाळी १०.३० वाजता उद्घाटक डॉ. चेतना सोनकांबळे संचालक डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठा, औरंगाबाद यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख व कार्यशाळेचे समन्वयक डॉ. महेश थोरात यांनी केले. दुसरीकडे नोकरी करण्यापेक्षा स्वतः कमवा आणि शिका या युक्ती प्रमाणे गोरक्ष मंडळ बी कॉम तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याने महाविद्यायातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाने तो आणि त्याचे बी कॉम तृतीय वर्षातील मित्र यांच्या सहकार्याने ''पत्रावळी आणि द्रोण '' या उद्योगाची सुरवात मागिल वर्षी केलेली आहे. या प्रसंगी त्याने स्वनुभाव कथन केले डॉ. चेतन सोनकांबळे यांच्या उद्घाटनपर भाषणातच उद्योजकता विकास कार्यशाळेचा उद्देश सफल झाला असे वाटले. त्यांनी मुलांना जागातिक स्तरावरील व्यावसायिक क्षेत्राची व त्यातील घटकांची ओळख करुन दिली नव्हे तर एक सफरच घडवून आणली. ५०० ते १००० रुपयात उद्योग सूरु करणारे छोटे छोटे उद्योजक आज जागतिक उद्योग जगतावर राज्य करित आहेत. अशा उद्योजकांचा संघर्ष. त्यांचे नावाजलेले ब्रँडंस यांची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून मसिआ या उद्योजकांच्या संघटनेचे सचिव असलेले उद्योजक श्री राहूल मोगले (Sheet Metal industry) प्रकारात ज्यांचे नाव आहे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योजक म्हणून उद्योग क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधीची दालनेच उघडी करुन दाखविली पुढे त्यांनी स्वतः चे अनुभव त्यांना आलेल्या अडचणी त्यावर त्यांनी मात करुन कशा प्रकारे यश मिळविले हे सांगितले तसेच औरंगाबाद परिसरात होऊ घातलेल्या डी. एम. आय. सी. प्रकल्पात नवीन शहर कसे असेल व त्यात किती उद्योजकांची गरज असेल व त्यावरुण किती रोजगार निर्मिता होऊ शकेल याची देखिल त्यांनी मााहिती दिली. शेवटी निष्ठेने व प्रमाणिकपणे कामे कल्यास यश व पैसा भरपूर कमवता येतो, असा संदेश त्यांनी दिला. विद्यार्थी या दरम्यान त्यांचे विचार मंत्रमूग्ध होऊन ऐकत होते.

या नंतर अध्यक्षिय समारोपात कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, ''विद्यार्थी दशेत असताना काम करत करत शिकणे अभ्यासक्रमा व्यक्तिरिक्त सतत नवीन काहीतरी शिकण्याचा ध्यास धरणे यातच उद्याच्या उद्योजकांची बीजे दडलेली असतात. त्यांनी त्यांच्या विद्यार्थी जीवनातील अनुभव व शेती क्षेत्रावर उद्योगांची माहिती दिली.'' या उद्घाटन समारंभाचे आभार प्रदर्शन प्रा. माळेगावकर नितीन यांनी केले यानंतर दुपारी चहापानाचे मध्यांतर घेवून १:०० वाजता दुसऱ्या सत्रास सूरवात करण्यात आली.

दुसऱ्या सत्रास प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दिलीप मिसाळ सहाय्यक प्राध्यापक चेतना महाविद्यालय, औरंगाबाद यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या अंगी कोणते गूण असावेत या विषयी मार्गदर्शन केले या कार्यक्रमास प्रा. नितीन माळेगावकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले यांनी आपल्या अध्यक्षिय समारोपात ''दैनंदिन जीवन जगत असताना कोणत्याही प्रसंगाकडे उदयोजकीय दृष्टिकोन ठेवून काहितरी शिकत राहावे असे सांगीतले''

तिसऱ्या सत्रास प्रमुख मार्गदर्शक म्हणून फुलंब्री येथील उद्योजक श्री अनिल दुतोंडे (स्वास्तिक ऑईल इंडस्ट्री फुलंब्री ) हे मार्गदर्शक म्हणून लाभले त्यांनी आपल्या भाषणात ते स्वतः उद्योजक म्हणून कसे घडले. त्यांना कोणत्या अडणींना सामोरे जावे लागले. हे सांगत असतानाच आपल्याकडील अडचणी बद्दल रडत बसण्यापेक्षा त्याच गोष्टी नावीन्यपूर्ण पध्दतीने सादर करण्यात व प्रत्येक गोष्टीत परिपूर्णतेचा ध्यास धरावा तरच यश साध्य होईल. अन्यथा राजगारासाठी दारोदार भटकण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले. या सत्राच्या अध्यक्षिय समारोप डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी केला. तर सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. महेश थोरात यांनी केले. या कार्यशाळेसाठी

महाविद्यालयातील बी. कॉम आणि बी. ए शाखेच्या ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुंणाना वाव देण्यासाठी, त्यांना अभिप्रेरण मिळवण्यासाठी आणि त्यांच्यातील न्युनगंड काढून टाकण्यासाठी ही कार्यशाळा त्यांना मार्गदर्शन ठरेल येणाऱ्या कालावधीमध्ये कर्याशाळेसाठी सहभागी असलेले विद्यार्थी नोकरी माघणारे न होता, नोकरी देणारे ठरे हीच आपेक्षा.......!

**डॉ. महेश थोरात**
**वाणिज्य विभाग प्रमुख**

**डॉ. एस. आर.टकले**
**प्राचार्य**



१८५

२३७१५ ७११

## आरोग्याची काळजी घेणारे विद्यापीठातील ''आरोग्यकेंद्र''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातुन प्रवेश केल्यावर पाच मिनीटात आरोग्यकेंद्र येते. विद्यार्थीनी वसतीगृहाला लागुनच हे आरोग्यकेंद्र आहे. येथे नाममात्र दरात विद्यार्थी–कर्मचाऱ्यांची तपासणी केली जाते. आरोग्य केंद्र सकाळी ८.०० ते ११.३० व दुपारी ३ ते ६.३० या वेळेत सुरू असते. त्यामुळे शहरातुन येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात येण्यापूर्वी विद्यार्थ्यांना विभाग सुरू होण्यापूर्वी तपासणी करून घेता येते. सार्वजनिक सुटटीच्या दिवशीदेखील आरोग्य केंद्र सकाळी सुरू ठेवले जाते. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना सोयीस्कर वेळ आरोग्य केंद्राने ठेवलेली आहे.

विद्यापीठातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी दंतचिकित्सक यांची सेवा आरोग्य केंद्रात उपलब्ध आहे. विद्यार्थीनी व महिला कर्मचारी यांच्या तपासणीसाठी महिला वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्रात उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन केले जाते. फेब्रु–मार्च २०१३ मध्ये 'सोसायटी' फॉर सोशल वर्क व दत्ताजी भाले रक्तपेठी यांच्या सहकार्याने आयोजित आरोग्य तपासणी शिबीरामध्ये विद्यार्थीनी वसतीगृहातील विद्यार्थीनींची रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी व उपचार करण्यात आले. नोव्हेंबर २०१४ मध्ये शारिरीक शिक्षण विभागातर्फे आयोजित आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी आरोग्य केंद्रात २४ तास आरोग्य सेवा पुरविण्यात आली. या महोत्सवात एकूण ३८२ खेळाडुंवर उपचार करण्यात आले.

डिसेंबर २०१४ मध्ये आयोजित केंद्रि महोत्सवात तीन दिवस आरोग्य केंद्रातर्फे २४ तास सेवा पुरविण्यात आली. 'आरोग्य केंद्र' विद्यार्थ्यासा कार्यतत्पर आहे.

शब्दांकन :–
क्षितिजा भूमकर

डॉ. आनंद सोमवंशी
वैद्यकीय अधिकारी–आ
डॉ. बा. आं. म. विद्यापीठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## राजर्षी शाहू महाराज अध्यासन केंद्र

राजर्षी शाहू महाराज अध्यासन केंद्राच्या वतिने वर्ष २०१४-१५ यामध्ये पुढील उपक्रम घेण्यात आले.

१. राजर्षी शाहू महाराज जयंती

२६ जून २०१४ या दिवशी राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली त्या निमित्ताने विद्यापीठ परिसरात राजर्षी शाहू महाराज यांच्या जिवनावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रसिध्द विचारवंत श्री. श्रीमंत कोकाटे होते कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रोफेसर बी.ए. चोपडे हे हाते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. राजेश करपे हे होते.

२. व्याख्यान १७ जुलै २०१४ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची प्रासंगीता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणुन प्रसिध्द विचारवंत कॉ. गोविंद पानसरे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलसचिव डॉ. धनराज माने, प्रमुख उपस्थिती म्हणून विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. राजेश करपे हे होते.

३. राजमाता जिजाऊ जयंती

११ जानेवारी २०१५ रोजी राजमात जिजाऊ जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला व्याख्याते म्हणून प्रसिध्द विचारवंत मा. श्रीमंत कोकाटे लाभले तर अध्यक्ष प्रसिध्द इतिहासकार डॉ. गणी पटेल होते. प्रमुख पाहुणे डॉ. सय्यद अझरुद्दीन वित्त व लेखाधिकारी तसेच विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. राजेश करपे हे होते.

**डॉ. राजेश करपे**
**संचालक**

## विद्यापीठ उद्यान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

विद्यापीठ उद्यान

विद्यापीठात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमानिमित्त शोभेच्या झाडांच्या कुंडया पुरविणे, २६ जाोवारी, १५ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, इत्यादी ध्वजवंदन कार्यक्रमासाठी उद्यानाची तयारी करणे, वृक्षारोपणाकरिता विविध विभागांना रोपांचा पुरवठा करणे, इ. कामे विद्यापीठ उद्यान अंतर्गत केली जातात.

विद्यापीठ उद्यान अंतर्गत विद्यापीठातील एकूण १५ उद्यानांची देखभाल व सांभाळ करण्यात येतो. ती उद्याने पुढीलप्रमाणे-

१) प्रशासकीय इमारत उद्यान, २) इतिहास वस्तुसंग्रहालय उद्यान, ३) परीक्षा भवन उद्यान, ४) नवीन नाट्यगृह उद्यान, ५) ह्युमॅनिटीज इमारत उद्यान, ६) विश्रामगृह उद्यान, ७) कुलगुरू निवास उद्यान, ८) कुलसचिव निवास उद्यान, ९) भौतिकशास्त्र विभाग उद्यान, १०) संगणकशास्त्र विभाग उद्यान, ११) रसायाशास्त्र विभाग उद्यान, १२) पर्यटन व प्रशासन विभाग उद्यान, १३) वृत्रपत्रविद्या विभाग उद्यान, १४) मध्यवर्ती सुविधा केंद्र उद्यान व १५) स्थावर विभाग उद्यान इत्यादी.

**विद्यापीठ उद्यान अंतर्गत कर्मचारी :-**

१) डॉ. जी. के. हुंबे - कक्षअधिकारी (उद्यान)
२) श्री. के. आर. निर्मळ - उद्यानविद्यावेत्ता
३) श्री. आर.बी. मोरे - फिल्डमन
४) श्री. डी.एम. मगरे - फिल्ड सुपरवायझर
५) श्री. जी.पी. बनकर - ट्रॅक्टर चालक
६) श्री. डी. एस. जाधव - प्रमुख माळी
व ६ माळी (५ पुरुष १ महिला)

## औद्योगिक फळबाग प्रकल्प

राष्ट्रीय फळबाग मंडळ यांच्या सहयोगाने विद्यापीठ परिसरातील १४२ एकरवर औद्योगिक फळबाग उभारण्यात आला आहे. विद्यापीठातील पडीक जमिनीवर प्रथमच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात आला आहे.

यामध्ये

१) **आंबा :-** या फळझाडाच्या केशर, हुर, लंगडा, बेनेशान इ. जाती लावण्यात आल्या. आंब्याची एकूण १३२५ झाडे लावण्यात आली आहेत.

२) **सिताफळ :-** या फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये बालानगर व ॲनोना-२ या जाती लावण्यात आल्या. सिताफळाची बालानगर-२००० झाडे व ॲनोना-२ - १००० झाडे अशी एकूण ३००० सिताफळ फळझाडे आहेत. यामध्ये ॲनोना-२ या जातीला विशेष महत्त्व आहे.

३) **चिंच :-** या फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये पी.के.एम.-१ प्रतिष्ठा या चिंचेच्या जाती आहेत. चिंचेची एकूण १५३० फळझाडे आहेत.

४) **आवळा :-** या फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये ए-७, एन-१० या आवळयाच्या जाती आहेत. आवळा या फळझाडांची एकूण संख्या ९४५ इतकी आहे.

५) **चिकू :-** या फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. चिकू या फळझाडांची कालापत्ती ही जात आहे. या जातीची एकूण ४१५ झाडे आहेत.

अशी एकूण १४२ एकर विद्यापीठ परिसरामध्ये ७२१५ फळझाडे लावण्यात आली. वरील सर्व फळझाडांपासून उत्पन्न सुरु झाले आहे.

औद्योगिक फळबागेतील झाडे जसजशी मोठी होतील त्याप्रमाणे अंदाजे रू. २५ लाख प्रति वर्ष उत्पन्न

अपेक्षित आहे. या फळबागेतूनच विद्यापीठातील विद्यार्थी तसेच कमवा व शिका यामधील विद्यार्थ्यांसाठी फळबाग नर्सरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञान मिळेल तसेच विद्यापीठाचा उत्पन्नाचा भक्कम स्रोत निर्माण होईल.

औद्योगिक फळबागेसाठी राष्ट्रीय फळबाग मंडळ (N.H.B.) कडून रू. १०,००,००० लाख अनुदान प्राप्त झाले आहे.

परिसर विकास अंतर्गत उच्च तंत्रज्ञान पुष्प उद्योग प्रकल्प (Hi-tech Floriculture Project) उभारण्यात आला आहे. २३ ऑगस्ट २००९ रोजी उच्च तंत्रज्ञान पुष्प उद्योग प्रकल्पाचे उदघाटन झले अध्यक्ष- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर, प्रमुख पाहुणे- डॉ. विजय खोले सर (कुलगुरु, मुंबई विद्यापीठ), डॉ. मानवेंद्र काचोळे- शुभहस्ते व सर्व माननीय व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये उदघाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या उच्च तंत्रज्ञान पुष्प उद्योग प्रकल्पामध्ये ॲरोडॉनमिक पॉलीहाऊस उभारण्यात आले आहे. या पॉलीहाऊसमुळे वातावरण नियंत्रित करता येते तसेच झाडांच्या वाढीसाठी लागणारा फोटापिरीयर व कार्बन डायऑक्साईड साठवला जातो. यामुळे पॉलीहाऊसमध्ये वाढणाऱ्या झाडांचा दर्जा व उत्पन्न हे उ'डया जमिनीवर येणाऱ्या झाडांच्या उत्पन्ना व र्दा या पेक्षा चौपट असतो.

या पॉलीहाऊसमध्ये तापमान, आर्द्रता, कार्बन डायऑक्साईड नियंत्रित ठेवले जाते. नियंत्रित शेती या सदराखाली पॉलीहाऊस शेती ही संकल्पना येते. यामुळे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण व पिकांची हमी यासाठी पॉलीहाऊस शेती ही अत्यंत उपयुक्त आहे. या पॉलीहाऊसमध्ये परदेशातील गुलाब लागवड करण्यात आलेली आहे. जेणेकरुन पॉलीहाऊसमध्ये आलेले गुलाब हे स्थानिक बाजारामध्ये विकले जातात, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय बाारपेठेत (परदेशात) या फुलांना चांगला भाव मिळतो. विद्यापीठातील ५०० चौ.मी. पॉलीहाऊसमध्ये एकूण ५,००० गुलाबांची लागवड करण्यात आली आहे. पॉलीहाऊसमध्ये गुलाबांना पाणी व खत देण्यासाठी अत्याधुनिक अंतर्गत ठिबक सिंचा करण्यात आले आहे. तसेच वातावरण नियंत्रित करण्यासाठी फॉगर्स व शेडनेटची व्यवस्था आहे. अशा अत्यंत अत्याधुकि तंत्रज्ञानाने गुलाब वाढविले जात आहेत. गुलाबांच्या जातीमध्ये १) गुलाब (लाल) हा फ्रास चा आहे, २) गुलाब (पिवळा) हा फ्रासचा आहे. ३) गुलाब (गुलाबी) हा इंग्लंडचा आहे, ४) गुलाब (केसरी) हा केनिया, साऊथ आफ्रिकेचा आहे. यापासून विद्यापीठास उत्पन्न प्राप्त होत आहे.

## औद्योगिक फळबागेतू निघालेल्या उत्पन्नाचा वर्षनिहाय तपशिल

| अ. क्र. | उत्पादक | वर्ष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| १ | आंबा | ३,०००=०० | २२,५००=०० | ८५,०००=०० | - | ६१८२=०० | ४९०००=००- | |
| २ | आवळा | - | ६,६३५=०० | ५३,६५०=०० | २०,५०१=०० | २५०३३=०० | १४८२०=०० | ७४४१८=०० |
| ३ | सिताफळ | - | ५,२०४=०० | ११,८१९-०० | १०,५०८=०० | १५८२०=०० | २०२४०=०० | ३४२०=०० |
| ४ | पॉलीहाऊस गुलाब | - | २६,०००=०० | ३०,८८१=०० | २९,१५२=०० | १२२३३=०० | ११६२५=०० | १२००=०० |
| ५ | चिंच | - | - | - | २२,५००=०० | - | १२१०=०० | - |
| ६ | चिकू | - | - | - | ९८०=०० | ४५९०=०० | १२००=००- | |
| | एकूण | ३,०००=०० | ६०,३४०=०० | १,८१,३५०=०० | ८३,६४१=०० | ६३८५८=०० | ९८०९५=०० | ७९०३८=०० |

औद्योगिक फळबाग प्रकल्प विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे, प्रभारी कुलसचिव डॉ. गणेश मंझा व परिसर विकास समिती अध्यक्ष डॉ. गणेश शेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ उद्यान अंतर्गत राबविण्यात येत आहे.



डॉ. जी. के. हुंबे
कक्षअधिकारी (उद्यान)

# विद्यार्थी कल्याण विभाग (विविध कार्यक्रम व उपक्रम)



नाम विस्तार दिन १४, जानेवारी २०१५



छत्रपती शिवाजी महाराज जयंती
१९, फेब्रवारी २०१५



''जिवन गौरव पुरस्कार''




सरदार वल्लभाई पटेल जयंती ''राष्ट्रीय एकतादौड''



स्वच्छता अभियान



स्वामी विवेकानंद जयंती

